म. ग्रं. मं. ठाणें
विषय काव्य
सं. नं ७७८

॥ ... म ॥

# ...रतसार.

अथवा

महाराष्ट्रकविवर्य मोरोपंत यांच्या महा-
भारतांतील उत्कृष्ट वेंच्यांचा संग्रह.

भाग पहिला.

हें पुस्तक

पांडुरंग महादेव बाक्रे बी. ए.

यांनीं तयार केलें

व

...तें

..." छा. छा. प्रसिद्ध केलें.

REFBK-0000336
REFBK-0000336

...१९०६.

किंमत ६ आणे.

[illegible]

१९८२ किंवा - प्रमाणित आहे -
९ आहे.

२/१४/१०८ - [illegible]

सं. [illegible] १९८२

॥ श्रीराम ॥

# मयूरभारतसार.

अथवा

## महाराष्ट्रकविवर्य मोरोपंत यांच्या महाभारतांतील उत्कृष्ट वेंच्यांचा संग्रह.

### भाग पहिला.

हें पुस्तक

पांडुरंग महादेव बाक्रे बी. ए.

यांनीं [illegible] केलें

REFBK-0000336

REFBK-0000336

पुणें येथ [illegible] छा. छा. प्रसिद्ध केलें.

१९०६.

किंमत ६ आणे.

# प्रस्तावना.

—:o:—

( गीत्यर्ध ).

**'कविता मयूरकविची देते संतोष मानवां कविता '।**

१. महाराष्ट्रकविमुकुटमणि मोरोपंत यांच्या सर्व काव्यांत त्यांच्या 'महाभारता 'स अग्रस्थान दिलें पाहिजे. व्यासांचा मूलग्रंथच अगोदर प्रासादिक आहे. मग अशा ग्रंथाचा आधार घेऊन पंतां-सारख्या प्रतिभासंपन्न भाषाप्रभूनें आपलें सर्व कौशल्य खर्चून जें काव्य निर्माण केलें आहे त्याची योग्यता काय विचारावयाची आहे! पंतांची ही कृति फारच बहारीची उतरली आहे. त्यांच्या कवितेचे जे मुख्य गुण–वाणीची प्रौढता व शुद्धता, शब्दसौष्टव व अर्थगांभीर्य आणि शब्दालंकार व अर्थालंकार यांची मार्मिक व समर्पक योजना हे ह्या 'महाभारतां 'त उत्तम रीतीनें आढळून येतातच. परंतु ह्यांशिवाय स्वभाववर्णन हा जो व्यासकृत 'महाभारता 'चा विशेष गुण तोही ह्यांत ठळक रीतीनें दिसून येतो. धर्म, भीम, अर्जुन, दुर्योधन, धृतराष्ट्र, भीष्म इत्यादि 'भारतां 'तील प्रसिद्ध पुरुषांची शब्दचित्रें पंतांनीं अगदीं रेखल्यासारखी काढलीं आहेत. तीं पाहून कांहीं कांहीं ठिकाणीं त्यांनीं व्यासावरही ताण केली आहे असें वाटतें. सारांश, मोरोपंतांचा 'महाभारत ' हा ग्रंथ केवळ अपूर्व आहे व पंतांनीं 'विराटपर्वा 'त अर्जुनासंबंधानें जें ह्मटलें आहे कीं,

( गीत्यर्ध ).

**'झाले बहु, होतिल बहु, आहेतहि बहु, परंतु ह्या सम हा'**

तेंच त्यांच्या ह्या ग्रंथाला लावलें असतां अतिशयोक्ति होईल असें वाटत नाहीं.

२. ह्या अप्रतिम ग्रंथांतील कांहीं उत्तम उत्तम स्थळें मराठी वाचकांना पूर्वी परिचित झालेलीं आहेतच. के. परशरामपंत गोडबोले यांनीं केलेल्या ' नवनीतां' त ' उत्तरगोग्रहण,' ' कृष्णशिष्टाई ' वगैरे कांहीं प्रकरणें घेतलीं आहेत. गुरुवर्य प्रो. रा. रा. भागवत ह्यांनीं कांहीं वर्षांपूर्वी ' अल्प किंमतीची देशी काव्यमाला ' गुंफण्यास प्रारंभ करून ' कर्णपर्व, ' ' गदापर्व ' ' स्त्रीपर्व ' वगैरे पर्वांतील कांहीं उतारे छापून काढले होते. अगदीं अलीकडे रा. पांगारकर यांनीं आपल्या ' मोरोपंती वेंचे ' या ग्रंथांत ' भारतां ' तील कांहीं वेंचे घेतले आहेत. ह्या तीनही गृहस्थांना मराठी कवितेचा चांगला व्यासंग असल्यामुळें त्यांनीं काढलेले वेंचे अर्थातच सरस व म्हणून रसिकजनमान्य असे आहेत. तथापि ' महाभारतां ' त अजून अशीं किती तरी उत्तमोत्तम स्थळें आहेत कीं, जीं साधारण मराठी वाचकांना माहीत नाहींत. अशा स्थळांपैकीं निदान कांहीं निवडक स्थळें तरी त्यांच्या नजरेसमोर आणावीं ह्या हेतूनें पुढील प्रयत्न केला आहे. सध्यां पहिल्या पांचच पर्वांतील उत्कृष्ट वेंचे काढले आहेत. वाचकांस ते आवडल्यास पुढील पर्वांतून तशाच तऱ्हेचे उतारे काढून त्यांस सादर करीन.

३. पुढील उताऱ्यांत पंतांच्या कवितेचें स्वरूप साधारणतः प्रसन्न असेंच आहे. तथापि पंतांचें काव्य स्वभावतःच ' संस्कृतप्राकृत मिश्रित ' असल्यामुळें निव्वळ मराठी वाचकांस ' आमच्या 'द्विजराजा' च्या वाणीचा रसानुभव घडण्यास ' बरेच श्रम पडतील. अशा वाचकांकरितां प्रत्येक पृष्ठाच्या खालीं बहुतेक सर्व संस्कृत शब्दांवर टीपा दिल्या आहेत. ' अधिक टीपा ' ह्या सदराखालीं कांहीं दुर्बोध स्थळें विशद करण्याचा प्रयत्न केला आहे. ह्या टीपा देतांना मला ' काव्यसंग्रहा ' चा फार उपयोग झाला म्हणून ' संग्रहा ' चे माजी विद्वान् व मार्मिक संपादक के. ओक ह्यांचे मी फार फार आभार मानतों.

४. सरतेशेवटीं, गीति.

ज्यांच्या हृत्कासारीं होय गुणस्नेहार्यबिंदुही फार ।
सारज्ञ असूयोज्झित त्यांला माझा असो नमस्कार ॥

ह्या पंतांच्याच गोड शब्दांनीं रसिकजनांस एकवार प्रणाम करून हें 'मयूरभारतसार' त्यांस सादर व सप्रेम अर्पण करतों.

पुणें.
तां० १५–१–०६.

पांडुरंग महादेव बाके.



# अनुक्रमणिका.

## १ आदिपर्व.

पृष्ठें.


१ भीष्मद्रोणसमागम ... ... ... ... ... १—५
२—३ बकासुरवध ... ... ... ... ... ५—११
४ द्रौपदीस्वयंवर ... ... ... ... ... ... १२—१६
५ उपसंहार ... ... ... ... ... ... १६


---

## २ सभापर्व.


१ धर्माचा राजसूययज्ञ ... ... ... ... ... १९—२१
२ शिशुपालवध ... ... ... ... ... ... २१—२३
३ दुर्योधनाचा कपटद्यूतनिश्चय ... ... ... ... २३—२९
४ उपसंहार ... ... ... ... ... ... २९


---

## ३ वनपर्व.


१ द्रौपदीविलाप ... ... ... ... ... ... ३३—३६
२ किरातार्जुनयुद्ध ... ... ... ... ... ३६—३९
३ अर्जुनविलोभन ... ... ... ... ... ४०—४४
४ नलदमयंतीवियोग ... ... ... ... ... ४४—४८
५ यक्षप्रश्न ... ... ... ... ... ... ४८—५२
६ उपसंहार ... ... ... ... ... ... ५२


---

## ४ विराटपर्व.


१ कीचकवध ... ... ... ... ... ... ५५–६०
२ विराटभ्रमनिरास ... ... ... ... ... ६०–६६
३ अभिमन्युविवाह ... ... ... ... ... ६७–७०
४ उपसंहार ... ... ... ... ... ... ७०


## ५ उद्योगपर्व.


१ अर्जुनविजय ... ... ... ... ... ... ७३–७५
२ धर्मराजाची सामेच्छा. . ... ... ... ... ७५–७८
३–४ कर्णभेदप्रयत्न ... ... ... ... ... ७८–८४
५ भीष्मप्रतिज्ञा ... ... ... ... ... ... ८५–९१
६ उपसंहार .. ... ... ... ... ... ९२

अधिक टीपा ... ... ... ... ... ... ९३–११२


## शुद्धिपत्र.

| पृष्ठ | आर्या | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| ४ | २८ | गृहींगृहीं | गृहीं गृहीं |
| ५ | ३५ | पाइजे | पाहिजे |
| ६ | ८ ( टीप ५ ) | ब्राह्मणांच्या | ब्राह्मणाच्या |
| १२ | २ | बुघ | बुध |
| २२ | ८ | दृष्टीला | दृष्टिला |
| २२ | १० (टी. १२) | वागतें | लागतें |
| ४९ | ५ ( टी. ४ ) | प्राणी | पाणी |
| ८० | १७ | सृत्या | सत्या |

सं. आ. १०२

# १ आदिपर्व.

श्रीमन्मयूरकविच्या होय जसें सुख रसिक जनां कवनीं, ।
विबुधेश्वरासहि[1] तसें ऐकूनि न निनद[2] पिकज[3] नाकवनीं[4] ॥१॥

---

१ देवांच्या राजालाहि( इंद्रालाहि ). २ आवाज. ३ कोकिलानें केलेला. ४ नंदनवनांत.

॥ श्रीराम ॥

# मयूरभारतसार

## १ भीष्मद्रोणसमागम.

आर्या.

मग भेटोनि द्रुपदा, द्रोण म्हणे, 'मी तुझा सखा पहिला'।
दे क्षोभ[1] शब्द तो त्या, दंड[2] जसा स्पर्शतां खळा[3] अहिला[4] १
पार्षत[5] ह्मणे, ' दरिद्रा! तूं राजाचा सखा कसा? मुग्धा[6]! ।
मित्र सधन सधनाचें साजे, गोदुग्ध मिल गोदुग्धा ॥ २ ॥
न करुनि विचार वदतां पडतें शोकांत मानस, ख्यातें[7] ।
विद्वत्वें सधनत्वें तुल्यें लोकांत मान सख्यातें ॥ ३ ॥
झालें जीर्ण[8] विसर जें, कोण तया मंदनायका[9]! पुसतो ?।
गतरंग[10]सुगंध जुना पावे सन्मान काय कापुस तो?'॥ ४ ॥
बहु बडबडे असें, दे मद्य तसें, त्यासि भाग्य मत्तत्व ।
मुनि मनिं ह्मणे,' न करितां परिभव न कळेल यासि मत्तत्व[11]' ५
मुनि त्या अपमानातें घोंटी[12] जेंवि त्रिलोचन[13] गरळातें[14] ।
किमपि विरुद्ध न वदतां, गेला तो हस्तिनाव्हनगरातें[15] ॥६॥
राहे गुप्त कृपगृहीं द्रोण; तदात्मज[16] सुशीलराशि[17] कृती[18], ।
पार्थास कृपानंतर अस्त्रें, कोणासि न कळतां, शिकवी ॥७॥

---

१ राग. २ काठी. ३ दुष्टा. ४ सर्पाला. ५ द्रुपद-पृषतापुत्र. ६ मूर्खा. ७ प्रसिद्धें. ८ जुनें. ९ मूर्खशिरोमणे. १० गेलेला आहे रंग व सुवास ज्याचा असा(कापूस). ११ माझें तेज. १२ गिळी. १३ शंकर. १४ विषाला. १५ हस्तना नांवाच्या शहरीं. १६ त्याचा मुलगा(अश्वत्थामा). १७ उत्तम वर्तनाचा सांठा. १८ शाहणा, विद्वान्.

ते कुरुकुमार करितां नगरीबाहेर जाउनि क्रीडा, ।
निरुदककूपपतित[1]निजवीटोद्धृत्यपटु पावले व्रीडा[2] ॥ ८ ॥
ते वृद्ध कृश श्यामं[3] द्रोण ब्राह्मण अदूर[4] पाहोनी
निजवीटोद्धारार्थ प्रार्थिति, भंवते उभेचि राहोनी ॥ ९ ॥
द्रोण म्हणे त्यांसि,'तुह्मी भरतकुलज[5] कीं, कृतास्त्र[6] कीं, तरि ती।
वीटा न निघे धिग्! धिग्! गुण तेचि स्वेष्टसिद्धि[7] जे करिती
वीटा तसी स्वमुद्रा[8] टाकुनि मी काढितों इषीकांहीं[9] ।
साहित्य परि करावें प्रेमें मद्भोजनाविषीं कांहीं'॥ ११ ॥
धर्म ह्मणे, ' अस्मद्गुरु कृप, तदनुमतें तुह्मांसही भिक्षा ।
शार्ध्वंत[10] मिळेल, दावा वीटा काढूनि अद्भुता शिक्षी[11]' ॥१२॥
हास्य करूनि द्रोणें त्या शशिकुळजांसि[12] द्यावया तुष्टी[13] ।
कूपांत इषीकांची अभिमंत्रण करुनि सोडिली मुष्टी[14] १३॥
एकीचें मुख शिरलें वीटेमध्यें तिला दुजी जडली, ।
तिसरी तीस चतुर्थी[15] तिजला ऐसी परंपरा घडली ॥ १४ ॥
बाहेर काढिली ती वीटा तत्काळ जेंवि पात्र गळें[16] ।
स्वरभंग[17] त्यांत वरिला त्या पार्थाच्या मुहूर्त[18]मात्र गळें[19] १५
अभिमंत्रित शर सोडुनि मुद्राछिद्रांतरीं[20] तया शिरवी, ।
वरि अंगुलीयकातें[21] ओढी किरणें जसें पयोंशि[22] रवी ॥१६॥

---

१ कोरड्या विहिरींत पडलेली आपली विटी वर काढण्याला असमर्थ. २ लज्जा. ३ काळा. ४ जवळ. ५ भरतकुलांत उत्पन्न झालेले. ६ अस्त्रविद्या शिकलेले. ७ आपण इच्छिलेली गोष्ट सिद्धीस नेणें. ८ माझी आंगठी. ९ तृणविशेषानें. १० नम्री. ११ ज्ञान, कौशल्य. १२ चंद्रवंशांत उत्पन्न झालेल्यांस. १३ आनंद. १४ मूठ. १५ चवथी. १६ गळ–विहिरींतून भांडें वगैरे वर काढण्याचें साधन. १७ गहिंवर. १८ क्षणभर. १९ गळ्यानें. २० आंगठीच्या छिद्रामध्यें. २१ आंग-

त्या मंत्रचमत्कारें प्रमुदित होउनि, कुमार ते प्रणती ।
करुनि प्रेमें, 'सांगा निज नाम ग्राम कुळ' असें ह्मणती १७

द्रोण म्हणे, 'सांगा हे भीष्माला ज्ञानभर्गनदीपाला ।
जाणेल तोचि लोकीं; विदित नसे काय गगनदीपाला?' १८

बाळमुखें तें कळतां, भीष्म ह्मणे, 'परशुराम कीं द्रोण ।
आला असेल भार्गवें, लोकीं तिसरा असा कृती कोण?' १९

श्रीगुरुसम गुरुबंधु प्रेमें भेटोनि निववीला भीष्में ।
जैसा मयूर मेघें जो तापविला सुदुःसहें ग्रीष्में[10] ॥ २० ॥

आणूनि राजसदनीं, पूजुनि हे ऊनि सानुराग मनीं,।
भीष्में तयासि पुसिलें कीं, 'सांगा कोण हेतु आगमनीं?'२१

द्रोण ह्मणे, 'परिसावें त्वां, सांगावें तुलाचि सभ्यास ।
द्रुपदास मजहि करवी चापीं गुरु अग्निवेश अभ्यास ।२२।

गुरुबंधु सखे आह्मी होतों गुर्वाश्रमांत, वीरमणे ! ।
तेव्हां मजला ऐसें पांचाळ द्रुपद गौरवूनि ह्मणे ॥ २३ ॥

'जेव्हां काय मज सख्या! द्रोणा! देईल राज्यपद तातें, ।
तेव्हां तद्भोक्ता तूं, आणि तुझी, कुळज सत्य वदतात' ॥२४॥

गेला पढोनि, झाला नृप तो, झालों गृहस्थ मी, राया ! ।
फळली सुतरत्नफळें त्यावरि माझी कृपी सती जाया २५

---

१ आनंदित. २ नमन. ३ गांव. ४ ज्ञानरूपीभाग्याच्या सागराला. ५ सूर्याला. ६ कुशल. ७ परशुरामाप्रमाणें. ८ द्रोण. ९ सोसण्यास जें फार कठीण त्यानें. १० उन्हाळ्यानें. ११ प्रीतियुक्त. १२ येण्यांत १३ बाप. १४ शपथ. १५ चांगल्या कुळांत जन्मलेले. १६ प्रसवली. १७ बायको.

धनिकापत्यकृतपयःप्राशन[1] पाहोनि, पुत्र पय मागे ।
पिष्टादकें[2] ठकवितां, तें माझ्या शल्य काळजा लागे २६
पिष्टोदकपानमुदित सुत धनिकसुतांत चपळपद[3] नाचे ।
मोहिति[4] मज क्षणक्षण त्यांच्या उपहासशब्द वदनाचे २७
बहु धन असो नसो,परि एक असावें गृहींगृहीं[5] शुभतें ।
घ्यावें सुतार्थ[6] शुद्रापासुनि गोदान,सन्मतें[7] शुभ तें ॥२८॥
फिरलों बहु कीं, 'संतति पटु[8] तासि गोदानदी न ताराया'।
परि विधि[9] मज दे मिळवूं जातां गोदान दीनता,राया! २९
स्मरलें स्वसखद्रुपदस्नेहवचन[10] मज ह्मणोनि मग, राहो ।
यत्नांतरें[11], करुनि असा निश्चय, गेलों तदीय[12]नगरा हो! ३०
भेटोनि तया वदलों, 'पूर्वींचा मी सखा' असें नातें ।
जें तद्दत्तोत्तर[13] तुज सांगाया योग्यसें असेना तें ॥ ३१ ॥
परि न कथितां भल्याला हृत्ताप[14] उणा न होय, शांतनवा[15]!।
तें एकुनि साहेसा कोण असा सज्जन प्रशांत नेवा[16]?॥३२॥
धिक्कारिति अज्ञ जसे मागतया भीक सर्वदा भणगा[17] ।
मज धिक्कारी, हृदयीं झाले ते शब्द सर्व दाभण,गा! ॥३३॥
वदला असे असें कीं, मी सख्यानर्ह[18] मंदें[19], राहो तें ।
स्मरतां बहु दुःख मनीं, भीष्मा खळजळधिमंदरा[20]! होतें ३४

---

१ श्रीमंताच्या मुलांनीं केलेलें दुधप्राशन ( दुधापिणें ). २ पिठा-च्या पाण्यानें. ३ चपळ आहेत पाय ज्याचे असा ( मुलगा ). ४ वेडें केलें. ५ प्रत्येक घरीं. ६ मुलाकरितां. ७ साधूंच्या मताप्रमाणें. ८ समर्थ. ९ दैव. १० माझा मित्र जो द्रुपद राजा त्याचें प्रेमाचें भाषण. ११ दुसरा प्रयत्न. १२ त्याच्या. १३ त्यानें दिलेलें उत्तर. १४ अंतःकरणांतील दुःख. १५ भीष्मा. १६ तरणा. १७ भिकाऱ्याला. १८ मैत्रीला अयोग्य. १९ मूर्ख. २० दुष्टजनरूपसागराचें मंथन करणाऱ्या ( घुसळणाऱ्या ) मंदरपर्वता ( भीष्मा ).

'देईन अन्न एका दिवसाचें मात्र, पाहिजे तरि घे'।
हें शेवटीं वदे, तों कोपागारीं[1] मदीय चेत[2] रिघे[3] ॥ २५ ॥
द्रुपदकृतघ्नत्वाची येतांचि प्रत्ययासि पुष्कलता ।
त्यजिली सभा तयाची म्यां मधुपें[4] जेंवि घर्मशुष्क[5] लता २६
आलों त्वन्नगरा मी ओढाया अर्थ शिष्य यश कांहीं ।
कर्ण विटविले माझे द्रुपदाच्या विरसवचनमशकांहीं[6]' ॥२७॥
भीष्म ह्मणे 'राज्य तुझें, ज्याच्या प्राप्त्यर्थ देव नवसावे ।
ते कुरुभाग्यें आले हे पाय क्षणहि दूर न वसावे ॥ २८ ॥
सिद्धचि झालें सर्वहि कर्तव्य असें तुह्मीं मनीं आणा ।
बाणासन[7] विज्य[8] करा कौरव दासानुदाससे जाणा' ॥ २९ ॥

---

## २ बकासुरवध--पूर्वार्ध.

स्कंधीं पृथेसि[9] वाहूनि लंघुनि मत्स्यादि देश दूरवर ।
गेले तापसवेश स्वीकारुनि पांडुपुत्र शूरवर[10] ॥ १ ॥
त्या व्यसनांत[11] निवविला दर्शन देवूनि तापहृ[12] व्यासें ।
जो चिंती साधुजनीं संपत्तिसदा[13], न ताप, हव्यासें ॥ २ ॥
चिंतामणि अर्थिना[14] जें, धन्वंतरि जें गदाकुला[15] देतो ।
भेटोनि अकस्मात् सुख तें त्या कुरुच्या तदा कुळा दे तो ३
पौत्रांसि[16] ह्मणे, 'मज हें कळलें होतें परंतु जळधीतें[17] ।
मिळतां बळें नदीतें फिरविल कोणी बळी न खळधीतें[18] ।४।

---

१ क्रोधरूपी घरांत. २ मन. ३ शिरे. ४ भ्रमरानें. ५ उन्हानें सुकलेली. ६ रसशून्य शब्दरूपी डांसांनीं. ७ धनुष्य. ८ दोरीनें रहित. ९ कुंतीला. १० शूरश्रेष्ठ. ११ संकटांत. १२ दुःखहारक. १३ संपत्तीच्या स्थानास. १४ गरीब मनुष्याला. १५ रोगानें पीडिलेल्याला. १६ नातवांना. १७ समुद्राला. १८ दुष्टाच्या बुद्धीला.

प्रार्थावें नलगे मज, जें तुमचें हित करीन आधीं तें ।
भेटेन एकचक्रानगरींत रहा, हरीन आधींतें[1]' ॥ ५ ॥

जातां देवूनि अभय निजजनकाचा पिता, महा ज्ञाते ।
त्याचि नगरीं द्विजगृहीं होते पाळुनि पितामहाज्ञा[2] ते । ६ ।

सिद्धान्न[3] मातृहस्तीं देती ते वरुनि वृत्ति माधुकरी ।
भीमासि अर्ध देती; अर्धाचे पांच भाग साधु करी । ७ ।

होते कांहीं काळ स्वीकारुनि भैक्ष्यवृत्तिला[4] मुदित ।
तों कुंती परिसे त्या आश्रयदब्राह्मणालयीं[5] रुदित[6] । ८ ।

भीमासि ह्मणे,'रडतो दुःखें सकुटुंब विप्र बापा! हें ।
मज बहु दुःसह झालें; आलें नेत्रासि अश्रु बा! पाहें । ९ ।

आह्मी पक्षी, हें गृह[7]नीड, धरादेव[8] आश्रयागम[9] हा ।
दुःख हरूनि करावी प्रत्युपंकृति[10] होय हाचि याग[11] महा' १०

भीम ह्मणे,'शोध करीं जा, स्वमुखें विप्रनायका[12] पूस ।
वारीन दुःख सर्वहि, दहना[13] अतिभार काय कापूस ?'।११।

जाय द्विजाकडे ती गाय जसी वासराकडे मोहें ।
करितां विलाप, बोलत होता निजदुःख, तेधवां तो हें १२

'जाये! वदलीस परस्थळ[14]गमन विचार सर्वथा राहो ।
माहेर येथ आहे, वोळखिती लोक सर्व, थारा हो । १३ ।

---

१ मनोव्याधींना. २ आजाची ( व्यासाची ) आज्ञा. ३ शिजलेलें अन्न. ४ भिक्षावृत्तीला. ५ आधार देणाऱ्या ब्राह्मणांच्या घरांत. ६ रडणें. ७ घर हेंच कोणी पक्ष्यांचें घरटें. ८ ब्राह्मण. ९ आधाररूप वृक्ष. १० उपकाराची फेड. ११ यज्ञ. १२ ब्राह्मणश्रेष्ठा. १३ अग्नीला. १४ दुसऱ्या ठिकाणीं जाणें.

गेलों असतों तरि कां पडतें हें प्राणसंकट प्रमदे !।
स्वकुटुंबव्यसन जसें देतें न तसें बुधा विष श्रम दे ।१४।

जरि दान तुझें द्यावें कांते! मज भासतें तसें तरि तें ।
सिंधूदरीं[1] विकावें स्वहितार्थ तितीर्षुनें[2] जसें तरितें[3] । १५ ।

पुत्रचि अधिक, न कन्या, अन्यांस[4] गमे, मला न लोभ्याला ।
नयनयुगांतुनि[5] एकहि द्याया स्वप्नीं न कोण तो भ्याला? ।१६।

देतों निजवपु[6] परि तूं भीरु[7]! कसी साहसील विरहातें ?।
स्वर्गीहि दुःसहाचि जें ह्मणसील मज स्मरोनि चिर[8] 'हा' तें ॥

प्राणांचा त्याग बरा, तुमचा न बरा, कसा न तो पापी ?।
कूपांत बळें अबळा घालुनि ठकवूनि दोर जो कापी' ।१८।

तों ब्राह्मणी ह्मणे, 'हो ! कवि साधु तुह्मी करूं नका शोक
यन्मूल[9] 'आपदर्थे' तो शंकरसाचि आठवा श्लोक । १९ ।

अजि 'आत्मानं सततं रक्षेद्दारैर्धनैरपि' श्लोकीं ।
तेंचि करा हो! न बुडों द्या हो ! मज निजमतीसह्ही शोकीं २०

पतिपूर्वी स्त्रीस मरण, तें लग्नाहूनि काय हो ऊनं[10] ?।
न रहावेंचि सतीनें पळभरिहि विरूपकाय[11] होऊन । २१ ।

रक्षाल तुह्मीच मुलें, अबळा वाहील भार जीवा हे ।
रक्षील कशी आल्या नवपूरीं[12] भीरु फार जी वाहे ? ।२२।

---

१ भर समुद्रांत. २ तरून जाण्याची इच्छा करणाऱ्यानें. ३ नौकेनें. ४ दुसऱ्याला ५ दोन डोळ्यांतून. ६ माझें स्वतःचें शरीर. ७ भित्रे. ८ पुष्कळ वेळ. ९ ज्याचा आरंभ. १० कमी. ११ कुरूप आहे शरीर जिचें अशी. १२ नवीन पाण्याच्या लोंढ्यांत,

जाईन मीच, राक्षस जरि करकर सर्व मानवां चावे ।
दैवें स्त्री ह्मणुनि, दया येतां, मत्प्राण कां न वांचावे? । २३ ।

मज भक्षीलचि तो तरि विधुरपणें सर्वथा नका राहूं ।
ती स्त्री मीच, ह्मणा जी ! मागें सारूनियां नकारा हूं। '२४ ।

ऐसें ह्मणतां स्त्रीच्या कंठीं वाळुनि मिठी ह्मणे,'अयि ते ।
कथमेवमुक्तमदयं तदयं किमनुष्ठितिक्षमो दयिते! ' ।२५।

परिसे असें पृथा जों तोंचि ह्मणे त्यासि कन्यका, ' मातें ।
द्या, द्यायाचीच सुता, हे किमपि नयेचि अन्यकामातें । २६ ।

आत्मा पुत्र, सखा स्त्री, कन्या चिंताचि सर्वकाळ, जिला ।
प्रसवोनि वाहति मनीं श्रीमंतहि पितर सर्व काळजिला ।२७।

कन्या रक्ष्य तिघांतुनि एका तुज हो ह्मणेल कां टाकीं ? ।
बापा! कांट्यानेंचि प्राज्ञ सुखें काढितात्ति कांटा कीं '। २८ ।

ऐसें वदोनि कन्या रडवूनि रडे, तशांत जवळून ।
खवळूनि उठे बाळक बोले हस्तें तृणासि कवळून । २९ ।

समजावुनि त्यांसि ह्मणे,'ऐसें लाहिलैंचलासि मालीन ।
कां ललतां आललतां पलतां मी सागलांत तालीन '॥३०॥

ह्यांसविलीं हर्षविलीं व्यसनार्त तिघेंहि बाळशब्दानें ।
अब्दानें ग्रीष्मर्दवाकुळ बर्हिकुळें जसींच अब्दानें ॥ ३१ ॥

---

१ शहाणे लोक. २ हातानें. ३ गवताला. ४ रात्रिंचर–राक्षस. ५ पडतां. ६ संकटानें गांजलेलीं. ७ मेघानें. ५ उन्हाळ्यांतील वणव्यानें तप्त झालेलीं. . ९ मोरांचीं कुळें. १० पाणी देण्यानें.

# ३ बकासुरवध–उत्तरार्ध.

तेव्हांचि पृथा देवी भेटे, अभयोक्ति जी वदे त्यांतें ।
संजीविनीच जाणों ती रोगें करुनि जीव देत्यांतें ॥ १ ॥

रोदनकारण पुसतां विप्र ह्मणे, ‘ अंबे[1] ! तापसि ! श्रवणें[2] ।
घ्यावें शिवें[3], अशिवाच्या व्यर्थाचि कां तूंहि तापसि श्रवणें ? २

या राष्ट्रा बकराक्षस अजयूथा[4] लांडगा जसा पाळी ।
तद्वेतनदानाची[5] आलि असे आजि मजकडे पाळी ॥ ३ ॥

एक महिष[6], एक पुरुष, शाल्योदन[7]राशि, त्यासि भक्षाया ।
द्यावा असें असे, या व्यसनीं मज कोण दक्ष[8] रक्षाया ?’ ४

कुंती ह्मणे, ‘ दिला तुज एक स्वसुत, द्विजा ! नकोचि रडों ।
हा शोकभर स्वशिरीं घेउनि सकुटुंब तूं नको चिरडों ’ ५

विप्र ह्मणे,‘ शिव शिव ! परघातक जो स्वार्थलुब्ध नर कामीं ।
तो जैसा तैसा या कर्मे पावेन घोर नरका मी ॥ ६ ॥

करुनि पराचें अहित स्वहित विहितें[9] काय तापसि ! कवीसी ?।
माते ! असें असे मज व्हाया याहूनि ताप सिकवीसी ’ ।७।

कुंती ह्मणे, ‘ मदात्मज[10] गुरुवरमंत्रें असे महातेजा ।
साहों न शकति राक्षस वज्राघातासही सहाते जा ’ ॥८॥

---

१ आई, बाई. २ कानानें. ३ कल्याणकारक, चांगलें. ४ मेंढ्यांच्या कळपाला. ५ त्याचा पगार देण्याची. ६ रेडा ७ साळीच्या भाताची रास. ८ हुशार, समर्थ. ९ योग्य. १० माझा मुलगा.

मग विप्र-पृथाप्रार्थित भीम धरुन राक्षसापराध मनीं ।
कोपे, जाणों दहनचि तो, होय प्रार्थना तया धमनी[1] ॥९ ॥

तें मान्य करुनि मुनिला, 'व्हा स्वस्थ' असेंचि तो कवि प्रार्थी
निःस्व[2] जसे वित्तार्थी, तैसेचि कुलीन लोक विप्रार्थी ॥१०॥

स्वानुज[3] साहस कांहीं करणार, असें युधिष्ठिरा समजे ।
' आकारेंचि परेंगितें[4] कळे' ह्मणति कवि युधिष्ठिरासम जे ११

पुसतां पृथा कथी तें धर्म ह्मणे, ' अंब ! परिस तोकवचें[5] ।
द्याया काय उचित ? जो रणीं सहाणार अरिस[6] तो कवच १२

कुंती ह्मणे, 'अरे ! बा ! पावों द्यावा मुनी कसा असुखीं[7] ? ।
आह्मीं सुखें ह्मणावें,'काळा ! द्विज सोड,आमुचे असु[8] खा' १३

भीसी कां ? अनुभविलें अनुजबळ तुवां न काय गा ! रानीं? ।
पावे ताप पराचा, परि हिमगिरिचा[9] न काय गारांनीं ॥१४॥

पडला निपट[10] शिशुपणीं भीम मदंकावरूनि[11] ज्यावरि तें ।
झालें चूर्ण शिळातळ[12] न धरीं भय, यश तवानुजा वरितें १५

ब्राह्मणसाहाय्यकर क्षत्रिय जो तोचि संत, तोचि तरे ।
ऐसें व्यासें कथिलें, ह्मणुनि तुह्मां तेंचि संततोचितें[13] रे ! '१६

जननीस धर्म वर्णी, नवल न वर्णील तीस सुरभी[14] ती ।
तरिच तसे खळ वधिले तत्पुत्रांनीं जयांसि सुर भीती ।१७।

---

१ फुंकणी. २ निर्धन मनुष्य. ३ आपला धाकटा भाऊ [ भीम ]. ४ दुसऱ्याच्या मनांतील हेतु. ५ मुलाचें [ माझें ] बोलणें. ६ शत्रूला. ७ दुःखा. ८ प्राण. ९ हिमालयाचा. १० केवळ. ११ माझ्या मांडीवरून. १२ दगडाचा पृष्ठभाग. १३ नेहमीं करण्यास योग्य. १४ कामधेनु.

२८.०७१.०८१
७८२



रात्रौ एकाकी ही शिरतां सागरवनीं न भी मकर ।
भीमहि तसा बकवनीं आणि तदन्नीं तसाचि भीमकर १८

जेवी भीम, ‘ बका ! ये ’ ऐसी मारूनि हांक उग्रासें ।
शिरले काय सदुर्दरीं सदोदनाचे भिवोनि सुग्रास ॥ १९ ॥

भीम न सोडी भोजन, राक्षस ताडी बळें जरि बुक्यांनीं ।
खळ गांजी, परि सादर हरिभजन करी जसा बुध मुक्यांनीं

पांडव जेवुनि आधीं मग राक्षस जीवितास आंचवला ।
सन्मणि न कोटिलक्षा ये, येतो काय राक्षसा चवलो? ।२१।

मारी हरि लीलेनें जेंवि गजा, तेंवि पार्थ कुणपाशा ।
तैं सुर ह्मणति, ‘ यमाच्या गुरु साजति भीमबाहुगुण पाशा’

ठेवी नगरद्वारीं परमभयानक अशुद्धिमंत् कुणप ।
जाणों मातेनें तो वधिला शिशुरक्तपोग्र मत्कुणप ॥ २३ ॥

भीमें हळूचि जावुनि कथिली वार्ता द्विजासि कानीं ती ।
श्लाघ्येंहि करुनि न मिरवी कुळज,सुजनहो ! असी सिका नीती

---

१ मुसर. २ भीमाचा हात. ३ भयंकर जो राक्षस त्यास. ४ चांगल्याच्या पोटांत. ५ उत्तम अन्नाचे. ६ मुकाटयानें ७ दोन आण्यांला. ८ प्रेतभक्षक राक्षसास ९ भीमाचे हात हेच कोणी दोरे. १० अपवित्र. ११ प्रेत. १२ नगरीरूप मातेनें. १३ मुलांचे रक्त पिणारा असा भयंकर. १४ ढेंकणांत श्रेष्ठ. १५ प्रशंसनीय.

# ४ द्रौपदीस्वयंवर.

गेले धन्य कराया पंडूचे नंदन[1] द्रुपदराजा ।
तो गुरुहि जाय, समुचितें[2] पसराया नंदनद्रु[3] पदरा ज्या ॥ १ ॥
राजसुतांसि रहाया त्या द्रुपदपुरीं कुलालदे[4] शाला[5] ।
काळगति पहा बुध हो ! बा एखाद भुलाल देशाला ॥ २ ॥

सेवुनि भिक्षान्न सुखें रत[6] होते देवविप्रभजनांत, ।
कोण्हीहि न ओळखिले, झाले दारूनि विभ्रमें[7] जनांत ॥ ३ ॥
बहु विप्र, बहु क्षितिपति[8], बहु मागधें[9] सूत[10] बंदिजन[11] आले ।
कृष्णास्वयंवरोत्सवदर्शनभाग्येच्छु[12] देवही झाले ॥ ४ ॥

वरबुद्धि[13] अर्जुनींच स्थिर होती सर्वदा, परि पुरा जे ।
आले, ते आदारिले द्रुपदें पहिले जरि स्वरिपु राजे ॥ ५ ॥
झालें जतुगृहदाहश्रवण[14], परि मना न साच वाटे तें ।
वांछितसिद्ध्यर्थ[15] धरी तो राजा युक्तिच्याच वाटेतें ॥ ६ ॥

करवी लक्ष्य[16] व्योमीं[17] पार्थासचि शक्य भेद त्याचा कीं, ।
चळचक्र[18] तळीं भेदनसाधन, तें सूक्ष्म रंध्रें[19] त्या चाकीं ॥ ७ ॥
शर पांच मात्र, धनुही त्र्यंबककोदंडमित्र[20] कठिणपणें ।
करवुनि ऐसें भिववी बहुतांच्याही मनास कठिण पणें ॥ ८ ॥

१ पुत्र. २ योग्य. ३ कल्पवृक्ष. ४ कुंभार. ५ मातीचे घडे करण्याचें घर. ६ भ्रम. ७ तेजोरहित. ८ राजे. ९ राजांचा वंश इ॰ वर्णन करणारे. १० पौराणिक. ११ स्तुतिपाठक. १२ द्रौपदीचा स्वयंवरोत्सव पाहाण्याचें भाग्य इच्छिणारे. १३ वर [ नवरा ] अर्जुनाला करण्याचा विचार. १४ लाक्षागृह जळाल्याची बातमी ऐकणें. १५ इष्ट हेतु साध्य करण्याकरितां. १६ निशाण. १७ आकाशांत. १८ हालणारें चाक. १९ भोंक. २० शंकराच्या धनुष्यासारखें.

घोषविलें[1] कीं, 'चढवुनि धनुला पांचा शरात लक्षात ।
भेदील जो कृती[2] त्या माझी कन्या वरील दक्षातें' ॥ ९ ॥

सर्व मिळाले रंगीं[3] विप्रनृपांहीं सुमंच[4] शोभविले ।
रंगीं ते लोक तसे कमळवनीं जेंवि भृंग[5] लोभविले ॥ १० ॥

बसले होते पांडव विप्रांच्या शिवमयीं[6] समाजांत ।
कोण न होतील तदाश्रित[7] शांत दया सुधासमा[8] ज्यांत? ११

रंगीं धृष्टद्युम्नें धरुनि करीं आणिली स्वसा[9] रमणी ।
जाणों भुजगें प्रेक्षकजननयनमनोहर[10] स्वसार[11] मणी ॥ १२ ॥

तद्रूपें मोहे सुरजनहि, धरिल धैर्य तो कसा रंग[12] ? ।
मूर्तिमती गीति गमे ती, भुलले तेंहि लोकसारंग[13] ॥ १३ ॥

कर वळविला अजें[14] जें विष्णुधृतस्त्रीस्वरूप[15] कित्ता तें ।
चित्र तसेंचि उतरिलें चतुरें, वाटे कवींद्रचित्ता[16] तें ॥ १४ ॥

रंगीं धृष्टद्युम्न स्वभुज उभारुनि ह्मणे, 'अहो ! परिसा ।
भेदील लक्ष तो या मद्भगिनीला वरूनि हो हरिसा[17]' ।१५।

कृष्णेस ह्मणे, 'वत्से ! दे माळा लक्षभेद करित्यातें ।
कुळशीलरूप सद्गुण असतील स्वानुरूप[18] जरि त्यातें' ।१६।

दुर्योधनादिकांची कन्यारत्नींच वेधली दृष्टी ।
जासि वृष्टि चातकाला, त्याला तसि ती विरंचिची[19] सृष्टी[20] ॥

१ जाहीर केलें. २ कुशल पुरुष. ३ सभास्थानीं ४ उत्तम पलंग. ५ भ्रमर. ६ कल्याणकारक. ७ त्यांच्या आश्रयाला असणारे. ८ अमृताप्रमाणें. ९ बहिण. १० पाहणाऱ्या लोकांचे डोळे व मन हरण करणारा. ११ आपलें धनसर्वस्व. १२ माणें. १३ लोक हेच कोणी हरीण. १४ ब्रह्मदेवानें. १५ विष्णूनें घेतलेलें बायकोचें रूप. ( मोहनीचें ). १६ कविश्रेष्ठांच्या मनाला. १७ इंद्राप्रमाणें. १८ आपल्याला योग्य. १९ ब्रह्मदेवाची. २० उत्पत्ती–करणी.

कृष्णेकडे जनाची तसि दृष्टि, श्रीकडे जशी सृष्टी ।
भक्ताकडेचि हरिची दृष्टि, जसी वांसुराकडे गृष्टी ॥ १८ ॥
बळदेवासि ह्मणे प्रभु, ' आर्या ! त्या ब्राह्मणांत तो धर्म ।
तो भीम, तो धनंजय, ते यम,म्यां वळखिले, नव्हे नेर्म' १९
देशोदेशींचे नृप झटले, परि परशुरामसें चाप ।
न वळे, लवे भुजबळें, तत्ताडित बहुत पावले ताप ॥२०॥
तेव्हां स्वात्युत्साहें हृष्टमना तातें उष्णकर करुनी ।
रविसमवर्णे कर्णे चाप चढविलें क्षणांत करकरुनी ।२१।
स्वमनीं पांडव ह्मणती, ' हा ! हा ! या दुष्कुळप्रसूतानें ।
नेलेंचि लक्ष्य भेदुनि सहकन्यारत्न यशहि सूतानें' ॥ २२ ॥
जों कर्ण ह्मणे, ' न शिवों देईन इला दुज्या नवरया मी ' ।
तोंचि ह्मणे ती कृष्णा, ' सूतमहं जातुचिन्न वरयामि ' २३
कर्ण विगुण धनु टाकुनि पाहुनि रविला, चुरूनि हातातें ।
चित्तीं ह्मणे, 'कशाला केला निर्माण पुत्र हा तातें? '॥२४॥
शिशुपाल यत्न करि, परि बोले स्वमनांत चापदैवत, ' मी
न कठिन, तुला बुडावितें आठवुनि तुझेंचि पाप दैव तमीं
मागधराजसुत ह्मणे, ' कृष्णा होईल आजि मज्जाया ' ।
त्यासि ह्मणे चाप-लता, 'लज्जापंकीं तुह्मींहि मज्जा या '२६
शल्यहि पडला, झडला मर्द, न प्रकटूनि शक्तिला जे तें ।
कौतुक पाहत होते सांपडले तेच कवि न लाजतें ॥ २७ ॥

---

१ नूतन प्रसूत झालेली गाय. २ थट्टा. ३ आनंदित. ४ चाप (सूर्य). ५ सूर्य. ६ सूर्याप्रमाणें आहे कांति ज्याची अशा कर्णानें. ७ हीन कुलांत जन्मलेल्यानें. ८ सारथ्यानें. ९ दोरीनें रहित. १० अंधारांत, ११ लज्जारूप चिखलांत. १२ बुडा. १३ गर्व.

'न बुडो क्षत्रयंश' ह्मणुनि उठवी उत्साहदायि मन पार्था;।
धर्महि म्हणे, 'असो गुरुलब्धा शिक्षा सदैव अनपार्थो' २८
जैं धनुकडे निवे द्विजवृंदांतुनि विप्र एकला जाया ।
साधूंसि तोचि शिकवी साधूत्सोहातिरेक लाजाया ॥ २९ ॥
कोणी ह्मणति, 'निवारा, आह्मां क्षत्रियकृतोपहासाचें ।
पात्रत्व नवें धाया सुचपळ बटु जोडितो पहा ! साचें' ३०
किति ह्मणती, 'जाऊं द्या, होवुं न देईल कर्म कुत्सा हें; ।
पूर्वी श्रीराम जसा, उठलासे हा तसाचि उत्साहें ॥ ३१ ॥
प्याला अगस्त्य नामा ब्राम्हण निःशेष नदनदीपा तें ।
विसरलां रामातें कां त्या भृगुवंशसदनदीपातें ? ॥ ३२ ॥
ब्रह्मतपःकेलिगृह ब्राह्मण न करील कायहो ! बोला? ।
'विजयेऽस्तु' ह्मणा, चढला विप्राशीनें न कोण तो मोलीं?
नमिला आधीं पार्थे विश्वप्रियसुहृदकृत्तिम पिनाकी, ।
ह्मणती, 'यद्यश सेवुनि अमृतीं गोडी नसे किमपि' नाकी ॥
मग हृदयीं आठविला कुशळकर कुशेशयाक्ष कंसारी, ।
यत्स्मरणें शुचिमतियतिपतिगतिला योग्य होय संसारी ३५

---

१ उत्साह देणारें. २ गुरूपासून मिळालेली ( शिक्षा-ज्ञान ) ३ अनिष्फळ—सफळ. ४ ब्राह्मणांच्या समुदायांतून. ५ साधूंच्या उत्साहाचा अतिशय. ६ क्षत्रियांनीं केलेल्या उपहासाचें. ७ योग्यत्व—स्थानत्व. ८ मुलगा. ९ निंदा. १० नद व नद्या ह्यांचा जो स्वामी समुद्र त्याला. ११ भृगुकुळरूपी गृहांतील दिवा जो परशुराम त्याला. १२ ब्रह्मरूप तपश्चर्येच्या विलासाचें स्थान. १३ ब्राह्मणांच्या आशीर्वादानें. १४ किंमतीला—मोठपणाला. १५ विश्वाचा प्रियमित्र व स्वतःसिद्ध. १६ शंकर. १७ देव. १८ कल्याण करणारा. १९ कमलनयन. २० कृष्ण. २१ शुद्धांतःकरणाचे जे यतिश्रेष्ठ त्यांना प्राप्त होणाऱ्या गतीला—मुक्तीला.

करुनि प्रदक्षिणा, धनु उचलोनि, ख्याति तो करी मोटी, ।
चापाच्याचि न केवळ नरवीरांच्याहि[१] वांकवी कोटी[१६] ।३६।
यंत्राच्छिद्रद्वारें पांचहि शर एकदांचि सोडोनी ।
पाडी पळांत पृथ्वीवरि पुरुषप्रवर[२] लक्ष तोडोनी ॥ ३७ ॥
प्रीति मुनिगणांच्याही, राजांच्या कीर्ति सोमवंशाच्या, ।
घाली कंठीं माळा, कृष्णा त्या श्रीमरुत्वदंशाच्या[३] ॥ ३८ ।
आशीर्वादांच्या द्विज, पुष्पांच्या करिति सुरहि वृष्टीतें, ।
द्रुपदपुरी जनकपुरीसम सुखदा[४] होय साधुदृष्टीतें ॥ ३९ ॥
ब्राह्मण नाचति रंगीं आनंदें उडविती स्वचेलातें[५] ।
तें तोय[६] होय हो ! यश खळजननृपचित्ततप्ततैलातें[७] ॥४०॥
सत्कांतलाभचिंता[८] उत्साहें उचलितांचि धनु सरली ।
सद्गुणरक्ता[९] कृष्णा कृष्णाजिनधारकाहि[१०] अनुसरली ॥ ४१ ।

---

## ५ उपसंहार.

ऐका सज्जन हो ! भवदुक्तिच[११] खरें, आश्चर्य म्यां पाहिलें, ।
वाल्मीकिप्रभृति स्वबंदिनिकरीं[१२] दीना मला बाहिलें[१३] ॥
केलें प्राकृत काव्य, ईश्वरपदीं धत्तूरसें[१४] वाहिलें, ।
सांगूं काय वरप्रसाद ? अजि तें व्यासें हि कीं सोहिलें[१५]॥१॥

---

१ नरश्रेष्ठांच्या सुद्धां. २ पुरुषश्रेष्ठ. ३ इंद्राचा अंश ( पुत्र ) जो अर्जुन त्याच्या. ४ सुख देणारी. ५ आपल्या वस्त्राला. ६ पाणी. ७ दुष्ट लोक जे राजे त्यांचें मन हेंच कोणी तापलेलें तेल त्याला. ८ चांगला नवरा मिळण्याविषयींची काळजी. ९ चांगल्या गुणांची जिला आवड आहे ती. १० मृगचर्म धारण करणाऱ्याला सुद्धां, ११ तुमचें ह्मणणें. १२ आपल्या स्तुतिपाठकांच्या समूहांत. १३ बोलाविलें. १४ धोतऱ्याच्या फुलासारखें. १५ सहन केलें. १६ धनुष्याचीं टोंकें (पक्षीं) कोटिसंख्य;

# २ सभापर्व·

लिहिलें हळूहळू यां गोड 'सभापर्व' ह्मणुनियां दुसरें, ।
याच्या श्रवणें रसिकां तुष्टि जशी ताशि सुधेचिया न सरें ॥

१ तरोवरानें.

# १ धर्माचा राजसूय यज्ञ.

मग जिष्णु उत्तरेला, जिंकाया भीम वासवाशेला,
सहदेव दक्षिणेला, वरुणदिशेलाहि नकुल तो गेला ॥ १ ॥
हरिति रिपूंचे मदगद, पद न, दयासिंधु ते सुजनमहित, ।
झाले केवळ न दरद, बदरदहि न गांजिला प्रणत अहित ॥

करुनि चतुर्दिग्विजय द्रविणांचे अमित राशि जोडूनी, ।
ते स्वपुराला आले, विजित नृपांचेंहि मन न मोडूनी ॥३॥
तैसेंच आणिलें बहु वित्त युधिष्ठिरपुरास दासाजितें ।
अजितें, अजि! तें त्या तत्प्रेम असा कौतुकी सदा सजितें ॥

धर्मपरें धर्मपरा धन दिधल्या काय दोष ? कर दे, हें ।
किति ? दासदास्यहि करी श्रीश श्रीचित्ततोषकर देहें ।५।
धर्म प्रभु, न पर प्रभु, जेणें केला प्रसिद्ध तो करद, ।
मोठ्या मोठ्यांलाही बुडतां व्यसनाब्धिमाजि जो करद ॥६॥

धर्म ह्मणे, ' देवा ! तुज दीक्षा साजेल, मज न, यज्ञाची ।
हा सम्राट् सर्वेशा ! दृष्टि निवो सर्वसर्वनयज्ञाची ' ॥ ७ ॥
कृष्ण ह्मणे, ' राया ! तूं उचित अनुद्धत न उद्धत क्रतुला ।
योग्य न दुर्व्यवस्थानीं यांजाया प्रियहि शुद्ध तक्र तुला ।८

---

१ जरसंध वधानंतर. २ अर्जुन. ३ पूर्व दिशेला. ४ पश्चिम दिशेला. ५ गर्वरूपी रोग. ६ राज्यपद. ७ साधूंना मान्य. ८ भीति देणारे, ९ थोर देणारा सुद्धां. १० नम्र. ११ शत्रु. १२ धनाचे. १३ कोणीही न जिंकलेला असा जो कृष्ण त्यानें. १४ लक्ष्मीच्या मनाला आनंद देणारा. १५ कर देणारा. १६ संकटरूप सागरांत. १७ हात देणारा. १८ सार्वभौम. १९ सर्व यज्ञविधि जाणणाऱ्यांचा. २० नम्र.

देवा ! सेवाचि भली दे मज, दुसरी न घेववे दीक्षा ।
सुखकीर्तिहेतु आह्मां तव नवसव[1]भूमिदेववेदीक्षा ॥ ९ ॥
करिन ब्राह्मणपादप्रक्षालन, सांवडीन मी उष्टीं ।
सर्वहि करीन, देहीं फल हेंचि, न अन्य या वृथापुष्टीं १०
कृतकृत्य यांत आह्मी, हो तूं सम्राट् प्रभो ! अगाधबला !।
हो स्वयशें त्रिलोकीं राया ! कुरुसत्तमा ! अगा ! धव[2]ला'११

धर्में सर्वोत्सवो[3]त्सुक नृप आणविले स्वदूत धाडूनी ।
विप्र क्षत्रिय वैश्यहि सच्छूद्रहि भूवरील झाडूनी ॥ १२ ॥
भीष्म सकल[4]त्रसुत धृतराष्ट्र कृप द्रोण विदुर पुरवासी ।
धर्में आणविले, मृग जाणों प्रेषूनि नकुळ[5]सुरवासी ॥ १३ ॥
रामादि सर्व यादव शिशुपालादिक नृपाळ बहु आले ।
अर्पुनि उपाय[6]नें बहु धर्मकृतें आदरें बहुत धाले[7] ॥ १४ ॥

अध्व[8]र्यु याज्ञवल्क्य, ब्रह्मा[9] श्रीव्यास, पैल मुनि होता[10] ।
सुमुनि सुसामानामा साम[11]ग यज्ञांत जाहला होता ॥ १५ ॥
जेथ सभासद नारद, फार दया ज्ञान ज्यांत वास करी ।
जेथें विप्रपदा[12]ब्जप्रक्षालन तीर्थ[13]पाद देव करी ॥ १६ ॥
तेथें साहित्यासि श्रीभीष्म द्रोण विदुर बहु जपती ।
न विसंबिति क्षण जसे गुणवदप[14]त्याशि वृद्ध मनुजप[15]ती १७

---

१ नवीन यज्ञ ब्राह्मण व वेदी ( यज्ञभूमी ) यांचें अवलोकन. २ शुभ्र. ३ यज्ञ समारंभाविषयीं. उत्कंठित. ४ बायको व मुलगे यांसह. ५ नकुळरूपी उत्तम गीतस्वरास. ६ नजराणे. ७ संतुष्ट झाले. ८ अध्यक्ष. ९ कर्मारंभीं व शेवटीं प्रणवोच्चार करणारा ऋत्विज्. १० ऋत्विज्. ११ सामवेद गाणारा १२ ब्राह्मणांचीं पदकमळें धुणें. १३ सर्व तीर्थें आहेत चरणाच्या ठिकाणीं ज्याच्या तो कृष्ण, १४ सद्गुणी बालकाला. १५ राजे.

यजमानहि गुरुदेवद्विजभक्त अजातशत्रु, तज्जाया ।
मूर्तिमती श्रद्धासी आले गुण ज्या सुधेंत मज्जाया ॥१८॥
वाढी स्वमायसी, कीं मूर्तिमती सुरभि गायसी ते तें ।
जें जो इच्छी, तीतें गाय भुवनें, जेंवि गाय सीतेतें ।१९।
यज्ञामें सफल सकल सव, सगुण ब्रह्म ज्यांत रावे तें ।
त्या क्रतुच्या वर्णावें कीर्तिसुधेतें, न अन्य रांवेतें ॥ २० ॥
इतुक्याचि राजसूयक्रतुच्या या वर्णनें रसिक हर्षो; ।
काय डरडरां ढेंकर देवुनि चातक ह्मणेल बहु वर्षो ? २१

---

## २ शिशुपालवध.

तें यजनकर्म झालें पूर्ण सविधि परमशुद्ध रायाचें ।
उद्धरिलें भगवंतें भरताचें गोत्र उद्धरायाचें ॥ १ ॥
तेव्हां देवर्षि मनीं आणी कीं ' क्षत्र सर्व शुद्धरणें ।
उद्धरणार प्रभु, परि आधीं शिशुपाल आजि उद्धरणें' ॥२॥
धर्मासि ह्मणे, ' राया ! आले यज्ञोत्सवार्थ नगरा जे ।
त्यांमध्यें पूजावा त्वां प्रथम श्रेष्ठ, सर्व मग राजे ' ॥ ३ ॥
धर्म ह्मणे भीष्मातें, ' सांगा जी ! मज तुह्मीच जें विहित, ।
सांगत आला पूर्वीं जैसे मद्भावुकार्थ जेंवि हित ' ॥ ४ ॥
भीष्म ह्मणे, ' वत्सा ! जरि पुससी सर्वांत कोण पूज्य असे।
तरि वासुदेव आधीं पूजावा त्वां विशुद्ध भक्तिरसें ॥ ५ ॥

---

१ धर्म. २ त्याची बायको–द्रौपदी. ३ जप. ४ यज्ञाच्या. ५ काकवापेक्षां कांहीं दाट जो उसाचा रांधा तो. ६ यज्ञकर्म. ७ नारद. ८ माझ्या कल्याणाकरितां.

ज्योतिर्गणांत रविसा, तेजस्वी कृष्ण या सदांत पहा, ।
तेज अहा ! क्षिप्र वहा, अर्घ वहा, एक पूज्य वृष्णिप हा'
पूजी प्रभुला प्रेमें व्हाया दृक्कामपूर्ति सहदेव,
पूजित आले स्वस्थिरचर त्या श्रीविश्वमूर्तिसह देव ॥ ७ ॥
नारद, भीष्म, प्रमुखां साधूंच्या होय दृष्टिलाभा जी ।
भा जीमूतश्यामा प्रभुची ती चैद्यदृष्टीला भाजी ॥ ८ ॥
भगवत्सत्कृति पाहुनि कोपे शिशुपाल सत्समाजांत ।
दुष्टीं जशी पिशाची भरली दुर्बुद्धि तत्समा जांत ॥ ९ ॥
धर्मासि करी सज्जनवृंदीं पाण्यापरीस पातळ, तें ।
वर्णवेना; सन्निंदावागनुवादेंहि पाप आतेळतें ॥ १० ॥
गांजी पुष्कळ लावुनि मूर्खपण तशा सभेंत शांतनवा, ।
परि हांसे, कीं जन्मापासुन बहु शांत, तो न शांत नवा ११
त्रिजगत्पूज्यपद प्रभु गुरु पुण्यश्लोक सार्वभौम खरा, ।
त्या निंदी श्रीकृष्णा कीर्तिश्रीशांतिभूतिच्या मखरा ।१२।
बहु सांत्वन धर्म करी, न शमे, न वळे, परंतु तो चैद्य ।
मरणाऱ्या रोग्याला काय करिल जाणता भला वैद्य ? ।१३।
भीष्म ह्मणे, ' खळसांत्वन कां करितो ? याचिया नसे कानें।
हें ऐकिलें, निवे घृत कढलें तोयाचिया न सेकानें । १४।

---

१ नक्षत्रमंडळांत. २ सभेंत. ३ बोलावा. ४ कृष्ण. ५ आपल्या स्थावरजंगम वस्तु. ६ कांति. ७ मेघाप्रमाणें काळी. ८ शिशुपालाच्या डोळ्यांना. ९ त्यासारखी. १० साधुसमुदायांत. ११ साधुनिंदारूप शब्दाच्या उच्चारणानें सुद्धां. १२ स्पर्श करितें—वागतें. १३ तीनही लोकांना वंद्य आहेत पाय ज्याचे तो कृष्ण. १४ पावन आहे कीर्ति ज्याची तो. १५ कीर्ति, संपत्ति व शांति हेंच ऐश्वर्य त्याच्या. १६ स्थानास. १७ शिंपडण्यानें.

क्षोभे बहु या वचनें, त्याला उपमान दुष्ट कुतरेंच; ।
विस्तर असो; तयाचा उतरी शिर हरुनि शौरि[1]सुत रेंचें ॥

सोसुनि शत अपराध प्रभुनें शिशुपाल मारिला चक्रें, ।
केला पात्र सुगतिला, जी प्रार्थावी गति स्वयें शक्रें ॥१६॥

शिरलें तद्देहो[3]त्थित तेज प्रभुच्या मुखीं पदा नमुनी ।
मानिति मनांत त्या वर[4]चरितास महावरप्रदान मुनी ।१७।

देवर्षिप्रमुख सुजन ह्मणती, 'जीवासि एक हरि हित रे ! ।
अद्भुत महिमा याचा, भक्त तरे, करुनि वैर अरिहि तरे' ॥

---

## ३ दुर्योधनाचा कपट-द्यूतनिश्चय.

त्या मय[6]सभेंत रचना पाहुनि राजा सुयोधन भ्रमला, ।
प्रौढकविकृती[7]ं जैसा बाळ ह्मणे जो, 'कळे अदभ्र[8] मला' ।१।

मानुनि जळ स्थळाला वस्त्रांतें आवरी करें, वाटे ।
कोठें पडे जळीं तो जळ न, जळ स्थळचि तें खरे वाटे २

पिहित[9]द्वार विवृत[10]सें मानुनि जातां कपाळ आपटलें, ।
झाला व्याकुळ दुर्मति आपुलियाचि भ्रमाचिया पटलें[11] ॥३॥

जाय बळें उत्रडाया कर देवुनि उघडिल्याहि अरे[12]सा ज्या ।
तोंडघशींच पडे हो ! होय चमत्कार तापकर राजा ॥४॥

---

१ कृष्ण. २ खोड, गर्व. ३ त्याच्या शरीरापासून उत्पन्न झालेलें. ४ उत्तम कृत्यास. ५ मोठा वर देणें. ६ मयासुरानें केलेल्या वाड्यांत. ७ गंभीर काव्यांत. ८ पुष्कळ. ९ बंद असलेलें. १० उघडें असें. ११ आच्छादनानें. १२ दाराला.

भीमार्जुन पोषिति अतिहासा[1] अंधजसुदु:सहा य[2]मेंही ।
त्यां निजभर[3]हर हरिचे सुसहा[4]य ह्मणे, न दु:सहाय, म[5]हीं ५

त्या उपहासें झाला बहुताचि संतप्त तो सुयोधन हो ! ।
चित्तीं ह्मणे, ' मरो, परि अपमानी सर्वथा सुयोध नहो ' ६
जातां पुराशि मार्गीं शकुनि ह्मणे कुरुवराशि, ' सांग मला, ।
तूं अप्रसन्न कां ? गा ! वा[6]ङ्नियम सदैव विहित कां गमला?'

दुष्ट ह्मणे, ' जें झालें ख[7]र दु:ख कृतांत[8]रूप मामा ! तें ।
दावार्चिसें[9] कराया भस्म पहातें तरू[10]पमा मी[11]तें ॥ ८ ॥
झालें युधिष्ठिराला भूमंडळ विक्र[12]में वश, कुं[13]नेते ।
भ्राते नव्हेत त्याचे, नरत[14]नुधर सर्व देव शकुने ! ते ॥९॥
श्री कीर्ति भू[15]ति महिमा शक्रीं[16]ची या युधिष्ठिरीं भूपीं, ।
अन्यत्र लेश कैंचें ? सलिल जसें सागरीं तसें कूपीं ॥१०॥
या स्वस[17]पत्नोत्कर्षें जळतों मीं अंतरींच, असुखा या ।
सोसील कोण मानी ? देतों मी पा[18]वकासि असु खाया ११

घेवुनि दे गुर्वाज्ञा मज हा अग्नींत का[19]य होमा[20]या;
दु:खद जो स्वपराला त्याची ज्ञात्यांसि काय हो ! माया ? '

---

१ धृतराष्ट्राच्या पुत्राला ( दुर्योधनाला ) सोसण्यास फार कठिण असें जें फार हंसणें ( अतिहास ) त्याला. २ नकुळ सहदेवसुद्धां. ३ आपलें ओझें नाहींसें करणारा. ४ उत्तम मित्र. ५ पृथ्वी. ६ स्तब्ध बसणें. ७ तीक्ष्ण. ८ काळस्वरूपी. ९ वणव्याच्या ज्वाळेप्रमाणें. १० झाडासारख्या (मला). ११ मला. १२ पराक्रमानें. १३ पृथ्वीचें नियमन करणारे. १४ मनुष्यरूपी. १५ संपत्ति, ऐश्वर्य. १६ इंद्राचा. १७ आपल्या शत्रूंच्या विजयानें. १८ अग्नीला. १९ शरीर. २० जाळण्यास.

शकुनि ह्मणे रायातें, 'प्रिय अप्रिय काय तूं? अगा! धात्या[1]; ।
'कर्मानुरूप देतो फळ' ह्मणति असे भले अगाधा[2] त्या १३

पुण्य तसेंचि तयांचें व्हावा उत्कर्ष नित्य नव साचा; ।
महिमा पूर्वींचा हा सुकृत[3]भराचा, नव्या न नवसाचा ।१४।

यत्न तदुच्छेदीं[4] त्वां शत केले परि कवे[5]! न शकलास, ।
पूर्णेंदु[6] काय जिंकी उडु[7] ज्याच्या जिंकवे न शकलांस[8] १५

तुजही सहाय गुरु, गुरुसुत, कृप, वृष[9], बंधु, भीष्म, आहेत
होईल पूर्ण दिग्जय बहुदक्षिण[10] यज्ञ, कीर्ति हा हेत ' ।१६।

नृप त्यासि ह्मणे, 'मामा! योजिसि येथें कशास सामातें[11]? ।
सांग उपाय, युधिष्ठिरपरिभव जेणें घडे, असा मातें ' १७

शकुनि ह्मणे, 'पांडुसुत, द्रुपदनृपति, तत्सहाय कंसारी, ।
यांशि भुजबळें जिंकी ऐसा केंचा समर्थ संसारी? ॥ १८ ॥

परि एक उपाय असे धृतराष्ट्र तुला ह्मणेल जरि कर गा! ।
होइल युधिष्ठिराची श्री पृथ्वी निश्चयेंचि तरि कर[12]गा ।१९।

प्रेम बहु, पटुत्व[13] नसे, द्यूतीं धर्म स्वयें असे भोळा ।
अनिवर्तन[14]प्रतिज्ञा तच्छीला यापरी करीं गोळा ' ॥ २० ॥

कुरुखल ह्मणे, 'तरि नृपा! घे आज्ञा, तूंचि हें वद पित्यातें।
मी हें बोलों न शकें, जरि करितो बहु दया तदपि त्यातें '

---

१ ब्रह्मदेवा. २ ज्याचा अंत लागत नाहीं असा जो ब्रह्मदेव त्याला. ३ पुण्याईचा. ४ त्यांचा नाश करण्याविषयीं. ५ शाहाण्या. ६ पूर्णचंद्र. ७ नक्षत्र. ८ एका भागाला. ९ कर्ण. १० पुष्कळ दक्षणा आहे ज्यांत तो. ११ सख्याला. १२ हातीं आलेली. १३ कुशलत्व. १४ परत न फिरण्याची प्रतिज्ञा.

करुनि कुविचार, नगरीं जावुनि एकांत समय पाहूनी, ।
नृप गांठिला हळूहळु तच्छास्त्रविवेकचंद्रराहूंनीं[1] ॥ २२ ॥
शकुनि वदे, 'राजा ! हा झाला त्वज्ज्येष्ठपुत्र[2] कृश हरिण ।
क्षणही स्वस्थ नसेचि व्याघ्रवनामाजि जेंवि शिशु-हरिण[3]' ॥
वृद्ध वदे, 'वत्सा! कां पांडुर[4] कृश जाहलासि सांग मला? ।
भोगिसि भोग सुरांचे[5] निष्कंटकराज्यखेद[6] कां गमला?' २४

कलिपुरुष[7] ह्मणे,'देती तिळहि न सुख हे स्वभाग्यभोग मला।
पाहुनि युधिष्ठिरश्री मज तुच्छ स्वविषय प्रभो ! गमला २५
मतिचक्षु[8] भेदिलें हो ! माझें अतिदु:सहें किरीटिकणें[9]; ।
मज संसारीं कैंचें चिंतेनें लागतां किरी[10] टिकणें ? ॥२६॥
मी घटतों[11], परि तुमचे मनिं केवळ वोढे[12] तात ! ते; ज्यानें
अवलोकिले, कळे त्या शिशुशशिसे[13] वाढतात तेजानें ।२७।

इतरांची काय कथा ? जे देणार त्रिसर्व[14] 'बळि[15] बा गा ! ।
त्यांतें वारित होते द्वारप[16] दारापुढें न ज्यां जागा ॥ २८ ॥
संज्ञा[17] केली होती, कीं होतां लक्ष त्या मखीं[18] पात्र, ।
उच्चगृहाग्रपुरुषें[19] फुंकावा शंख एकदां मात्र; ॥ २९ ॥
वाजत होता संतत दर[20],जाणों विष वचोगृहीं[21] वमला[22]; ।
त्या अनिशरवश्रवणें[23] बापा ! आलें खरेंच हींव मला ।३०।

---

१ त्याचें शास्त्रज्ञानविचार हेच कोणी चंद्र त्याला ग्रासून टाकणाऱ्या राहूंनीं. २ तुझा वडील मुलगा. ३ बालमृग. ४ फिकट. ५ देवांचे. ६ शत्रुरहित राज्याचा त्रास. ७ कलीचा अंश आहे ज्यामधें तो पुरुष ( दुर्योधन ). ८ बुद्धिरूप डोळा. ९ अर्जुनरूपी कणानें. १० कीड. ११ कृश होतों. १२ दृढ. १३ बालचंद्राप्रमाणें. १४ तीन सर्व रुपये. १५ कर. १६ द्वारपाळ. १७ ठराव. १८ यज्ञांत. १९ उंच घराच्या अग्रभागीं गेलेल्या पुरुषानें. २० शंख. २१ कानांत. २२ ओकला. २३ सतत होणाऱ्या आवाजाच्या श्रवणानें—ऐकण्यानें

मयकृतसभेंत पडलों मी वापींत[1] स्थलभ्रमें सहसा, ।
हसले सपत्नदारा[2]हि, न ह्मणे कोणीहिं कीं ' उगे न हंसा ',
खदखद हांसे भीमहि जिष्णुहि, मजला तसेंचि बा! यमही
तद्‌दुर्दशा न करितां निस्तेजा मज वठेल काय मही? ।
विवृतद्वाराकार प्रेक्षुनि भित्तिप्रदेश[3] जों शिरतों,
फुटलें तें थोडें बहु, जें धरिलें शत्रुनें स्वयें शिर तों ।३३।
धृतराष्ट्रसुता[4] ! ये, मी दाखवितों, द्वार हें, न बापा ! हें ।
वदला असें वृकोदर जें तद्वाक्यार्थ तूंचि बा ! पाहें ' ३४
तों शकुनि ह्मणे, ' राया ! अभिमानधना[5] ! सुयोधना ! जरि तें
भाग्य हरावेंचि असें इच्छिसि जिंकूनि दुर्जया आरितें; ३५
तरि मज कपटद्यूतीं आहे बळ फार, हा उपाय भला, ।
धर्महि न ह्मणेल नको हेंही ठावें असे यथार्थ मला ॥३६॥
धर्माची ' आहूतो न निवर्तेयम् ' असी प्रतिज्ञा ते, ।
न मृषा द्यूताप्रति अतितर खर ह्मणाति न असीप्रति ज्ञाते '
खलमणि ह्मणे, ' नृपाळा ! दे आज्ञा, श्री हरील शकुनी ती
कां न स्वीकारावी, करिल जरि महा रिला वश कुनीती? ' ।
धृतराष्ट्र ह्मणे, ' पुसतों विदुराला, तो विवेकराशि कवी ।
मज हित सदा शिकवितो, जेंवि बृहस्पति सुरेश्वरा शिकवी '
भरतकुळकलंक ह्मणे, ' मोडील विदुर विचार हा केला, ।
मग मी मरेन, राया ! कथितों मारूनि उच्च हाकेला ' ४०

---

१ विहिरींत. २ शत्रूची बायको–द्रौपदीसुद्धां. ३ भिंतीची बाजू. ४ आंधळ्याच्या पोरा. ५ अभिमान हाच आहे धनाच्या ठिकाणीं ज्याला अशा. ६ खोटें. ७ तरवारीला. ८ दुष्ट श्रेष्ठ. ९ वाईट नीती. १० विचारसागर १० इंद्राला. ११ भरत कुलाला डाग लावणारा.

पुत्रप्रियकर राजा आज्ञापुनियां निजानुगां[1] बरवी ।
जींत सहस्र स्तंभ[2] स्वर्णमणिखचित[3] असी सभा करवी ४१
आप्तांनीं विदुराला हा कपटद्यूतमंत्र[4] जाणविला, ।
मग त्या धृतराष्ट्रेंही तो बुद्धिसुधासमुद्र[5] आणविला ॥ ४२॥
नमुनि कवि ह्मणे, ‘ राया ! न द्यूतविचार हा मला रुचला।
त्यजुनि सहकार[6] पिकला पिकें[7] लाजेना वरावया कुचेला[8] ’
अंध ह्मणे, ‘ होऊं दे द्यूतक्रीडाविनोद भावांत,
अस्मन्निकट[9] तयांच्या न शिरेल दुराग्रह स्वभावांत ॥ ४४॥
होणें होतें, साधो ! चित्त तुझेंही न काळजी वाहो, ।
ज्याचें आचरण जसें त्या तैशा फलदं[10] काळ जीवा हो ! ’
क्षमेंहि[11] बुधोक्त[12] न रुचलें, रुचलें बालोक्त अक्षमहि, म्या तें
काय वदावें ? भुलला दोषज्ञहि[13] भूप अक्षमहिम्यातें[14] ॥४६॥
‘ धर्मासि सुहृद्द्यूतक्रीडार्थ[15] क्षिप्र आण जा, विदुरा ! ’
ऐसें वदे वचन, तें कविहृदयाशिच न कांपवी, भिदुरा[16] ४७
असकृद्धितोपदेशें[17] विदुर न शकला नृपासि वळवाया, ।
कीं तो पुत्रस्नेहें झाला सिद्ध स्वकीर्ति मळवाया ॥ ४८॥
धर्मासि निरोप हरिप्रस्थीं कटु केवळ स्वभावाचा,
चिंताम्लानच्छविनें[18] कविनें कथिला चळस्वभावाचा[19] ॥४९ ॥

---

१ आपल्या सेवकांना. २ खांब. ३ सुवर्णरत्नमंडित. ४ कपटानें द्यूत खेळण्याचा विचार. ५ बुद्धिरूप अमृताचा समुद्र. ६ आम्रवृक्ष. ७ कोकिळ. ८ विषवृक्ष. ९ आमच्याजवळ. १० फल देणारा. ११ समर्थही. १२ शाहण्या मनुष्यानें सांगितलेलें. १३ दोष जाणणारा असूनही. १४ द्यूताच्या मोठेपणाला. १५ मित्रां बरोबर द्यूत खेळण्याकरितां. १६ वज्राला. १७ पुष्कळ वेळां केलेल्या चांगल्या उपदेशानें. १८ चिंतेनें सुकली आहे कांति ज्याची अशा विदुरानें. १९ अस्थिरस्वभाव जो धृतराष्ट्र त्याचा.

धर्म ह्मणे, ' बापाजी ! ऐसें ह्मणतात काय हो तात ? ।
बहु उत्तम वचनकरा तारक गुरुचेचि पाय होतात ।५०।

चाला अवश्य येतों, भावि चुकेनाचि जें भलें खोटें, ।
अयश पुन्हां वृद्धपणीं गुरुचें होईल दुःख हें मोटें ॥ ५१॥

स्वप्नींहि अनेय न घडो, अपकीर्ति नसो, असें असेल मनीं ।
तरि तारील जगत्पति मज, सोलस जरि नसेन, तन्नमनीं ॥

युद्धास द्यूतासहि जावें, नाहीं ह्मणों नये, बा ! हे ।
माझी अशी प्रतिज्ञा सत्या अत्यादरोचिता आहे ' ॥५३॥

ऐसें वदोनि राजा सकुटुंब निघोनि गजपुरा आला; ।
त्याला पाहुनि आतां थोडा बहु हर्ष दुर्जना झाला ॥५४॥

---

## ४ उपसंहार.

भक्तमयूरकरें हें श्रीगुरुनें लिहिविलें सभापर्व, ।
कीं आर्यानंदाचें रसिकांची नित्य हो सभा पर्व ॥ १ ॥

---

१ पुढें होणारें. २ अन्याय. ३ जगाचा स्वामी. ४ आळशी. ५ त्याला नमस्कार करण्यांत. ६ फार मान देण्याला योग्य. ७ हस्तिनापुरा. ८ भगवद्भक्त जो मोरोपंत त्याच्या हातानें. ९ आर्यापासून होणाऱ्या आनंदाचें. १० उत्सव.

# ३ वनपर्व.

ज्यां श्रीमयूरकवि परि न परिसिला सकल कवि महीवरता, ।
साजेना कां तैशा त्या कविला सकल[1]कविमहीवरता ? ॥

---

१ सगळ्या कवींमध्यें श्रेष्ठपणा ( महीवर–राजा ).

## १ द्रौपदीविलाप.

‘ दुष्टांनीं नागविला कपटद्यूतांत धर्म’ हे वार्ता ।
जातां झाल्या यादवपांचाळमती महा[1]धिनें आर्ता[2] ॥ १ ॥
यादव पांचाळ वनीं आले भेटावयासि धर्मातें ।
निंदिति धृतराष्ट्राच्या तत्[3]तनयांच्याहि दुष्ट कर्मातें ॥ २ ॥
पाहोनि पांडवांचीं रूपें तो विश्व[4]भावन वनीं तीं ।
पावे त्या भावातें जो तापें होय भाव नव[5]नीतीं ॥ ३ ॥
कृष्ण ह्मणे, ‘बा! साधो ! स्वकृत[6]कुकृत आठवूनि रडतील, ।
छळ करिते छळक रितें[7] धनें यशें जीवनेंहि पडतील ’॥४॥
जिष्णु ह्मणे, ‘कृष्णा! तूं भगवान् विश्वेश विष्णु मज कळलें;
तत्त्व व्यासें कथिलें, कीं हें सद्भाग्य सत्फळीं फळलें ॥५॥
सत्य तुझा संकल्प प्रभुजी! जें कार्य तेंचि करिशील,
स्वपदाश्रित[8]जनतापलयतम तूं तरणि[9] तूर्ण हरिशील ’ ॥६॥
कृष्ण ह्मणे, ‘त्वत्प्रिय ते मत्प्रिय, भवद[10]हित तेचि मदहित रे
तुज मज जो न अनुसरे तो न भवा[11]ब्धींत एक पदहि तरे’
श्री[12]कृष्णा श्रीकृष्णा दावुनि खळपाणि[13]कृष्टकेश वदे,
उक्ति[14]कडे मन दे, परि नयन तदास्या[15]कडे न केशव दे ८

---

२ मोठ्या मनोव्यथेनें. २ पीडित. ३ त्याच्या मुलांच्या सुद्धां. ४ जग उत्पन्न करणारा कृष्ण. ५ लोण्यांत. ६ आपण केलेलें वाईट काम. ७ रिकामे. ८ आपल्या पायांचा आश्रय करणाऱ्या लोकांचा त्रिविध ताप हाच कोणी अंधकार. ९ सूर्य. १० तुझे शत्रु. ११ संसार सागरांत. १२ द्रौपदी. १३ दुष्टानें ( दुःशासनानें ) आपल्या हातानें ओढलेले केस. १४( तिच्या ) बोलण्याकडे. १५ तिच्या तोंडाकडे.

‘ हे केश धरुनि वोढुनि नेलें दुःशासनें सभेंत. सख्या ! ।
तेव्हां मज आठवली त्वत्पदयुगुली[1] सखी, न इतर सख्या ॥९
ईणेंचि राखिली बा ! लज्जा, उघडी पडों दिली न सती; । ।
यदुकुरुकीर्ति न उरती, जर मज हे ठाउकी किली[2] नसती १०
होते समीप पांचहि पति, अतिमति[3] हे, मनें उदासीनें; ।
ऱ्यां व्यसन[4] साहिलें तें न असेल विलोकिलें कुदासीनें[5] ११
सोडी पुनःपुन्हा खळ, न धरुनि लज्जा भया दया, लुगड्या।
उघडें पडतें वपु[6] तरि तूं अंतरतासि बा ! दयालु गड्या! १२
गुरु तात बंधु सुत हित कोणीच मला नसे; जिला असती।
तीस घडेल असें कां? हंसतील सतीजन[7] व्रता असती[8] ।१३।
स्त्रीलंघन[9] करित्यातें प्राकृतहि[10] न साहती, पहा, लावा ।
हा ! लावावा कर मज? वातेंहि[11] न, पदरही न हालावा १४
यांचीं शस्त्रें अस्त्रें दोर्दंडबळें[12] खळें वृथा[13] केलीं, ।
धिक् कष्टम्[14] ! सर्वयशें सुज्ञानें एकदां लया गेलीं ’ ॥१५॥
ऐसें वदोनि रडतां कृष्ण ह्मणे, ‘अंब! तूं नकोचि रडों, ।
कळवळतें मन्मन सखि ! या शोकाचळभरें[15] नको चिरडों ॥
सखि ! अखिलसतीपूज्ये[16]! मद्धैर्य तवाश्रुबिंदुसह[17] गळतें, ।
केवळ तुझेंचि न वदन, अमृतद्युतिगौर[18] मद्यशहि मळतें १७

---

१ तुझ्या पायांची जोडी–दोन पाय. २ किल्ली–युक्ति. ३ फार बुद्धिमान्. ४ संकट. ५ हलकट चटकीनें. ६ शरीर. ७ पातिव्रत्याला. ८ जारिणी. ९ बायकोचा अपमान. १० साधारण लोकसुद्धां. ११ वाऱ्यानेंसुद्धां. १२ बाहूंचें सामर्थ्य. १३ निष्फळ. १४ हायहाय ! १५ शोकरूपी पर्वताच्या वजनानें. १६ सर्व चांगल्या स्त्रियांना वंद्य जी तूं त्या हे द्रौपदि. १७ तुझ्या डोळ्यांतील पाण्याबरोबर. १८ चंद्राप्रमाणें शुभ्र.

तुज गांजिलें जिहीं त्यां ज्यांत यशोनाश अंगनाश[1] तशा ।
वरितील दशा, त्यांच्या शोकें रडतील अंगना[2] शतशा १८
अससी असीच धर्मी चित्तीं माझा धरूनि बोल टिकें, ।
झालें कधींच न मृषा, होईल मदुक्त काय हो! लटिकें? १९
होइल मद्वच न मृषा, केव्हां तरि वारिराशि[3] आटेल ।
ग्रहगण[4] गळेल, हिमगिरिराज[5] खचेल, क्षितीहि[6] फाटेल ' ॥
ऐसें ऐकुनि साध्वी मध्यमपतिच्या[7] मुखाकडे पाहे; ।
जिष्णु ह्मणे, 'या प्रभुच्या वचनीं विश्वास आमुचा आहे' ॥
धृष्टद्युम्न ह्मणे, 'कुरुगुरुभीष्मप्रभु जसा तसा द्रोण ।
खळकाळ[8] कां न झाले? पाहेल कुकर्म सभ्य तें कोण ? २२
वारावे मारावे खळ, तें केलें न कर्म दोघांनीं,
नय सोडुनि, अघं[9] जोडुनि, वद वांचावें कशास मोघांनीं[10]'? २३
कृष्ण ह्मणे, 'शिशुपाळप्रियसख यदुशत्रु शाल्व माराया ।
जरि गुंतलों न असतों, न श्रम हा पावतासि गा ! राया !
समयीं धांवत येतों, द्यूतातें कथुनि दोष राहवितों, ।
जरि न वळते विशृंखळ[11] खळ, खळखळ रक्तपूर वाहवितों ॥
पाहोनि राजसूयक्रतु जातां, शाल्वसंकटीं शिरलों; ।
तें शमलें, तों द्यूतव्यसन परिसतां तसाचि मी फिरलों २६
आतां काय उपाय ? व्यसन न तुमच्याचि हें गळां पडलें,
आह्मां सुहृदांच्या[12] ही; बा ! मत्पुर सर्व खळखळां रडलें २७

---

१ देहाचा नाश. २ स्त्रिया. ३ समुद्र. ४ तारकासमूह. ५ हिमालयपर्वत. ६ पृथ्वी सुद्धां. ७ मधला नवरा जो अर्जुन त्याच्या. ८ दुष्टांचा नाश करणारे ९ पाप. १० निष्फळ आहे आयुष्य ज्यांचें अशांनीं. ११ स्वेच्छाचारी. १२ मित्रांच्या सुद्धां.

सरतील क्षणलवसे लघु, केले अवधि अब्दें तेरा जे ।
त्वत्सम साधु न लागों देती स्वयशासि शब्द ते राजे. २८

---

## २ किरातार्जुनयुद्ध.

तरली चांडाळीहि न भावें वाहोनि शंकरा बेल, ।
हें जाणतां बुध न कां त्याच्या भजनीं विशंक राबेल? १
जिष्णूग्रतपें भ्याले सर्व तपःश्रीविलाससदन मुनी, ।
कैलासाप्रति जाउनि कथिती श्रीशंकरासि पद नमुनी । २।
भगवान् ह्मणे, 'न भ्यावें, त्याचा संकल्प शुद्ध, मी जाणें, ।
स्वस्थमनें स्वस्थानाप्रति, टाकुनि भीतिला, तुह्मीं जाणें ' ३
मुनि जातांचि, किरातत्वाच्छादन मूर्तिसंपदेवरि घे।
जेथें पार्थ तप करी, त्याचि वनीं सानुकंप देव रिघे ॥ ४ ॥
आला किरातरूपी शिव जिष्णुसमीप, तोंचि हननाश ।
दानव वराहरूपी मूकहि करि जो तपस्विजननाश ॥ ५ ॥
दुष्टासि एकदांचि प्रेक्षिति ते वीर पार्थ भव दोघे,
ह्मणती, ' शरप्रहारा, तापसजन 'हाय हाय' ! न वदो घे '
खरतर नरहरशर परजीवन एकक्षणींच संहरिती, ।
सम देवभक्त, ऐसें जाणों कळवावया असें करिती ॥ ७ ॥

---

१ क्षणाच्या लहान भागाप्रमाणें. २ वर्षें. ३ अर्जुनाच्या कडकडीत तपश्चर्येनें. ४ तपश्चर्यारूपी लक्ष्मीच्या क्रीडेचें स्थान. ५ किराताचा वेष हेंच आच्छादन. ६ शरीररूप संपत्तीवर. ७ सदय. ८ मारण्याची इच्छा आहे ज्याला. ९ दैत्य. १० डुकराचें रूप धारण करणारा. ११ मूक नांवाचा. १२ शंकर. १३ अतिशय तीक्ष्ण. [illegible]

अर्जुन म्हणे, ‘ किराता ! त्वां मृगयाधर्म लंघिला दर्पें[1], ।
स्वांतार्थ[2] मजपुढें अघ केलें, खगपति[3]पुढें जसें सर्पें ॥ ८ ।
हा प्रथम मत्परिग्रह[4] असतां, त्वां ताडिलें कसें किरितें[5] ?॥
पाथरवटें[6] स्वटंकें[7] भेदावें वज्रपाणिसह[8] गिरितें[9] !’॥ ९ ॥
त्यासि किरात ह्मणे, ‘ रे ! मद्धन हें, प्रथम म्यांचि हा पिटिला,
म्यां वधिला असतां, तूं कोण शरें हाणणार या किटिलें[10] ?॥
मिरविसि सुज्ञत्व वृथा, अन्याला स्वकृत ताप लाऊनी, ।
काय न दगड तपस्वी ? भिजला वृष्टींत तापला ऊनीं ११
जोडुनि पुण्यवनीं तप, बुडसी त्याच्या भरेंचि गर्वतमीं[11], ।
तूं मजपुढें किती रे ! कोण हरिपुढें[12] ह्मणेल पर्वत मी ?१२
हो सिद्ध, जरि असेल स्वतपोबलगर्व, सज्ज चाप करीं, ।
होशील विमद[13], पडला गरुडाच्या जेंवि मत्त साप करीं ’ ॥
तें वाक्य अर्जुनाला, गरळ[14] जसें यामुनाह्रदा[15] कढवी, ।
पढवी जो चापश्रुति[16] रामासि[17] तयावरि स्वधनु चढवी ॥१४॥
शर ते जाणों वाहे एकनिमेषांत एक लाखोली, ।
प्रभुची जाणेल कसा बाहुबळें तोचि एकला खोली ? ।१५
स्वरवें[18] गिळों न देते केवलहि[19] सिंहा विदारितेभा[20] ते ।
सरले शर, दोन्हीही झाले सहसा तदा रिते भाते ॥ १६ ॥

---

१ गर्वानें. २ आपल्या नाशाकरितां. ३ गरुडापुढें. ४ माझी शिकार. ५ डुकराला. ६ दगड फोडणाऱ्यानें. ७ आपल्या टांकीनें. ८ इंद्राबरोबर. ९ पर्वताला. १० डुकराला. ११ गर्वरूपी काळोखांत. १२ इंद्रासमोर. १३ गर्वरहित. १४ विष. १५ यमुनेच्या डोहाला. १६ धनुर्वेद. १७ परशुरामाला. १८ आपल्या आवाजानें. १९ घांससुद्धां. २० फाडून टाकला आहे हत्ती ज्यानें अशा सिंहाला.

भ्याला, परि धैर्य धरुनि, ताडी त्या ईश्वरासि कोदंडें[1], ।
देता विश्व कवळित्यां[2] उग्रा काळासि कंप जो दंडें ॥ १७ ॥
जें युद्धांत ह्मणे, ' हो ! भास्करजी ! न करजाल[3] विकिरीं[4] ' तें
गांडीव धनुहि हरिलें कामाद्यरिमदतमोरविकिरातें[5] ॥ १८॥
ज्याचा पाद[6] ह्मणे,' रे ! भक्तभवा[7] ! स्वकुदशा न कर, वाळ'।
त्यावरि धनंजयाचा[9] भंगे पावे यशा न, करवाळ[8] ॥ १९ ॥
प्रभुला जिंकूं पाहे भुजयुद्धीं, जेंवि काजवा सवित्या,
परि तोषवी स्वधर्में आराधुनि भक्तराज वासवि त्या । २० ।
' मृत्युभयासि तराया न जडसुधेचें[10] धरा चिबुक[11] ' लीला ।
ज्याच्या असें सुरांसहि ह्मणती, तो प्रभु बराचि बुकलीला ॥
शोणित वमला, श्रमला, भ्रमला, गमला नुठेलसा पडतां, ।
परि उठला, मोह कसा राहेल ? दयाकटाक्ष सांपडतां ।२२।
पाहति न जाहलें जें पूर्वीं कौतुक कदापि नाकी[12] तें,
विजयार्थ शरण गेला नर नतकामदपदा[13] पिनाकीतें[14] ।२३।
वाहे पार्थिवलिंगीं भावें जें माल्य[15] तो प्रतापार्थ ।
पाहे तेंचि पुरस्थस्वमर्दनकिरातमस्तकीं[16] पार्थ ॥ २४ ॥
प्रभुला प्रभुप्रसादें त्या माल्यें करुनि वोळखे दास, ।
तो पात्र होय गरुडातिक्रमकर[17] जेंवि टोळ खेदास ॥ २५॥

---

१ धनुष्यानें. २ घांस करणाऱ्या—खाऊन टाकणाऱ्या. ३ किरणांचा समूह. ४ पसरा. ५ काम आदिकरून शत्रूंच्या गर्वरूपी काळोखाचा सूर्याप्रमाणें नाश करणारा जो किरात त्यानें. ६ पाय. ७ भक्ताच्या संसारा. ८ तरवार. ९ अर्जुन. १० जड अमृताचें. ११ हनुवटी. १२ देव. १३ भक्तांचे काम पुरविणारे आहेत चरण ज्याचे तो शिव त्याला. १४ शंकराला. १५ फूल. १६ पुढें असणाऱ्या व आपला गर्व हरण करणाऱ्या किराताच्या डोक्यावर.

पाय धरुनि पार्थ ह्मणे, ' ब्रह्मांडीं अघ न मार्थे बा ! पाहें ।
तूंचि हरीं पंकें, हरिल अमृताचा न घन मायबापा ! हें २६

प्रभुजी ! क्षमा करा, जी मागतसें पसरुनि स्व पदरा मी, ।
या दासींहि करो हें पदयुग, जैसें करी स्वपद रामीं '॥२७॥

त्यजुनि विचार, कराया इच्छित होता बळें पारिभवातें, ।
लंघन असह्य गुरुला, स्वसभाजन वाटलें पारि भवातें ।२८।

नमुनि ' क्षमस्व ' ह्मणतां, प्रकट करुनि रूप, बाहुनीं कवळी
अधरोंप्रति स्मितानें स्वयशानें त्रिभुवनासही धवळी ॥२९॥

तो दीनबंधु उँजरी देउनियां अभय पाशुपत नातें; ।
बोले असें, हरी जो स्वपद स्मरतांचि आशु पतनातें ।३०।

' सर्वत्र रणीं विजयी तूं नारायणसखा नरा ! हो रे ! ।
स्वप्नींहि अयश तुझिया अवलंबुनि पदनखा न राहो रे! ' ।

न कळतहि नाम घेतां पाप्यासहि जो म्हणोनि 'ओ' तारी, ।
गेला संकल्पेंचि ब्रह्मांडें निर्मिणार ओतारी ॥ ३२ ॥

---

१ मावेल–राहील. २ पाप. ३ आपलें पूजन. ४ ओंठाला.
५ पांढरें केलें. ६ सरळ करी. ७ अस्त्राचें नांव. ८ लवकर.
९ ओतणारा.

# ३ अर्जुनविलोभन.

मग वरुण धनंद[1] पितृपति[2] सुरपति हे लोकपाळवर आले, ।
इंद्रेतर सर्वहि ते स्वास्त्रें पार्थासि अर्पिते झाले ॥ १ ॥

शक्र म्हणे, ‘स्वर्गीं यें, रथ तुज आणावयासि धाडीन, ।
अस्त्रें देउनि पुत्रा ! तुजकरवीं स्वाहितांसि[3] नाडीन’ ॥ २ ॥

ते लोकपाल गेले मग रथ घेऊनि मातली[4] आला, ।
नमुनि ह्मणे, ‘अर्जुनजी ! तात बहोतो[5], बसा रथीं, चाला’ ३

शुचि होउनि मातलिला दिव्य रथीं बैसवूनि मग चढला ।
सदतिक्रम[6] करिल कसा जो धर्म न्याय गुरुमुखें पढला ।४।

अमरावतीस जाउनि राहिंवरवी तो गुणाढ्य[7] मघव्याला[8] ।
व्याला न साधुला जो लाजो तो बाप मूर्त अघ[9] व्याला ।५।

जातांचि पार्थ मोही स्वगुणें तत्काळ त्या सुरसभेला, ।
न पिपीलिकसेनेसहि[10] सुसितेचाही[11] तसा सुरस भेलो[12] ॥६॥

बसवुनि निजासनीं हरि करि पुत्रस्नेह जें जसें करवी, ।
शिर हुंगी आलिंगी फिरवी तनुवरि सुधेसि[13] जो कर[14]वी ७

देवाकरवीं बरवी करवी नरवीरसूनुची[15] अर्चा[16] ।
शोभे तसा स्वतेजें देवेंद्र तसाचि तो महावर्चा[17] ॥ ८ ॥

---

१ कुबेर. २ यम. ३ आपल्या शत्रूंना. ४ इंद्राचा सारथि. ५ बोलावतो. ६ साधूंचा अमर्यादा. ७ गुणशाली. ८ इंद्राला. ९ पाप. १० मुंग्यांच्या समूहालाही. ११ उत्तम साखरेचाही. १२ गोळा. १३ अमृताला १४ उत्पन्न करी. १५ अर्जुनाची. १६ पजा. १७ अति तेजस्वी.

प्रेमें वज्राद्यस्त्रें हरि देता जाहला स्वतनयातें,
पात्रचि पितृसर्वस्वाप्रति जो जाणे भलासुत नयातें ॥ ९ ॥
मग पार्थ चित्रसेनापासुनि अत्यंत आदरें सकळा, ।
इंद्राज्ञेनें शिकला निरुपमवाद्य[1]नृत्यगीतकळा ॥ १० ॥
जरि पार्थ पांच वर्षें वसला स्वर्गीं पित्याचिया भवनीं,[2] ।
भ्रात्यांला न विसरला, खिन्नचि होता तसा तदा, न वनीं ॥
एकांतीं इंद्र ह्मणे त्या गंधर्वेंद्रचित्रसेनातें, ।
' स्वर्गींहि खिन्न सुत जरि हें वैभव काय ? काय हें नातें ?

गुणवत्कलत्र[3]विरहज्वरिता सुखहेतु शुचिर[4]तापचिती, ।
स्पष्ट तदन्या[5] जी जी पूजा देणार सुचिर[6] तापचि ती ।१३।
स्पर्शो शृंगारसुधा[7]निधिची धृत[8]मूर्ति उर्वशी लहरी,[9] ।
सुतविकळत्व[10] हरो, जसि सत्संगति सर्व उर्वशीलें[11] हरी ॥
देखत होता सादर सुत, जैं स्मित[12]पूर्व साभिनय[13] नाचे, ।
प्रकटी विलास नटतां बहु ती गंभीर[14]नाभि नयनाचे. ' ।१५
तो तीस ह्मणे ' सुंदरि ! जो तुज मागोनि दत्त सुख नेतो ।
माझ्या वदनें कांहीं प्रार्थितसे सुगुणरत्न[15]खने ! तो ।१६ ।
या स्वर्गीं मूर्तिमती तूंचि सुधा, जी प्रसिद्ध असुधा ती, ।
न तिच्या पानें जैसे त्वदधर[16]पानें क्षणांत असु[17] धाती[18] ॥१८॥

---

१ वाद्य. २ गृहांत. ३ गुणवती स्त्रीच्या वियोगानें दुःखित जो त्याला. ४ शृंगाररसरूप पूजा. ५ तिच्याहून दुसरी. ६ फार. ७ शृंगाररूपी अमृताच्या सागराची. ८ मूर्तिमती. ९ लाट. १० पुत्राचा खिन्नपणा. ११ दुष्टस्वभाव- १२ किंचित् हंसून. १३ अंगविक्षेपांसह. १४ खोल आहे नाभि जिची अशी. १५ उत्तम गुणरूपी रत्नांच्या चांगल्या खाणी. १६ तुझ्या ओठांच्या चुंबनानें. १७ प्राण. १८ संतुष्ट होतात.

यास्तव या स्वर्गीं हा पुरुषोत्तम पार्थ पात्र सुरसा, हो ! ।
परि तृप्त येथ येउनि सेवुनियां याचि मात्र सुरसा हो’१८

देवी स्मित करुनि ह्मणे, ‘गंधर्वपते उदंड आजवर ।
प्रभुनें काम पुरविले, परि मज दिधला अनर्घ्य[1] आज वर ।
येंऊ देईल मुखीं कां प्रवरप्रेम[2]काम मन्मथ[3] न ? ।
कोपें करील सोडुनि पांचाहि शिलीमुखांसि[4] मन्मथन[5] ।२०।
गंधर्वपते ! जा तूं, हा जन बहु आजि सुखविला साचा ।
भेटेन त्या प्रिया मी पाहुनियां समय सुखविलासाचा’ ११

जीच्या सुरसवपु[6]पुढें खालें वदनासि अमृतसर[7] घाली ।
ती जाय त्याकडे, जासि सुमधुकडे[8] वेग करुनि सरघाली[9]२२
श्रृंगारमानसींच्या पाहुनि तो पार्थ त्या मरालीला[10] ।
उठला, तशीच पूज्या ती स्त्री शतमख[11]मुखामरालीला ।२३।
स्वकरें आसन देउनि नमुनि करी पार्थ तत्सभाजन[12] हो ।
‘ मज आज्ञा काय ? ’ ह्मणे परिसा साधुत्व सत्सभाजन, हो
ती उर्वशी ह्मणे, ‘ गा ! कीर्तिश्रीच्या नृमूर्तिकरवीरा[13] ! ।
शक्रोक्तें स्वरसेंही[14] आल्यें, मत्कामपूर्ति[15] कर वीरा ! ॥२५॥
करितां नृत्य मजकडे पाहत होतासि, त्या पहाण्यानें ।
सूचविलें त्वदभिलषित[16] हरि[17]लें मजलाहि त्या[18] शहाण्यानें२६

---

१ अमोल. २ उत्तम पुरुषाविषयीं कामेच्छा. ३ मदन. ४ बाणांस. ५ माझा नाश. ६ सुंदर शरीरापुढें. ७ अमृताचें सरोवर. ८ चांगल्या मधाकडे. ९ मधमाशांची ओळ. १० हंसीला. ११ इंद्रादि देवांच्या पंक्तीला. १२ तिची पूजा. १३ मनुष्यरूपी करवीर पुष्पा. १४ स्वतः-च्या प्रीतीनेंही. १५ माझ्या इच्छेची पूर्णता. १६ तुझी इच्छा. १७ इंद्राला. १८ चित्रसेनानें.

जाणोनि त्वद्गुरुचें प्रिय हें त्वन्मित्रचित्रसेनमुखें ।
अनुसरल्यें तुज, सुजना ! नीरजनयना ! करीं विलास सुखें'

कर्णांवरि कर ठेवुनि 'शिव! शिव! हर! हर! ' असें ह्मणे नर तो ।
' माते! हा पुत्र रतो भजनीं, परि म्हणसि तूं तसें न रतो

माद्री पृथा शची तूं मज तुल्या, योग्य हे नसे तूतें, ।
परि रक्षिति प्रयत्नें गुरुजन तों भांगिती न सेतूतें ॥ २९ ॥

ऐसें पाहत होतों कीं हे नारायणोरुजा औीर्या ।
पूर्वज पुरूरव्याची श्रीपतिची श्री जसी तसी भार्या ' ।३०।

हांसोनि ह्मणे देवी, 'आह्मां देवींस अघ असेना तें ।
जाणत नव्हते रमले पौरव, तें काय तुज असे नातें ? ३१

लावूं नयेचि सुज्ञें भुक्तोच्छिष्टत्व अघ नव सुधेतें, ।
स्वजनकभुक्ता माता ह्मणुनि त्यजिती सुधी न वसुधेतें ३२

आल्यें स्वयें तुजकडे कामार्ता स्त्री, ह्मणोन कोमळ हो, ।
मद्भोगासि सुकृतफळ ह्मणति सकळ, तूं ह्मणो नको मळ हो'

पावे न शुकापासुनि कर जोडुनि शरण जाय परि रंभा, ।
तद्वत् नारायणसखमुनिपासुनि उर्वशीहि परिरंभा ।। ३४ ॥

पार्थ ह्मणे, 'तूं माता, मी सुत, धर्मज्ञ नर, न वानर कीं ।
पडतां गळांहि गुरुनीं द्यावा जाया न वर नवा नरकीं ३५

---

१ तुझ्या बापाचें-इंद्राचें. २ कमलनेत्रा. ३ इंद्राची पत्नी. ४ नारायणाच्या मांडीपासून झालेली. ५ साध्वी. ६ भोगल्यामुळें उष्टेपणा. ७ शाहाणे लोक. ८ पृथ्वीला. ९ कामानें पीडित झालेली. १० दयाळु. ११ नारायणाच्या मित्रापासून ( अर्जुनापासून ). १२ आलिंगनाला.

हो सुप्रसन्नमति, हा जननि! जन निज न निमग्न नरकीं हो
अमर नव्हें, पशुहि नव्हें, मी त्वदुरजान्वयोत्थ[1] नर कीं हो '
क्षोभे, प्रसन्न व्हावें, परि मन कामासि तें वश स्त्रीचें, ।
' हो क्लीबे[2] ' असें शापी, उग्रत्व तिचें तसें न शस्त्रीचें[3] ३७

शक्र म्हणे, 'बा साधो ! करिता तूं एक शुद्ध तप शुकसा ।
तूंचि नर, इतर वानर, इंद्रियविषयैकनिष्ठ[4] न पशु कसा ?
दिव्य विषयार्णवीं[5] तूं बोधनलस्पृष्ट[6] साधु पर्वत रे ! ।
छायाग्रहासि[7] कपिशा[8], या विषया विरल जन, न सर्व तरे

अज्ञातवासकाळीं हा बहु येईल शाप कामाला, ।
मातेचा अस्नेहहि[9] होय यशोहेतु[10] साधुरामाला ' ॥ ४० ॥

---

## ४ नलदमयंतीवियोग.

' द्यूत कर ' असें शिकवी मग नलदायाद[11] पुष्कराशि कली,।
न शिकावें परि तन्मति त्या दुर्मंत्रीं[12] सुदुष्करा[13] शिकली ।१।

पुष्कर ह्मणे, 'करावें द्यूत' नल ह्मणे, 'अहा ! भलें सुचलें ।
अमृतापरीस माझ्या कर्णयुगाला[14] त्वदुक्त हें रुचलें ' ॥२॥

---

१ तुझ्या उदरापासून उत्पन्न झालेल्या वंशांत निर्माण झालेला. २ षंढ. ३ शस्त्र धारण करणाऱ्याचें. ४ इंद्रियजन्यसुखांतच मग्न. ५ विषयरूप सागरांत. ६ उपदेशरूप नलवानरानें स्पर्शिला असा. ७ सांवलीच्या आकर्षणाला. ८ मारुतीप्रमाणें. ९ अप्रीति–राग. १० कीर्तीचें कारण. ११ नलाचा नातलग. १२ दुष्ट मसलतीला. १३ फार कठिण अशा. १४ दोन कानांला.

द्यूतीं आनंद जयें थोडा त्या पुष्करासि, अति कलिला, ।
हानि नलाला नुमजे, केली मालिनें शिरोनि मति कलिलें[1] ३

दुष्कर साधन जीचें त्या श्रीतें[2] मेळवूनि पुष्करसा[3] ।
पुष्कर साजे, नलतनु जसि सरसी[4] ग्रीष्मकाळें[5] शुष्करसा ४

बहुमास भरीं भरला, प्रियसख सचिवांसि विसरला निपट, ।
स्त्रीहि श्रीहि बहु रडे, कलिनें दाटून पाडिलें विपट[6] ॥ ५ ॥

सर्वस्वनाश होतां सचिवमतें ती करूनि यत्नातें, ।
धाडी माहेराला रथरत्नासह[7] अपत्यरत्नातें[8] ॥ ६ ॥

सर्वस्व हरुनि पुष्कर नलराजाला ह्मणे, ‘उदारपणें ।
शेवट गोड करावा द्यूतरसाचा तुवां सदारपणें[9] ’ ॥ ७ ॥

गरळरसांच्या[10] अब्दें[11] या तच्छब्दें अतीव तळमळला ।
परि न दुरुक्तें आपण तो पुण्यश्लोक धीर नळ मळला ८

जाय विभूषण[12] दारानुगत[13] नल त्यागुनि स्वनगरातें; ।
बहु लाजवी ह्मणति तें जो हा! हा! पौर तो स्वन[14]गरातें

त्या पुण्यश्लोकाला आश्रय देती न दिन पुरोपवन[15], ।
नल जठराग्नीस ह्मणे, ‘जळ कीं तुज तृप्तिला पुरो पवन[16] ’

पुष्करभयें न पुसती कोणीही आप्त त्या नळाला हो !
हिंडे वनोवनीं तो अन्नावांचूनि बहु गळाला हो ॥ ११ ॥

---

१ मलिन. २ लक्ष्मीतें. ३ कमलाप्रमाणें. ४ सरोवर. ५ उन्हाळ्यामुळें आटलें आहे पाणी ज्यामधलें असें (सरोवर). ६ फूट. ७ उत्तम रथांतून. ८ उत्तम मुलांना. ९ बायकोच्या पणानें. १० विषाच्या. ११ मेघानें. १२ अलंकाररहित. १३ बायको आहे बरोबर ज्याच्या असा. १४ शब्द. १५ नगरांतील बाग. १६ वारा.

यत्पादतलमृदुत्वें[1] लाजावें कामधेनुनवनीतें, ।
वर[2] मिथुन[3] पादचारें हिंडे, पावे फळेंहि न वनीं तें । १२ ।

हेमच्छद[4] खग[5] पाहुनि कल्पी आहारहेमलाभ[6] वनीं, ।
वस्त्रें धरी ह्मणे हो! ‘ प्राप्त न झालेंचि हें मला भवनीं ’ । १३ ।

वस्त्रीं धरितां गेले वस्त्र हरुनि ते उडोनि खग नीच, ।
‘वस्त्रहर[7] अक्ष[8] ’ ऐसें कळवुनि झाले अदृश्य गगनींच १४ ।

वनदेवता न पाहों सकती लज्जानतां[9] नलास्याला; ।
करिति न रोमंथाला[10] हरिण, मयूरहि तदा न लास्याला[11] १५

साध्वीनें स्वपटार्धें[12] स्वतनू तसि झांकिली स्वपतितनु ती
वेदहि अशा सतीची करिति सदा, परि न पळहि पतित नुती[13]।

वर्णी नदीनगांतें दावूनि तिला विदर्भदेशपथ, ।
त्याग समजोनि रडतां समजावुनि नल सतीस दे शपथ१७

एका सभेंत[14] रात्रौ निजला मग आठवूनि निजलीला ।
कलिमलिनबुद्धि नल तो सोडूं पाहे श्रमोनि निजलीला १८

‘ जावें कसें न कळतां ? मज पाशाचे दारसंग हा निपट
आपण असोनि अक्षत होऊं देइल न संगहानि पट ।१९।

फाडावा स्वकरें तरि आतां पट जागवील निजलीला ।
होता मदर्थ[15] जरि हारि असि[16] असि म्हणता दुजी न निजलीला’

---

१ ज्याच्या तळपायाच्या मऊपणानें २ श्रेष्ट. ३ जोडपें. ४ सुवर्णपक्ष. ५ पक्षी. ६ खाण्याचा पदार्थ व सोनें मिळणें. ७ वस्त्र नेणारे. ८ फांसे ९ लज्जेनें अधोमुख जो नल त्याला. १० रवंथाला. ११ नृत्याला. १२ आपल्या अर्ध्या वस्त्रानें. १३ प्रशंसा. १४ धर्मशाळेंत. १५ माझ्या करितां. १६ तरवार.

शोधुनि सभा पहावी ऐसी आधीं दिली नळास मती, ।
मग खड्गलता कलिनें, वाटे त्या सुकृतसत्फळासम ती २१
कलियोगें जें धरिलें रायें तीक्ष्णत्व कापितां वस्त्रा ।
न धरील कधींहि तसें शाणेशितें गरळलेपनें वस्त्रा । २२ ।
खड्गें पट कापविला न तिचा अर्धा गळाचि तो कलिनें. ।
न मळावेंचि कधीं तें प्रेम कसें मळविलें खळें मलिनें ?२३
जाय पुन्हा नल परते, पाहे येउनि तिच्या मुखाला हो ! ।
साश्रु नल ह्मणे, 'देवा ! हे वामाक्षी सती सुखा लाहो'
जाय पुढें, ये मागें, परतोनि सवेंचि जेंवि दोलों हो ! ।
तो लाहो भेटीचा घे कीं न पुढें स्वदृष्टि लोलो हो ॥२५॥
'विश्वंभरे ! क्षमे ! ह्या साध्वीला रक्ष, म्यां निरेविली हो !
सर्वसहे[10]! तुजपुढें न स्वाधिकता इणें मिरविली हो ! २६
बापा ! सतिव्रता ! हे तुज बहु जपली, न जीवितासि सती,
तूंहि हिला बहु जप गा ! त्वां त्यजिल्या न स्त्रिया बऱ्या दिसती'
कलि दमयंतीप्रेमा हे दोघे वोढिती नळाला हो ! ।
प्रेम्याला त्याचें मन सांपडलें, देह त्या खळाला हो ! ।२८
सत्याश्रित गुणमय शुचि[11] कापुनि घे, परि न देचि हांक, पट,
पुण्यश्लोकीं राहुनि उघडिल त्याचेंचि केंवि हा कपट ? २९
नल गेल्यावरि कलिनें जागविली कीं तिचे असु[12] खपावे, ।
पति न दिसतां ह्मणे, 'हा !' राज्यभ्रंशें न ती असुखें[13] पावे ॥

---

१ पुण्याच्या उत्तम फळाप्रमाणें. २ सहाणेवर पाजविण्यानें. ३ सुंदर आहेत नेत्र जिचे अशी. ४ पावो. ५ झोंपाळा. ६ चंचल. ७ पृथ्वि. ८ पृथ्वि. ९ स्वाधीन केली. १० पृथ्वि. ११ निर्मल. १२ प्राण. १३ दुःख.

'अजि नाथ! अहो नरवर! अजि इकडे एकवेळ हेरीं हो!
एकोकी जाल कसे? दासी सेवा करील हे, राहो ॥ ३१ ॥
चुकल्यें, क्षमा करा जी! न चुकेन पुढें कदापि सत्कार्या, ।
त्यजिली दया अकस्मात्, त्यागार्हा काय तीहि सत्कार्या? ॥
माझें मन बहु तुमचा चिंतूनि असाधुवाद तळमळतें, ।
अजि पुण्यश्लोक! पहा मत्त्यागें कीर्तिपादतळें मळतें' ३३
व्याघ्रालाही रडवी भ्रमतां गहनीं तदा विलाप तिचा, ।
पदमुद्रित पंथहि तिला कलिवशदेवें न दाविला पतिचा ३४

---

## ५ यक्षप्रश्न.

सरला वनवास, मग द्वैतवनीं पांडुनंदन वसति, तें ।
दिवसांत वांकुल्या शत दावित होतेंचि नंदनवेसतितें ॥ १ ॥
विप्रांशिं आधि तेथें बहु दे जो हरिण हरुनि अरणीतें, ।
तन्मारणीं करिति ते, कौशल केलें कधींहि न रणीं तें ॥ २ ॥

---

१ पाहा. २ एकटे. ३ चांगल्या कामाला. ४ टाकण्यास योग्य. ५ सत्कारपात्र. ६ खोटें बोलणें. ७ कीर्तीच्या चरणांचा तळ–खालचा भाग. ८ अरण्यांत. ९ पायांच्या खुणा ज्यामध्यें आहेत असा. १० मार्ग सुद्धां. ११ कलीच्या ताब्यांत असलेल्या (तिच्या) नशिबानें. १२ नंदनवनांतील रहाण्याला. १३ ब्राह्मणाला. १४ त्रास. १५ यज्ञांतील पवित्र अग्नि ज्यापासून उत्पन्न करतात त्या लांकडांना.

शृंगाग्रविलग्नारणि[1] तो मृग गेलाचि, लागले होते ।
त्यामागें, जे फाराचि पांचहि नरसिंह[2] भागले, हो ! ते ।३।
भेटे वनीं अकस्मात् तापापह[3] साधुसाचि एक वट, ।
तच्छीतच्छायेतें सेविति ते तृषित वीर एकवट ॥ ४ ॥
धर्मचि धैर्यें साहे सोसील व्यसन काय दुसरा तें ? ।
नकुळ तदाज्ञा घेउनि आणाया तोय जाय सुसरातें[5] ॥ ५ ॥
उष्णें झाला होता तप्त[6] तृषित जेंवि धेनुसुत डोंगं, ।
धांवे, तरंगहस्तें[7] जाणों पाचारिलाचि सुतडागें ॥ ६ ॥
तों यक्ष ह्मणे, ' बापा ! आधीं सेवूं नकोचि तोयातें, ।
मत्प्रश्नोत्तरदाता[9] प्याया न्यायाहि योग्य तो यांतें[10] ' ॥ ७ ॥
करुनि अनादर पीतां पडला तो धैर्यमेरु[11] ही नकुळ, ।
किमपि न वदे, न पाहे, पतित श्रीमंत जेंवि हीनकुळ[12] ।८।
मग सहदेव धनंजय भीमहि पडले तसेचि जळपानें; ।
गमले वधिले ते त्या स्वह्रदतटीं[13] कालियाख्यखळपानें[14] ॥९॥
धर्म ह्मणे, ' हा ! दैवा ! न कळे झाला अनर्थ काय कसा ?
मज बंधु एक तरि जळ द्याया यावाचि शीघ्र[15] सायकसा[16] ॥
हा ! रे ! कितवा[17] ! धर्मा ! स्वकृतें निजजीवितासि आंचव वे,
धिक् धिक् ह्मणोमि, विटते द्यूत न करितास बंधु कां चवे? '

---

१ शिंगाच्या टोंकांत अडकल्या अरणी ज्याच्या असा (मृग.) २ मनुष्यश्रेष्ठ. ३ दुःख नाहींसें करणारा. ४ प्राणी. ५ उत्तम सरोवराला. ६ तापलेला. ७ लाटा हेच हात त्यांनीं. ८ चांगल्या सरोवरानें. ९ माझ्या प्रश्नाचें उत्तर देणारा. १० तोयातें. ११ धैर्याचा पर्वत—अत्यंत धैर्यवान्. १२ हलक्या कुळांत जन्मलेला. १३ आपल्या डोहाच्या कांठावर. १४ कालिया नांवाच्या दुष्टश्रेष्ठानें. १५ लवकर. १६ बाणाप्रमाणें. १७ जुगाऱ्या.

ऐसें ह्मणोनि जाउनि धर्म ते बंधु पाहिले शवसे[1];
साधूंत अहंताशी[2] ज्यांमध्यें चेतना न लेश वसे ॥ १२ ॥
‘ हा ! भीम ! हा ! धनंजय ! न स्वर्गीं सुख पहाल, हा ! नकुळा !
हा ! सहदेवा ! दोष त्यजितां मज काय हा लहान कुळा ? ॥
गेलासि केंवि भीमा ! त्यागुनियां मज गुरुप्रति ज्ञात्या ! ।
त्यजिल्या सुयोधनोरुध्वंसादि[3] कशा गुरु[4] प्रतिज्ञा त्या ? १४
वत्सा ! न भंगलासि प्रभुशींहि[5] करुनि तशाहि विषम[6] रणा ;
कालविलें काय जळीं त्या दुष्टांहीं वशाहिविषें[7] मरणा ? १५
विष कालविलें असतें, तरि सलिलीं[8] करपती न कां नलिनें[9] ?
अलिनें[10] त्यजिलीं असतीं, होतीं तुमचींहि आननें[11] मलिनें ॥
गेलां स्वर्गासि, बरें, जा, परि कवणासि हा निरविला[12], हो !
अत्यद्भुत हें ह्मणतिल ‘ न कधींही पद्महानि[13] रविला हो ’ ॥
यामागें न, व्यसनीं[14] आजि बुडालों, जळीं महोपळसा[15], ।
रे मुग्ध[16] जीवशुक ! जा सोडुनियां, लुब्ध या न हो पळसा ॥
मेले कसे अकस्मात् ? तेज असे, ह्मणुनि होय न व्याधी,
तर्क न चाले बहुधा, माझी तृष्णाकुलाचि[17] भव्या[18] धी[19] ।१९।
प्रियबंधुमरणकारण शोधूं, जलपान करुनि, तर्कशतें, ।
जें क्षुत्तृट्प्रतिबंधा[20] न गणी, मुनिचेंचि हृदय कर्कश तें. ’ २०

---

१ प्रेताप्रमाणें. २ मीपणाप्रमाणें. ३ दुर्योधनाच्या मांड्या मोडून टाकणें वगैरे. ४ मोठ्या. ५ शंकराबरोबर सुद्धां. ६ कठिण. ७ वश केलेल्या सर्पाचें विष. ८ पाण्यांत. ९ कमळें. १० भ्रमरानें. ११ तोंडें. १२ स्वाधीन केला. १३ कमलांची हानि. १४ संकटांत. १५ मोठ्या दगडाप्रमाणें. १६ मूर्ख. १७ ताहानेनें व्याकुळच. १८ मोठी. १९ बुद्धि. २० भूक व तहान यांच्या विरोधाला.

चिंतुनि ऐसें प्याया गेला जों साधु दक्ष तोयातें ।
विनिवारी तोंचि सरस्तटगत बकरूप यक्ष तो यातें ॥२१॥
' रे कौंतेया ! केले अनुज तुझे प्रेतरूप म्यां चवघे,
तूं तरि यांच, हॅठें जळ सेवुनि मरतां उगेचि कां अवघे ? ॥
मत्प्रश्नाचें उत्तर दे, जल सेवूं नकोचि थांब कसा. ' ।
धर्म ह्मणे, ' ऐसा तूं कोण प्रभु, जाहलासि कां बकसा ? '॥
' मी यक्ष ' असें सांगे दावी प्रकटुनि शरीर पर्वतसें, ।
पूर्वीं कधींहि झालें प्राप्त न आश्चर्यभीतिपर्व तसें ॥ २४ ॥
धर्म ह्मणे, ' अग्निपुढें पांडित्य करील काय कापूस ? ।
कळल्या उत्तर देइन, पुसणें तें यक्षनायका ! पूस ' ।२५।
यक्षातेंचि न निववी नृपदत्त प्रश्नशतसमुत्तर तें ।
सुश्रोतृवृंद ज्याच्या श्रवणें होऊनि बहु समुत् तरतें ॥२६॥
यक्ष ह्मणे, ' कौंतेया ! या पांडित्यें गुरूहि तुज लाजो, ।
झालों प्रसन्न चवघांमाजि उठो एक इष्ट तुजला जो. ' २७
धर्म ह्मणे, ' नकुळ उठो.' यक्ष ह्मणे, 'मान्य जे शतक्रतुला,
भीम नको, विजय नको, आवडलें त्यजुनि अमृत तक्र तुला ?'
धर्म ह्मणे, ' बा ! यक्षा ! मज तों माद्री पृथा समा, नांवें ।
दोघींचीहि असावीं, म्यां अधिक उणें कधीं न मानावें. २९
उरलों मी कुंतीचा, माद्रीचा ज्येष्ठ पुत्र उरवा हो ! ।
स्वर्गीं न अश्रुधारा त्या मातेचें कदापि उर वाहो. ' ॥३०॥

---

१ कुशल. २ सरोवराच्या कांठावर असणारा. ३ कुंती-पुत्रा-धर्मा. ४ हट्टानें. ५ आश्चर्य व भय ह्यांची पर्वणी. ६ शंभर प्रश्नांचीं उत्तम उत्तरें. ७ चांगल्या श्रोत्यांचा समूह. ८ प्रीतियुक्त असें. ९ इंद्राला. १० सारख्या.

यक्ष ह्मणे, ' बा! साधो! तूंचि परम धन्य भरतसंतानीं '।
तुझिया यशीं निवाया नित्य असावेंचि भरत संतांनीं॥३१॥
पाहसि समभावें अनुजांसि, सुतांसहि असें न बा पाहे, ।
सुखोत्थितसे भ्राते चवघेहि तुझे उठोत, बापा! हे' ॥३२॥
त्या यक्षवरें उठले सुखसुप्त तसे पळांत चवघे ते, !
फार निवाले पांचहि, अमृताची जेंवि देव चव घेते ।३३।
भूप ह्मणे,' यक्ष न तूं, कोण प्रभु ? अद्भुतप्रभावांचे ।
लीलेनें असु हरिले, न तुजपुढें आमुची प्रभा वांचे '॥३४॥
पुसतां ऐसें प्रेमें सांगे तो त्या नृपास, ' मज तात ।
धर्म, असें जाण सुता! कवि ज्याची सम कृपा समजतात'३५

---

## ६ उपसंहार.

एवं भक्तमयूरें श्रीमद्रामप्रसादघनपर्वीं ।
केलें तांडव तोषें श्रीमद्भारततृतीयवनपर्वीं ॥ १ ॥

---

१ भरतकुलांत. २ शिरत. ३ बाप. ४ निजून उठलेल्यां प्रमाणें. ५ सुखानें निजलेले. ६ विलक्षण आहे शौर्य ज्यांचें अशांचे. ७ प्राण. ८ तेज. ९ शहाणे लोक. १० रामाचा प्रसाद हाच मेघकाल त्यांत. ११ नृत्य. १२ आनंदानें.

# ४ विराटपर्व·

कविता मयूरकविची, तीस मना ! सुरभि मान, वाचा वी[1]।
तीच सतत, निरसाया कविहीं निजदुरभिमान वाचावी ॥

---

१ प्रसवे. वाचा कविता वी– वाग्देवीनेंच ( मोरोपंताची ) कवित निर्माण केली आहे.

# १ कीचकवध.

कीचक नामा सेनापाल[1] श्याल[2] प्रसिद्ध राजाचा ।
भंगूं पाहे कृष्णाव्रत[3], वांछी अभ्युदय[4] धरा[5] ज्याचा[6] ॥ १ ॥
भगिनीस ह्मणे, 'पूर्वी आढळली या न हे[7] मला भवनीं[8], ।
वाटे जन्मदरिद्री झाला बहुकोटिहेम[9]लाभवनीं ॥ २ ॥
मोहेल इला पाहुनि शक्रहि[10], मग अन्य कां न नर मोहे ?
मजसीं अंध:कराया[11] अहिसुरनरकन्यकानन[12] रमो[13] हे ' ॥३॥
लब्धतदनुमोदन[14] तो जंबुक[15] सिंहीस, कीं सकाम[16] ससा ।
व्याघ्रीस, सतीस बळें, शांतीस वरावयासि तामससा[17], ॥४॥
रावणसा बहु विनवी, प्रेम प्रत्यक्षरींहि नव दावी ।
कीचक नीच कलुषानिधि[18] त्याची आर्यांत[19] गोष्ट न वदावी ॥
कृष्णा ह्मणे, 'अहाहा ! बुडती तरि भजति नीच कामार्ते, ।
सावध हो, गा ! वध हो[20] न, ठेवाली[21] जाण कीचका ! मातें
परदारा मी, मत्पति गंधर्व, प्रबल उग्र शिवेशील[22], ।
मागें सरशिल, तरशिल; मरशिल जरि मज बळेंचि शिवशील'

---

१ सेनापति. २ मेहुणा—राणीचा भाऊ. ३ पातिव्रत्य. ४ उत्कर्ष. ५ पृथ्वी. ६ ज्या वराचा ७ कृष्णा. ८ गृहीं. ९ सोनें. १० इंद्र सुद्धां. ११ खालीं करण्यास—खालीं पाहायाला लावण्यास. १२ नाग, देव आणि मनुष्य यांच्या मुलींचीं मुखें. १३ मजसीं रमो. १४ मिळालें आहे तिचें ( सुदेष्णेचें—भगिनीचें ) अनुमोदन ह्मणजे रुकार ज्याला तो कीचक. १५ कोल्हा. १६ कामातुर. १७ तमोगुण-संपन्न नरासारखा. १८ पापसमुद्र. १९ सज्जनांत—श्रेष्ठांत. २० होवो. २१ [illegible] २२ शिवाप्रमाणें ( उग्र ) [illegible]

# १ कीचकवध.

कीचक नामा सेना[1]पाल श्या[2]ल प्रसिद्ध राजाचा ।
भंगू पाहे कृष्णाव्र[3]त, वांछी अभ्यु[4]दय ध[5]रा ज्या[6]चा ॥ १ ॥
भगिनीस ह्मणे, 'पूर्वीं आढळली या न हे[7] मला भवनीं[8], ।
वाटे जन्मदरिद्री झाला बहुकोटिहेम[9]लाभवनीं ॥ २ ॥
मोहेल इला पाहुनि शंक[10]हि, मग अन्य कां न नर मोहे ?
मजसीं अध:[11]कराया अहिसुर[12]नरकन्यकानन र[13]मो हे ' ॥३॥
लब्धत[14]दनुमोदन तो जंबुक[15] सिंहीस, कीं सका[16]म ससा ।
व्याघ्रीस, सतीस बळें, शांतीस वरावयासि ताम[17]ससा, ॥४॥
रावणसा बहु विनवी, प्रेम प्रत्यक्षरींहि नव दावी ।
कीचक नीच कलु[18]षानिधि त्याची आर्यां[19]त गोष्ट न वदावी ॥
कृष्णा ह्मणे, 'अहाहा ! बुडती तरि भजति नीच कामार्त, ।
सावध हो, गा ! वध हो[20] न, व्या[21]ली जाण कीचका ! मातें
परदारा मी, मत्पति गंधर्व, प्रबल उग्र शिव[22]शील, ।
मागें सरशिल, तरशिल; मरशिल जरि मज बळेंचि शिवशील'

---

१ सेनापति २ मेहुणा—बायकोचा भाऊ. ३ पातिव्रत्य. ४ उत्कर्ष. ५ पृथ्वी. ६ ज्या व्रताचा ७ कृष्णा. ८ गृहीं. ९ सोनें. १० इंद्र सुद्धां. ११ खालीं करण्यास—खालीं पाहायाला लावण्यास. १२ नाग, देव आणि मनुष्य यांच्या मुलींचीं मुखें. १३ मजसीं रमो. १४ मिळालें आहे तिचें ( सुदेष्णेचें—भगिनीचें ) अनुमोदन ह्मणजे रुकार ज्याला तो कीचक. १५ कोल्हा. १६ कामातुर. १७ तमोगुण-संपन्न नरासारखा. १८ पापसमुद्र. १९ सज्जनांत—श्रेष्ठांत. २० होवो. २१ नागीण. २२ शिवाप्रमाणें ( उग्र ) आहे स्वभाव ज्यांचा

ती तीस ह्मणे, 'कीचकसदना जाऊन आण गे ! हाला' ।
धाडी बळें वृकाच्या घालुनि हरिणीस आण गेहाला ॥८॥
कृष्णा ह्मणे, 'न जाइन, जेंवि मृगी वृकबिळा, विटागारा, ।
साधुगृहा धाड, परमतप्ता तत्पथशिळा विटा गारा' ॥९॥
विनवी ऐसें बहु, परि तीस सुदेष्णा ह्मणे तरी 'जाच' ।
फाराचि वरी निरयगति परवशता शतगुणें करी जाच १०
जातां परांर्थही बहु तापातें पावली सुरामा ती, ।
न करील कां पित्याची दुर्गतिची माउली सुरा माती? ११
कीचक विलोकुनि ह्मणे त्रिजगद्गुरुविष्णुच्याहि आलीस, ।
'रंभाचि सुंदति ! तूं या नलकूबरमंदिरासि आलीस ।१२।
सर्वस्व अर्पितों तुज देवि ! करीं पूर्ण काम, हो दारा, ।
विकत मिळतां स्मितसुधालेशें त्रेशी न कां महोदारा'? १३
इत्यादि नीच कीचक दुष्कर्माची धरूनि आंस वदे ।
कृष्णा वदे, 'सुदेष्णेकरितां पात्रीं भरूनि आसव दे' १४
तो कर धरुनि खल ह्मणे, 'दासी आहेत फार अन्या, यां, ।
बैसा शयनीं, राज्ञी करिते, करवूनि दास्य अन्याया' १५
कर आसुडतांचि पडे धडडड वात्याजवें जसा त्रिटपी, ।
कैंचें तेज बल तशा दुर्वृत्तीं? जो सुरारसा विट पी ।१६।

---

१ मद्या. २ लांडग्याच्या. ३ जारगृहास. ४ साधुगृहास जाणाऱ्या मार्गातील दगड. ५ नरकवास. ६ शंभर पटीनें अधिक. ७ दुसऱ्याकरितां–सुदेष्णेकरितां. ८ चांगली स्त्री. ९ पिणाऱ्याची. १० त्रैलोक्याचा स्वामी जो विष्णु त्याची सखी जी द्रौपदी तीस. ११ सुंदर आहेत दांत जिचे अशी. १२ कुबेराचा मुलगा, रंभा ही त्याची आवडती स्त्री. १३ स्मित ( गालांत हंसणें ) हेंच अमृत त्याच्या लहानशा भागानें. १४ अत्यंत उदार जो मी त्याला. १५ इच्छा. १६ मद्य. १७ या कामाला–मद्य नेण्याला किंवा या कीचकापाशीं. १८ हिसक्यांत. १९ वावटळीच्या वेगानें. २० वृक्ष. २१ दुर्गुणी. २२ मद्याला.

तंव ते उठोनि थांवुनि पळतां कवळूंनि[1] नीच कवेरीतें,[2] ।
नृपतिसमक्षहि[3] पाडी लत्ता हाणोनि कीचक वैरीतें ॥१७॥
भीमांगुष्ठासि धरी स्वांगुष्ठें धर्मराज दडपून, ।
नाहीं तरि तेव्हांचि श्येनें[5] तसा मारिताचि झडपून ॥ १८ ॥
कृष्णा रडत ह्मणे, ' या रायावरि धर्मनीति विटती[6] हे,
कैसी उपेक्षिता, हो ! सभ्यस्त्रीकीर्तिहानि विटतां[7] हे. ॥१९॥
प्रेमें राक्षितिल सदा ह्मणुनि दिलें मी जयांसि मत्तातें, ।
ते गंधर्व उपेक्षिति मज कां ? कां मारिती न मत्तातें[8] ?' २०
निजदुःखाहुनि केवळ कनकनगासहि[9] गणी लहान सती; ।
तें द्वारकांपुर[10] तसें आणी बहुधा मनीं महानस[11] ती ॥२१॥
जाय निशीथीं[12] साध्वी, दावी तिस तत्प्रभाचि वाट तमीं,[13] ।
चित्तांत ह्मणे, ' भीमा ! दयिते[14] ! दयिता नसेन वाटत मी '
पाहूनि ह्मणे, 'भीमा ! आश्रय तुज काय हें महानस,हा ! ।
न यशोहानि सहा, गा ! सुज्ञा ! सहकाय[15] हेमहानि[16] सहा ॥
निजलां काय मृतापरि ? व्हा जागे, सिंहसे उठा, राहो ।
निद्रा, कीर्ति वरा हो ! ह्रीप्रद[17] हा वाहु भृगुकुठारा[18] हो.' २४
भीम गडबडोनि उठे अंकींच निवासें[19] तीस दे वामीं,[20] ।
चित्तीं म्हणे, ' बहुदिसां आतळलों[21] या सतीस देवा ! मी.' ॥

---

१ धरून. २ वेणीतें. ३ विराटाच्या देखत. ४ चांगली जी द्रौपदी तीतें. ५ पक्षि विशेष. ६ कंटाळला आहे. ७ जारता. जारकर्म. ८ माजलेल्याला. ९ मेरु पर्वतासही. १० कृष्णाचें स्थान. ११ स्वयंपाकघर. १२ मध्यरात्रीं. १३ अंधारांत. १४ प्रिया ( सं ). १५ देहासहित. १६ सुवर्णहानि. १७ लाज देणारा. १८ परशुरामाच्या परशूला. १९ स्थान. २० डाव्या ( मांडीवर ). २१ स्पर्श केला–भेटलों.

‘ दयिते[1] ! कां आलीस ? प्रमदे ! हा आर्द्र[2] कां पदर जाये ?
भ्यालीस भीरु[3] ! भय कां ? भेटे त्यालाचि कांप दर ज्या ये ॥

तूं काय भार ? भामिनि ! उतरसि मांडीवरूनि कां, बस ये,
झालें काय? वद सुदति! सुमुखि! सति! रडूं नकोचि, थांब सये!’
‘ कृष्णसखी द्रुपदसुता धर्मस्त्री सून पांडुराजाची, ।
कविगणें गणपति[6] गाती कीर्ति सुधासिंधुपांडुरा ज्यांची २८

कवि जीस राजसूयामाजि, व्यापुनि मही नभा, गाती, ।
झाली विराटसदनीं सैरंध्री परम हीनभागा[9] ती ॥ २९ ॥

कीचक नीच कर तिचा धरि, परि हरिची सखी न अनुसरली[10],
कर आसुडितां पडतां खल, तेथुनि दूर ती सुतनु सरली ३०

लत्ता हाणुनि मूर्छित केली सुकुमारमूर्ति भूपातें[12], ।
अजि ! सोसलें कसें पतिहृदया ? सोसो ससभ्य[13] भूपा[14] तें ३१

हे स्त्री नव्हे, प्रतिष्ठा तुमची, जरि ईस सोडितां[15] पाणी ।
‘ धर्मे चार्थे च’ असें वदलां कां प्रथम जोडितां पाणी[16] ? ३२

मज मरण सुसह[18], परि हें दुःसह बहु, धातया[19] ! न रामेला,
रक्षी वरूनि जो जन ह्मणती बहुधा तया नरा मेला ’ ।३३

---

१ प्रिये. २ ओला. ३ भितरे. ४ भय. ५ समूह. ६ शिवाचे सेवक. ७ अमृतसागराप्रमाणें धवल. ८ पांडु राजाची. ९ दुर्दैवी. १० मनाप्रमाणें वर्तन केलें. ११ सुंदर स्त्री. १२ जमिनीवर पाडून. १३ सभासदांसहित. १४ विराटाला. १५ पाणी सोडणें–आशा सोडून देणें. १६ हात. १७ पाणी जोडणें–पाणिग्रहण करणें. १८ सहन करण्यास सुलभ. १९ हे ब्रह्मदेवा.

नेत्र पुसोनि कवळुनि[1] भीम सतीला ह्मणे, ' उगी, न रडें, ।
अज्ञातवास नसता, तरि अरिचें तैंचि[2] मुरडितों[3] नरडें[4] ३४।
एकांतनृत्यशालाशयनीं भेटे[5], असेंचि कर, जाये ! ।
येइल तसेंच माझ्या नृहरीच्या[6] यश जसेंचि करजां[7] ये ॥
काळाहि न भीतिस जी स्त्री तूं भ्यालीस काय अल्पा[8] या ?
कल्पाया[9] सत्य, स्मित कर, ह्मण ' नृत्यालयस्थतल्पा[10] या' ॥
करवुनि खलवधनिश्चय तेथुनि गेली सती स्वशयनातें, । ।
[11]कंठी क्षपा[12] स्मरोनि प्राणसख्या पुंडरीक-नयनातें[13] ॥३७॥
गांठी तिला पुन्हा तो खल, जेंवि पतंगदीप कॉलिकेला[14], ।
प्रार्थुनि ह्मणे,'सुमुखि ! मज भज,तुजसीं म्यां चुकोन कलि[15] केला
सुंदरि ! विराट राजा नांवाचा जाण, सांच मत्स्यप[17] हीं[16], ।
शृंगाररसतरंगिणि[18]! तळमळतो संगमार्थ मत्स्य पहा' ।३९।
त्यासि खरें भासेसें प्रियेंशिक्षित[20] सास्मित स्वयें वदली;
परि कांपली सतीची तनु जैसी मंदमारुतें[21] कदली[22]॥ ४० ॥
खल पाय धरूं पाहे; सुमति म्हणे, 'कासया नति, सरा हो!।
परि पात्र निजरहस्या भ्राता वा दास या न तिसरा हो'४१
तें वाटे त्या हालापानाद्यतिपातकायना[23] सत्य, ।
मग मनिं ह्मणे,'पित्याचा पाहतसे हात काय नासत्य[24]' ।४२

---

१ आलिंगन देऊन. २ तेव्हांच-जेव्हां कीचकानें लत्ता-प्रहार केला तेव्हां. ३ दाबला असता. ४ गळा. ५ कीचक भेटे. ६ नरसिंहाच्या. ७ नखांना. ८ क्षुद्रास. ९ वाटण्याकरितां (त्याला). १० नृत्यगृहांतील पलंगीं. ११ घालवी. १२ रात्र. १३ कमल-नयन जो कृष्ण त्याला. १४ ज्योतीला. १५ भांडण. १६ खरोखरी. १७ मत्स्यदेशस्वामी. १८ कीचक. १९ नदि. २० प्रियानें (भीमानें) शिकविलेलें. २१ वाऱ्यानें. २२ केळ. २३ मद्यपानादि महापातकांचें स्थान जो कीचक त्याला. २४ अश्विनीकुमार.

‘ दयिते ! कां आलीस ? प्रमदे ! हा आर्द्र कां पदर जाये ?
भ्यालीस भीरु ! भय कां ? भेटे त्यालाचि कांप दर ज्या ये ॥
तूं काय भार ? भामिनि ! उतरसि मांडीवरूनि कां, वस ये,
झालें काय? वद सुदति! सुमुखि! सति! रडूं नकोचि, थांब सये!’
‘ कृष्णसखी द्रुपदसुता धर्मस्त्री सून पांडुराजाची, ।
कविगणें गणपति गाती कीर्ति सुधासिंधुपांडुरा ज्याची २८
ऋषि जीस राजसूयामाजि, व्यापुनि मही नभा, गाती, ।
झाली विराटसदनीं सैरंध्री परम हीनभागा ती ॥ २९ ॥
कीचक नीच कर तिचा धरि, परि हरिची सखी न अनुसरली,
कर आसुडितां पडतां खल, तेथुनि दूर ती सुतनु सरली ३०
लत्ता हाणुनि मूर्छित केली सुकुमारमूर्ति भूपोतें, ।
अजि ! सोसलें कसें पतिहृदया ? सोसो ससभ्य भूपा तें ३१
हे स्त्री नव्हे, प्रतिष्ठा तुमची, जरि ईस सोडितां पाणी ।
‘ धर्मे चार्थे च’ असें वदलां कां प्रथम जोडितां पाणी ? ३२
मज मरण सुसह, परि हें दुःसह बहु, धातया ! न रामेला,
रक्षी वरूनि जो जन ह्मणती बहुधा तया नरा मेला ’ ।३३

---

१ प्रिये. २ ओला. ३ भितरे. ४ भय. ५ समूह. ६ शिवाचे सेवक. ७ अमृतसागराप्रमाणें धवल. ८ पांडु राजाची. ९ दुर्दैवी. १० मनाप्रमाणें वर्तन केलें. ११ सुंदर स्त्री. १२ जमिनीवर पाडून. १३ सभासदांसहित. १४ विराटाला. १५ पाणी सोडणें—आशा सोडून देणें. १६ हात. १७ पाणी जोडणें—पाणिग्रहण करणें. १८ सहन करण्यास सुलभ. १९ हे ब्रह्मदेवा.

नेत्र पुसोनि कवळुनि[1] भीम सतीला ह्मणे, ' उगी, न रडें, ।
अज्ञातवास नसता, तरि अरिचें तैंचि[2] मुरडितों[3] नरडें[4] ३४।
एकांतनृत्यशालाशयनीं भेटे[5], असेंचि कर, जाये ! ।
येइल तसेंच माझ्या नृहरीच्या[6] यश जसेंचि करजां[7] ये ॥
काळाहि न भीतिस जी स्त्री तूं भ्यालीस काय अल्पा[8] या ?
कल्पाया[9] सत्य, स्मित कर, ह्मण ' नृत्यालयस्थतल्पा[10] या' ॥
करवुनि खलवधनिश्चय तेथुनि गेली सती स्वशयनातें, । ।
[11]कंठीं क्षेपा[12] स्मरोनि प्राणसख्या पुंडरीक-नयनातें[13] ॥३७॥
गांठी तिला पुन्हा तो खल, जेंवि पतंगदीप कलिकेला[14], ।
प्रार्थुनि ह्मणे,'सुमुखि ! मज भज,तुजसीं म्यां चुकोन कलि[15] केला
सुंदरि ! विराट राजा नांवाचा जाण, सोच[16] मत्स्यप[17] हीं[18], ।
शृंगाररसतरंगिणि[19] ! तळमळतो संगमार्थ मत्स्य पहा' ।३९।
त्यासि खरें भासेसें प्रियेंशिक्षित[20] सस्मित स्वयें वदली;
परि कांपली सतीची तनु जैसी मंदमारुतें[21] कदली[22]॥ ४० ॥
खल पाय धरूं पाहे; सुमति म्हणे, 'कासया नति, सरा हो!।
परि पात्र निजरहस्या भ्राता वा दास या न तिसरा हो'४१
तें वाटे त्या हालापानाद्यतिपातकायना[23] सत्य, ।
मग मनिं ह्मणे,'पित्याचा पाहतसे हात काय नासत्य[24]' ।४२

---

१ आलिंगन देऊन. २ तेव्हांच–जेव्हां कीचकानें लत्ताप्रहार केला तेव्हां. ३ दाबला असता. ४ गळा. ५ कीचक भेटे. ६ नरसिंहाच्या. ७ नखांना. ८ क्षुद्रास. ९ वाटण्याकरितां ( त्याला ). १० नृत्यगृहांतील पलंगीं. ११ घालवी. १२ रात्र. १३ कमलनयन जो कृष्ण त्याला. १४ ज्योतीला. १५ भांडण. १६ खरोखरी. १७ मत्स्यदेशस्वामी. १८ कीचक. १९ नदि. २० प्रियानें ( भीमानें ) शिकविलेलें. २१ वाऱ्यानें. २२ केळ. २३ मद्यपानादि महापातकांचें स्थान जो कीचक त्याला. २४ अश्विनीकुमार.

त्या शून्यनृत्यशालाशयनीं सांजेचि[1] गुप्त भीम निजे. ।
जागति ते स्वाकारें भुजगांच्या[2] नित्य देति भी मनिं जे[3] ॥
‘ आलों[4] तुज भेटाया घेउनि सर्वस्व हें उपायन[5], हो !
प्रमदे ! त्वत्प्राप्तीस्तव बहु केला विफल[6] हा उपाय न हो ’

हळुच ह्मणे भीम, ‘ तुह्मी सुमहागुण[7]नदनदीप, काशाला ।
दीप ? प्रकाशली कीं पावुनियां वदनदीपका शाला ॥४५॥
तुमचें लोकांत, अहो ! कीचक ! सामान्य काय हो ! शील[8]?
परि तूं वरटेसि[9] करटं[10] नीच कसा मान्यकाय[11] होशील ? ४६

धरितोसि जीविताशा तूं गरलप[12] मंद नीच काशाला ? ।
त्वद्रक्त[13]कर्दमें ही आतांचि भरेल कीचका ! शाला’ ॥४७॥
ऐसें बोलुनियां धृतखलगल[14] बलजलधि[15] तो भला बुकली, ।
पावेल जय कसा प्रभुसेतुसवें[16] करिल जो अलाबु[17] कली ? ॥

प्राणा मुकेल इच्छुनि सिंहीचे गजहि सबहुमान[18] मुके, ।
कां न मुके कोल्हा ? कां छी ह्मणतिल त्या जनाधमा न मुके?
जातां भीम ह्मणे, ‘ गे ! अपराध तुझा करूनि परें[19] मेला; ।
वांचेल नीच कीचक कैसा लावूनि पाय परमेला[20] ? ’ ।५०।

---

१ संध्याकाळींच. २ सर्पांच्या—जारांच्या. ३ जे भीमभुज. ४ हें कीचकाचें भाषण आहे. ५ भेट, नजराणा. ६ निरर्थक. ७ उत्तम गुणसागर. ८ स्वभाव. ९ हंसीस. १० कावळा. ११ प्रसंन आहे शरीर ज्याचें असा. १२ विष पिणारा. १३ चिखलानें. १४ धरला आहे दुष्टाचा गळा ज्यानें. १५ सागर. १६ श्रीरामचंद्राच्या सेतूबरोबर. १७ भोंपळा. १८ अत्यंत आदरपूर्वक. १९ शत्रू. २० उत्तम जी तूं तिला—पाय लावणें—अपमान करणें.

# २ विराटभ्रमनिरास.

विजयी विराट इकडे ये, पूजिति पौर[1] विप्रजन यातें, ।
येतांचि सभेंत पुसे प्रेमें त्या उत्तरा स्वतनयातें ॥ १ ॥
जन कथिति, ' धेनु कुरुनीं वळिल्या, येऊनि उत्तरोशेला[2], ।
त्वत्कीर्तिनें पसरिला स्वपरित्राणार्थ[3] उत्तरा शेला ॥ २ ॥
गेला कुरु जिंकाया, आहे सारथि बृहन्नडा, गमला ।
सत्य कुमार[4]चि, वदला ' लागो अपकीर्तिचा न डाग मला '

भूप ह्मणे, ' कुरु होतिल वारे, करितील आजि अभ्रें[5] मुळीं[6],
दुःख सुदेष्णेला जें, शिरतां सिंहांत कलभ[7] अभ्रमुळीं[8] ' ।४।
हांसुनि धर्म ह्मणे, ' हो ! विजयिसुतातें पहाल नयनांहीं ।
आहे बृहन्नडा जरि सारथि, तरि गोधनासि भय नाहीं ' ॥
ऐसें धर्म वदे तों, करिती येउनि सभेंत दूत नेंती[9], ।
कथिती विजयकथा जी देणारी हर्ष नित्य नूतन ती ॥६॥

' देवा ! कुमार आला, सोडविल्या धेनु, पळविलीं कंटकें[10],
न वय प्रमाण[11] तेजस्विजनीं ह्मणती कवी न तें लटकें '। ७।
धर्म ह्मणे, 'आयकिलें दूतांचें वचन चांगलें कानें, ।
राया ! सुखरोमांचित केलें कीं आजि आंग लेंकानें ? ॥८॥
सारथि बृहन्नडा ज्या, तद्विजयें करुत बायका नवला, ।
चिंतामणिगळ[12] बालक जो, दुर्लभ त्यासि काय कानवला[13] ?'

---

१ नागरिक. २ उत्तर दिशेला. ३ आपल्या रक्षणाकरितां. ४ कार्तिकस्वामी. ५ मेघ. ६ उत्तराला. ७ हत्तीचा छावा. ८ हत्तिणीस. ९ नमन. १० सैन्यें. ११ मोठेपणाचें प्रमाण. १२ चिंतामणि ज्याच्या गळ्यांत तो. १३ पक्वान्नविशेष.

दूतातें सुखवुनि, नृप सचिवांसि ह्मणे, ‘ गुढ्या उभारा हो !
पुर शोभवा, पुढें जा, राजपथीं विप्रजन उभा राहो ।१०।

गाजत वाजत साजत आज तया जतन करुनि आणा हो!
मजमागें मत्स्यांचा[1] हा रिपुशशिराहुबाहु[2] राणा हो ’ ११

यापरि वदोनि हर्षें, सामोरे सर्व लोक पाठवुनी, ।
आजि करावी अक्षक्रीडा[3] ऐसें मनांत आठवुनी, ॥ १२ ॥

सर्वस्व समर्पी या धर्मासि, ब्राह्मणासि वार्णेकसें[4], ।
नृप कृष्णेसि ह्मणे ‘गे! सैरंध्रि ! मदक्षपात्र[5] आण कसें’ ।१३

धर्मासि म्हणे, ‘ हुं, या, मांडा उकलूनि रम्यतळपट[6] हो!’
कृष्णाहि ह्मणे, ‘ मेल्या अक्षकरांचें[7] समूळ तळपट[8] हो ’ ॥

द्यूत प्रवर्ततां, तो भूप म्हणे, ‘ ऐकिलेंसि कंका ! तें ।
कुरु जिंकिले कुमारें, वय तरि अद्यापि उचित अंकातें[9] ’ ॥

धर्म ह्मणे, ‘ हे कौरव किति ? सूत बृहन्नडा कुमारा ज्या, ।
समरीं अमरींच्यांही[10] तो भय देईल कुंकुमा राजा !’ ।१६।

मत्स्य ह्मणे, रे ! कंका ! शंका सोडूनि बोलसी भलतें, ।
क्लीबासि[11] मत्सुताधिक ह्मणसी हें वचन मन्मनीं सलतें ।१७।

---

१ मत्स्य देशांचा. २ शत्रु हेच कोणी चंद्र, त्याचा ग्रास करणारा आहे हस्त ज्याचा. ३ फांशांचा खेळ–द्यूत. ४ बाणासारखें. ५ माझें अक्षपात्र ह्मणजे सोंकट्यांचा पट. ६ रम्य–मनोहर आहे पृष्ठभाग ज्याचा असा पट ( सोंकट्यांचा ). ७ फांसे करणाऱ्यांचे. ८ नाश ९ मांडीला. [ उचित–योग्य ]. १० देवस्त्रियांच्या. ११ नपुंसकास.

कंका! रंका! सद्योजा[1]तहि हरि भंगितो करिघटा[2]तें, ।
ब्रह्मांडाधिकहि घट[3]ज सेवुनियां सागरा करि घटातें ॥१८॥
विप्राधमा! जरि मनीं वांचावें हें असेल, हो मूक[4], ।
न पुन्हा असें वद, सखा ह्मणवुनि ह्मणतो,'न जीविता मूकें'
धर्म ह्मणे, 'जिंकाया शक्त न भीष्मादिकां नगारा[6]ती, ।
कुरुगुरुपुढें विरे[7] परशक्ति, नृपा ! होय कां न गारा ती?२०

त्यावरि बृहन्नडाचि प्रौढा, जसि दा[8]नवावरि भवानी ।
गावें या दोघींचें[9] यश भूपा! आदरें हरिभवांनीं ॥ २१ ॥
कुरुगुरुसवें झगडतां त्या सुरगुरु[10]चेहि ओंठ करपावे, ।
विंध्यस्कंधगो[11]शिशुचा कां विधु[12]च्या मंडळा न करपावे ?'
ऐसें सत्य वदे जों तों घाली माळ अक्षमा[13] राया, ।
शिकवी युधिष्ठिराच्या भौळीं[14] पाणिस्थे[15] अक्ष माराया ॥२३॥

अक्षप्रहार होतां, वाहों लागे असृ[16]ग्द्र नाकानें, ।
तें स्वांजळींत धरिलें, त्या शांतिक्षांतिविजित[17]नाकानें ।२४।
धर्माभिप्रायज्ञा कृष्णा ताटांत तें धरी रगत, ।
पतिहृद्[18]गत साध्वीनें, नाडीनें जाणिजे शरीरगत[19] ॥ २५ ॥
तों तो उत्तर आला, द्वारस्थां[20]नीं नृपासि जाणविला ।
तेणें अत्युत्कंठित होउनि भेटावयासि आणविला ॥ २६ ॥

---

१ नुकताच उपजलेला. २ समूह. ३ अगस्त्यऋषी. ४ मुका. ५ घालव. ६ पर्वतशत्रु–इंद्र. ७ नाहींशी होई. ८ महिषासुरावर–महिषासुरावर. ९ विष्णु व शंकर यांनीं. १० बृहस्पति. ११ विंध्यपर्वताच्या खांद्यावर असणाऱ्या मुलाचा. १२ चंद्राच्या. १३ क्रोध. १४ कपाळावर. १५ हातांत असलेला. १६ रक्त. १७ शांति व क्षमा ह्यांनीं जिंकिला आहे स्वर्गलोक ज्यानें ( धर्मराजानें ). १८ मनांतील अभिप्राय. १९ शरीरस्थिति. २० द्वारपाळांनीं.

तेव्हां कंक हळूच क्षत्त्या[1]सि म्हणे, ' बृहन्नडा राहो, ।
पाहो न हें, सभेंत न तत्क्षोभें रक्त नृपतिचें वाहो ॥२७॥

रण नसतां मद्देहीं जो क्षत कीं क्षतज[2]लेश काढील, ।
तो तत्काळ वधावा, जरि त्याला अमृत शक्र वाढील ।२८।

हीं सत्य तत्प्रतिज्ञा, या राजाचें म्हणोनि हो हित रे ! ।
मारील विराटातें हें माझें देखतांचि लोहित[3] रे ! ' ॥२९॥

क्षत्त्यानें गुंतवितां, जरि स[4]क्षत तरि निराकुल[5]क्षणसा ।
राहे बाहेर [6]प्रभु, परम सुलक्षणहि तो कुलक्षणसा ॥ ३० ॥

उत्तर पित्यासि वंदुनि, पाहे कंकासि तो सभाकोणीं[7], ।
तातासि पुसे, ' ऐसा केला अन्याय हा महा कोणीं ? '३१

भूप म्हणे, 'पुत्रा ! म्यां केला स्वकरेंचि दंड या कंका, ।
कीं हा करी प्रशंसा षंढाची, नच धरी मनीं शंका ' ३२

उत्तर म्हणे, 'अहाहा ! केला अन्याय हा ! धरा पाय, ।
[8]ब्रह्मक्षोभ स्वर्गा[9]पायहि केवळ नव्हे धरा[10]पाय ' ॥ ३३ ॥

नमुनि विराट म्हणे, 'बा! कंका! चुकलों महायशा ! पावें[11],।
न मला सख्या ! तुवां या मदघा[12] घेउनि सहाय शापावें '॥

कंक म्हणे, 'सोड चरण, मज सोसावें असें जरि न कळतें,
गळतें रक्त महीवरि, तरि हें त्वद्राष्ट्र तत्क्षणीं जळतें ' ३५

---

१ द्वारपालकास. २ रक्त ३ रक्त. ४ व्रणार्त. ५ कमी झालेला नाहीं आनंद ज्याचा अशासारखा. ६ अर्जुन ७ कोंपऱ्यांत. ८ ब्राह्मणाचा राग. ९ स्वर्गहानिकर. १० पृथ्वीला अपाय करणारा. ११ प्रसन्न हो. १२ माझ्या पापाला.

शमतां शोणितधारा, संपादी धर्मराज तो शुचिता[1]; ।
तों ये बृहन्नडा, मग दावी जी रीति आपणा उचिता ३६
राजा ह्मणे, ' कुमारा ! या वृत्तें लाज त्या कुमारा[2] हो, ।
निंदुनि इंदुनिभयशा[3] क्षण मौनव्रतपरा[4] उमा राहो ॥ ३७ ॥
त्वां जिंकिला कसा तो अश्वत्थामा ? तसाचि तो कर्ण ? ।
तोहि द्रोण महात्मा दिव्यधनुर्वेदशंभुगोकर्ण[5] ? ॥ ३८ ॥
केला कसा कृपाचा भंग[6] ? कसा पळविला सुयोधन गा ? ।
कैसा भीष्मप्रमुखा स्वभुज अशनि[7] कळविला सुयोधनगा[8] ?'
उत्तर ह्मणे, 'पित्या ! कुरु पाहुनि, झालों भयाकुळें[9], पळालों,
सिंह प्रेक्षुनि यूथभ्रष्ट[10] कलभसाच मी बहु गळालों ॥४०॥
मरणेच्छुनिर्धना[11] जें दाता, सोडूनि सुजळ, दे वसुतें, ।
जैसें यश, तैसें हें केलें मद्वदन उज्वळ[12] देवसुतें[13] ॥ ४१ ॥
मज सारथि करुनि रथी झाला, विद्या प्रकाम[14] रुद्रा ज्या ।
ठाव्या, त्या देवसुता, बहुमत तो त्र्यंबका[15] मरुद्राजा[16] ।४२।
दिव्यदरांच्या[17] नादें निर्मुनि त्या कुरुबळांत भीतितें[18], ।
हरिलें होतें गोधन जें, सोडविलें पळांत आधीं तें ॥४३॥
आधीं कर्ण पळविला, मग केला विरथ[19] तो कृपहि, राया ! ।
शकला न एकही त्या देवसुताच्या यशा नृप ! हिराया ४४

---

१ स्वच्छता. २ षडाननाला. ३ चंद्राप्रमाणें शुभ्र आहे यश ज्याचें अशा कुमाराला. ४ मौनव्रततत्पर ( मुकी ). ५ दिव्य धनुर्वेद हाच कोणी महादेव त्याचें आवडतें स्थान ( द्रोण ). ६ पराभव. ७ वज्र. ८ पर्वताला. ९ व्यग्र. १० कळपांतून चुकलेला. ११ धनाला. १२ धवल-प्रकाशित. १३ देवपुत्रानें. १४ पुष्कळ. १५ शंकराला. १६ इंद्राला. १७ शंखाच्या. १८ भीति—त्रास. १९ रथहीन.

अरिसेनेसि न वरतें पाहूं दे, जेंवि साधु कुलटेतें, ।
काय वदूं गुरु गुरुसुत जिंकुनि भीष्मावरीहि उलटे तें ?४५

श्रीमद्भीष्मासहि तो निजशस्त्रास्त्रप्रवीणता कळवी, ।
पळवी सुयोधनातें, त्यासकट तदाश्रितानने मळवी ॥४६॥

संमोहनास्त्र योजुनि सर्वांसहि देवपुत्र मग मोही, ।
हरिहरलीलेहून न्यूना लीला तुह्मांसि न गमो ही ' ॥४७॥

मत्स्य ह्मणे, ' तद्दर्शन तुज घडलें, तें मलाच कां नाहीं ? ।
नेत्रें बहु तळमळती, लाभ मिळविला भलाचि कानांहीं ४८

सर्वस्वें पूजाया तो आह्मां मायबापसा मान्य, ।
लीलेनें हरिला जरि तेणें हा ताप, काय सामान्य ? ॥४९॥

सांग कसें तुज दिसतें ? तो मज दावील काय पाय सखा ?।
याहुनि उणा ि दुकळीं ह्मणता, ' हो कार्यपुष्ट, पायस खा '

उत्तर ह्मणे, ' उद्यां कीं परवां भेटेल तो असें वाटे, ।
जळकारुण्यहि विनतानुगताचि सोडील तें कसें वांटे ? ' ५१

---

१ व्यभिचारिणीतें. २ त्याच्या ( दुर्योधनाच्या ) आश्रितजनांची मुखें. ३ मूर्छित करण्याची शक्ति आहे ज्यांत असें अस्त्र ( शस्त्रविशेष ). ४ कमी. ५ दुष्काळांत. ६ शरीरानें बळकट. ७ क्षीर. ८ जलरूप कारुण्य ( दया ). ९ सखल भूमि किंवा नम्रजन यांस लागून राहणारें-अनुसरणारें. १० मार्गातें ( नेहमीच्या ).

# ३ अभिमन्यु-विवाह.

अच्युत[1]पदासि चिंतुनि सानुजें[2] धर्म स्ववेष घेऊनी, ।
सुदिनीं वसे नृपपदीं त्या मत्स्याच्या सभेंत येऊनी ॥ १ ॥
मागुनि विराट येउनि हांसोनि ह्मणे, 'सभासदा[3] ! कंका !
भद्रासनीं[4] बसाया आजि तुज कसी न वाटली शंका ?' ॥
अर्जुन ह्मणे, 'नृपा ! हा हरिच्या[5] अर्धासनीं बसायाचा, ।
आहे प्रतापमहिमा विख्यात जगत्त्रयीं असा याचा ॥ ३॥
गंधर्वांसि हरि ह्मणे, 'याचींच यशें करूनि तांडव[6] गा' ।
हा पुण्यश्लोक[7] प्रभु सम्राट्[8] सद्गुणसमुद्र पांडव गा !' ॥४॥
मत्स्य ह्मणे, 'पांडव हा तरि भीमप्रमुख बंधु जे चवघे ।
कोठें ? कृष्णा कोठें ? जीस क्षणहि न विसंबिती अवघे' ॥
पार्थ ह्मणे, 'सूद[9] तुझा बल्लव मगधेंद्रकाय[10] हा चिरिता, ।
करिता झाला सूतान्वयसागर[11] भीमकाय[12] हाचि रिता[13] ॥ ६ ॥
हयपाळ जो नकुळ तो गोपाळक तोचि होय सहदेव, ।
अर्जुन बृहन्नडा मी भिडला ज्या चापपाणिसह देव[14] ॥७॥
सैरंध्री हे कृष्णा, मेले कीचक इला अनादरिते, ।
हे किति ? हरमुरजें[15] उदधि[16] व्हावे क्षोभें इच्या अनाद[17] रिते ॥
अज्ञातवास दुर्घट परि निर्विघ्न त्वदाश्रयें घडला, ।
होतों सुखरूप तुझ्या गर्भांत[18] श्रम न लेशही पडला' ।९।

---

१ कृष्ण. २ भावांसह. ३ सभेंत बसणाऱ्या. ४ सिंहासनीं. ५ इंद्राच्या. ६ नृत्य. ७ पावन आहे कीर्ति ज्याची असा. ८ सार्वभौम. ९ आचारी. १० जरासंधदेह. ११ कीचकवंशरूप समुद्र. १२ भयंकर आहे शरीर ज्याचें तो. १३ रिकामा. १४ शंकर. १५ शंकराचा मृदंग. १६ समुद्र. १७ शब्दरहित. १८ गृहांत.

उत्तरहि पांडवांतें वर्णुनि, कळवी पुन्हा स्वजनकास ।
कीं, ' हेचि घालणारे व्यसनीं तारावया स्वजन कासे ' १०
भूप ह्मणे, ' त्वां अर्जुन पूजावा सर्वकाळ, भीमहि म्यां, ।
न असत्य, हरिजनाच्या सोडुनियां गर्व काळ भी महिम्या ॥
वत्सा ! काय वदों रे ! धर्मात्मा धर्म हा असा मान्य, ।
म्यां ताडिला ललाटीं अक्षें, अपराध हा असामान्य ॥१२॥
सचिवांहीं म्यां त्वांही प्रार्थावा धर्मराज, कन्या या ।
द्यावी धनंजयाला पोटीं घालावयासि अन्याया ' ॥ १३ ॥
उत्तर ह्मणे, 'बहु बरें, न कळत अपराध वडति, पारि सोंचे
साधु क्षमी यशस्कर, घनहि सुभूषेंत पडति परिसाचे ' १४
भेटे विराट राजा त्या पांचां पांडवांस गुरुसाच, ।
व्यसनांत आश्रयप्रद अन्नप्रद होय वृद्ध गुरु साच ॥१५॥
धर्मासि ह्मणे ' बा ! गा ! साधो ! जोडा नसेचि या दिवसा ।
स्वपदीं मच्चित्तीं ही संपादुनि सुकृतजय दयादि वसा ॥१६
' तारुनि परांसि तरति हरिजन ' जें वर्णिलें असें कविनीं ।
तें दाविलें मज तुह्मीं कुरुकुलसंततिसरोजिनीरविनीं ॥१७॥
राज्यादि सर्व दिधलें, तुज म्यां, हें आपुलें असें ह्मण, गा !
शशिचूड 'नको' न म्हणे धुतऱ्याचें फूल वाहत्या भणगा ॥
धर्मा ! धनंजयवधू होउ ह्मणे धन्य भाग्य मत्तनया ।
देसील मान वचना तूंचि प्रभु, अन्य भाग्यमत्त न या '१९

१ संकटांत. २ कांस घालणें–सिद्ध असणें. ३ अर्जुनाला. ४ सर्व. ५ क्षमाशील. ६ घण, हातोडे. ७ सुभूषेंत पडतां–उत्तम अलंकार होतात. ८ दुसऱ्यास. ९ कुरुकुलवंशरूप कमलिनीस सूर्यप्रमाणें जे तुह्मी त्यांनीं. १० शंकर. ११ भिकाऱ्याला. १२ माझी मुलगी–उत्तरा. १३ भाग्यानें उन्मत्त झालेला.

पाहे धर्म धनंजयवदनातें तेधवां नर वदे तो, ।
ते परिसिते ह्मणति, ' सुख याहुनि हरिवेणुच्या न रव देतो ॥
' प्रेम तुझें आह्मांवरि ऐसेंचि दयासुधांनदा ! राहो, ।
अभिमन्युची वधू हो, ती माझी बा ! बुधा ! न दारा हो ॥
केंवि वरावी ? वर्तत होती कीं एकवर्ष कन्यासीं, ।
हरिजनकथेंत शिरतां न विशंकावे शुकादि संन्यासी ।२२।
तो साधुजनां तोखदें, ओखदसा होय खलजनां भाचा, ।
योग्य तुला जामाता बहिश्चर प्राण जलर्जनाभाचा ' ।२३।
मत्स्य ह्मणे, ' बा ! धर्मा ! वंद्य तुझें नंदना वना शील, ।
त्रिजगदघातें तुमचें पुण्यलतांकंद नांव नाशील ॥ २४ ॥
देवा ! सौभद्रार्थ स्वीकारावी तुह्मींच कन्या, हो ! ।
द्या पदरीं, हे संतति या संबंधें जगांत धन्या हो ' ॥२५॥
धर्म ह्मणे, ' बहु उत्तम, हें मज अश्लाघ्यें काय हो ! नातें ?
मिळतां सुवर्णमुद्रा अर्थी इच्छील काय होनांतें ? ' ।२६।
धाडूनि दूत धर्में आप्तांला हा विवाह जाणविला, ।
अभिमन्यु राम कृष्ण द्रुपद स्वकुमारवर्ग आणविला ।२७।
अभिमन्युविवाहोत्सव जग निर्वी, जेंवि चंद्र पुनिवेचा, ।
धर्म ह्मणे, ' हूं, कनकें मणि बहु वस्त्रान्नराशिहुनि वेंचा '

---

१ अर्जुन. २ ध्वनि. ३ दयामृतसागरा. ४ कन्येप्रमाणें. ५ आनंद देणारा. ६ औषधाप्रमाणें. ७ बाहेर असणारा. ८ कृष्णाचा. ९ त्रैलोक्याच्या पापाला. १० पुण्यरूप वल्लींचा कंद ह्मणजे मूळ. ११ अभिमन्यूकरितां. १२ निंद्य. १३ आपले पुत्र-द्रौपदीचे मुलगे. १४ आनंदित करी. १५ पौर्णिमेचा. १६ सुवर्ण, हिरे, माणकें इ.

नट[1]नर्तकीगणातें धर्म ह्मणे, 'रामकृष्णगानाचा ।
नृत्याचा रस शिवसे जाणति, जा त्यांपुढेंचि, गा नाचा '

भीम ह्मणे, ' वाढा हो! देवि! अहो! भूमिदेवें[2]! जेवा जी ! ।
चालें नको, बसा या न्या, घ्हावे जे महेभ[3] जे वाजी[4] ' ३०

राम ह्मणे, ' घालाव्या कुंडक्या[5] चारीहि याच कानीं कीं '।
मुनि भूषवितां भासे मूर्त[6]स्वर्वृक्ष याचकानीकीं[7] ॥ ३१ ॥

सहदेव नकुळ अर्जुन अच्युत बळ भीम धर्म नव्याही ।
त्या नात्यासि न मिरविति, ते गमति विराटबंधु, न व्याही ।

---

## ४ उपसंहार.

वदवि मयूराकरवीं श्रीराम ' विराटपर्व ' चवथें, बा !।
स्वल्प ह्मणोनि न सोडीं अमृताची शक्ति सर्व चव थेंबा १

राम[8]घन सत्प्रसादामृत[9] जों जों बहु वळोनि [10]वर्षतसे, ।
तों तों भक्तमयूर स्वार्याकेका करूनि हर्षतसे ॥ २ ॥

---

१ नाचणाऱ्या स्त्रीपुरुषांच्या समूहाला. २ ब्राह्मण हो ! ३ मोठे हत्ती. ४ घोडे. ५ कर्णभूषण. ६ मूर्तिमंत कल्पवृक्ष. ७ याचकसमूहीं. ८ राम हाच मेघ. ९ उत्तम कृपा हेंच अमृत. १० वृष्टी करतो.

# ५ उद्योगपर्व.

' उद्योग ' नाम सर्वां पर्वांमाजी अपूर्व हें पर्व, ।
आल्हादक रसिकांला जेंवि उदधिलागिं होय विधुपर्व ॥

१ समुद्राला. २ पौर्णिमा.

# १ अर्जुनविजय.

जाय प्रथम कुरुप[1] तो, निजला होता प्रभु[2] स्वपर्यंकीं,[3]
ज्यासि स्मरुनि निजावें स्वस्थ स्थापूनि शीर्ष[4] अर्यंकीं ॥१॥

प्रभुच्या शिराकडे तो स्वमहत्वास्तव बसे अर्कावि[6] मानी;[7] ।
होईल काय हंस ब्रह्मयाच्याहि बसला बक विमानीं? ॥२॥

मागुनि गेला अर्जुन, बसला पायांकडेचि पाहत, कीं ।
या विनतीं श्रीगुरुची बहु, त्या लेशहि नसे, कृपा, हतकीं ॥

कैसा असेल अन्यं[10] प्रभुच्या दृष्टीसमोर सामान्य ? ।
उठतांचि दीस अर्जुन झाला दृष्टीस मोरसा मान्य ॥ ४ ॥

पार्थ ह्मणे, ' प्रार्थाया आलों प्रभुजी ! तुला साहायास' ।
कौरव ह्मणे ' बहाया प्रथमचि जो पातला, पहा यास ।५।

तुज मीं याचें माझें सम सख्य जसें, तसेंच सम नातें, ।
संत ह्मणति, ' पूर्वागत[12] साह्यशिवपदीं सदा वस ' मनातें ॥'

देव ह्मणे, ' सत्याचि हें तरि पार्थ प्रथम पाहिला आहे,
सर्वहि संत न्यायें भेद न आगमनदर्शनीं[13] पाहे ॥ ७ ॥

पूर्वागत तूं जैसा तैसा मज पूर्वदृष्ट हा मान्य, ।
दोघांचेहि करावें म्यां साह्य प्रिय, तुह्मी न सामान्य ॥ ८॥

---

१ दुर्योधन. २ रुग्ण. ३ आपल्या पलंगावर. ४ डोकें. ५ शत्रूच्या मांडीवर. ६ मूर्ख. ७ गर्विष्ठ. ८ नम्री ( अर्जुनावर ). ९ निंद्य दुर्योधनावर. १० अर्जुनाहून दुसरा. ११ बोलावण्यास — १२ पूर्वी आलेल्याला मदन करणें हेच शंकराचें चरण त्या ठिकाणीं — १३ येण्यांत व पहाण्यांत.

तुजहुनि कनिष्ठ अर्जुन बाळकसा, हें मनीं पहा नातें, ।
रीति दहांची हें कीं पहिलें समजाविती लहानातें ॥ ९ ॥
आहेत एक अर्बुद[1] नारायण नाम गोपे[2] मजसम जे, ।
सर्वहि अनंतबल ते, समजे न परां[3], परंतु मज समजे ॥
ते कीं न्यस्तायुध[4] मी, त्यांत तुम्हां मान्य काय दोघांस ?'
ऐसें प्रभूत्तम पुसे त्या दैवादैवसंपदोघांस[5] ॥ ११ ॥

पार्थ ह्मणे, 'गोविंदा ! न्यस्तायुध तूंचि पाहिजेस मज,' ।
मागे सैन्य सुयोधन, वरहि वरार्यासि[6] पाहिजे समंज[7] ॥१२॥
बहु मेळवूनि बल्लव[8] अज्ञ पळत जाय, कृष्ण सोडून, ।
अधन शिशु[9] जसा टाकुनि चिंतामणि बहु कपर्द[10] जोडून।१३।
चित्तांत ह्मणे, 'कैसा केला अरिमीन[11]ह्रद अगाध[12] रिता ।
भ्रांत[13] श्रुत[14] स्मरेना कीं हा प्रभु जाहला अगा[15] धरिता ॥१४॥

कृष्ण ह्मणे, 'पार्था ! त्वां अर्बुद बल हातिचें दिलें अरिला।
जो ह्मणतो, 'भांडेना, शस्त्र धरीना' असा कसा वरिलीं[16] ?' ॥
पार्थ ह्मणे, 'तूं मुनिनीं चित्तीं षडरिक्षयार्थ[17] धरिला, ।
हरिला समस्तहि श्रितताप[18] तुवां ह्मणुनि म्यांहि वरिलास १६
'न धरावें शस्त्र' असी प्रभुची आहे जरि प्रतिज्ञा, ते ।
राहो, त्वस्मरणेंचि ध्वंसिति कामाद्यरिप्रति[19] ज्ञाते[20] ॥१७॥

---

१ दहा कोटी. २ यादव. ३ इतरांना. ४ टाकलेलें आहे शस्त्र ज्यानें. ५ सुदैव आणि दुर्दैव यांचे संपत्तीच्या ओघांस. ६ मागण्यास. ७ बुद्धि. ८ गोप. ९ बालक. १० कवड्या. ११ शत्रुरूपी मत्स्यांचा डोह. १२ अत्यंत खोल. १३ भ्रमिष्ट. १४ ऐकलेलें. १५ पर्वता ( गोवर्धन ). १६ स्वीकारिलास १७ कामक्रोधादि सहा शत्रूंचा नाश करण्याकरितां. १८ भक्तांचा त्रास. १९ कामप्रमुख शत्रूंस. २० जाणते लोक.

सुगम त्वदाश्रितांला देवेंद्रालाहि अर्थ असुगम[1] जे, ।
त्वत्प्रेक्षितामरांतकसेनांचे[2] लोपतात असु[3] गमजे[4] ॥१८॥
तूं या धनंजयाचा सारथि करुणानदा! समीरण[5] हो, ।
वाढेल तेज माझें प्रचुर[6] मग करीन दास मी रण, हो! ॥
व्हावा सारथि समरीं शौरि[7] मनोरथ मनीं असे चिर[8] हा ।
मत्प्रग्रहप्रतोद[9] स्वीकारुनि मदर्थीं असेचि रहा.' ॥२०॥
स्वजनामरद्रुम[10] प्रभु हांसोनि म्हणे, 'अवश्य तुजला जो ।
अर्थ अपेक्षित[11] तो हो[12], मातलिसारथि[13] महेंद्र तुज लाजो'
असि साधु साधुपतिसीं[14] गांठि पडे, ती जसी अयो[15] परिसा;
यापरि साचा हाचि प्रेमळ, याच्याचि या जया परिसा[16] २२

---

## २ धर्मराजाची सामेच्छा.

धर्म ह्मणे, 'रे संजय! मी सिद्ध, न सिद्ध जनक[17], सामातें,
जाणोनि सर्व, दाटुनि दूषिसि तूं साधुजन कसा मातें? ।१
निंद्य स्वधर्मविच्युत[18], मी तरि युद्धासि सिद्ध उत्साहें, ।
धर्मन्यायानुसरण[19] पावाया योग्य काय कुत्सा[20] हें? ॥ २ ॥

---

१ असुलभ, कठीण. २ तूं [केवळ] पाहिलेल्या देवशत्रू [दैत्यां] च्या सेनांचे. ३ प्राण. ४ चेष्टा. ५ वायु. ६ पुष्कळ. ७ कृष्ण. ८ पुष्कळ दिवसांचा. ९ माझी लगाम व चाबूक. १० भक्त [काम] कल्पवृक्ष. ११ इच्छिलेला. १२ होवो. १३ मातलि आहे सारथि ज्याचा तो इंद्र. १४ कृष्णासीं. १५ लोखंडाला. १६ ऐका. १७ धृतराष्ट्र. १८ कर्तव्यपराङ्मुख. १९ पालन. २० निंदा.

सदनुमतें[1] क्षिति[2] अर्पुनि सत्पुलकरीं निवे दिलीप, तिला ।
शोचूं[3] नयेचि मुजें, जैसी कन्या निवेदिली[4] पतिला ॥ ३ ॥

जरि हे न सोडवावी द्यूतजिता द्रौपदी तसी महि म्या, ।
तरि भरतकुलगुरूच्या लागेना बोल काय गा ! महिम्या ?

होइन निंद्य दहांत, न सोडवितां श्रीस संजया ! परिस, ।
कुलजा यशाचि, न विधिसेंहि[5] बहुमत[6] हरिनाभिकंज[7] यापरिस

हरि कुरुकुलहित इच्छी, तोकाचें[8] नित्य माय जेंवि हित, ।
करिन तसेंचि प्रभु हा सर्वज्ञ कथील काय जें विहितें[9] ' ६

श्रीकृष्ण म्हणे, 'सूता[10] ! सर्वांत गृहस्थधर्म सन्मत[11] रे !
या आश्रमांत सर्व स्वपराचे[12] सफल करुनि जन्म तरे ॥७॥

कर्म करुनि टाकावें ? जी अमृत मुखांत मायसी[13] ओती
ती सद्विद्या[14], कर्मत्याग न करितांचि, फलवती[15] होती ॥ ८॥

दूषील कोण वर्णाश्रमनिरता[16] भरतसत्तमा राया ? ।
योग्यचि हा साधु सकल रक्षाया, सर्व मत्त[17] माराया ॥ ९॥

दस्युदर्मन[18] हा मुख्य क्षत्रियधर्म, प्रमाण थोरांस, ।
यास्तव मारावें या प्रभुनें दुर्योधनादि चोरांस ॥ १० ॥

---

१ चांगल्या लोकांच्या संमतीनें. २ पृथ्वी. ३ शोचणें-खेद करणें. ४ दिलेली. ५ ब्रह्मदेवाला सुद्धां. ६ अत्यंत मान्य. ७ विष्णूच्या बेंबीपासून निघालेलें कमळ. ८ मुलाचें. ९ योग्य. १० संजया. ११ सज्जनमान्य. १२ आपलें व दुसऱ्याचें. १३ आई-प्रमाणें. १४ ब्रह्मविद्या १५ फलद्रूप. १६ वर्ण [ ब्राह्मण क्षत्रिय इ. ] व आश्रम [ ब्रह्मचर्य, गृहस्थ इ. ] यांच्या धर्माविषयीं परम दक्ष. १७ श्रेष्ठास. १८ चोरांचा नाश.

हे अधिक काय ? दुर्बल ते रात्रौ घालिती दरवडा जे, ।
लुटिलें धन दुःख नसें परि हृदयीं बहु कुवादरव डोजे ११

स्तेनें[3] भले न स्त्रीचा नग्न करिति हरुनि सोंवलें काय, ।
नव्हतों सभेंत आह्मीं ह्मणुनि लुटायासि फावलें काय ? १२

जा, सांग, त्वद्वदनें ऐकावें हेंचि वाक्य अंधानें, ।
आहेत सिद्ध पांडव सेवाया प्राण बाणसंधानें ॥ १३ ॥

देतां विभाग करितिल पांडव धृतराष्ट्रदास्य दास तसे, ।
नाहीं तरि खल मर्दुनि हास्य[6], मज असें भविष्य भासतसे '

संजय निघे, तयाला धर्म ह्मणे, ' आर्यकीं, यश तगावें, ।
द्या पांच ग्राम, न दे दासाला राय काय शत गावें ॥ १५ ॥

ताताला भीष्माला सांगावीं पाय धरुनि मन्नमनें, ।
जोडुनि हस्त ह्मणावें साम करावेंचि सुप्रसन्नमनें ॥ १६ ॥

आचार्य द्रोण कृप प्रार्थूनि, प्रथम कथुनि मन्नमना, ।
ह्मण साम भलेंतसें मज बहुमत, दुकळांत जेंवि अन्न मन

सांग कनिष्ठपित्यांतें बंधुविरोधासि चित्त भी माजें, ।
करवा साम भलतसें देइल हरि इष्ट वित्त भीमा जें ॥१८॥

कर्णासि वद सख्याला आवर, विजयासि[12] आवरील हरी, ।
समयीं प्रवृत्ति आवरि थोर, जसा सिंधु आवरी लहरी १९

---

१ अपशब्दध्वनि. २ खुपे ३ चोर. ४ वस्त्र. ५ देह. ६ हास्य करितील. ७ राहावें, टिकावें. ८ राजा. ९ कसेंही ( आमचें नुकसान झालें तरीही हरकत नाहीं ). १० विदुरास. ११ इच्छिलेलें. १२ अर्जुनाला. १३ मनाची ओढ. १४ लाटा. १५ माझे नमस्कार.

सांग नृपासहि हें कीं साम शुचि[1], तयांत नांव रायाचें, ।
सुगति[2] वरायाचेंचि न, कर्म उचित यातना वरायाचें ।२०।
गांधारीस ह्मणावें पंचोत्तरशत[3] असोत तनय, शतें ।
तृप्ति नसोचि तुज, करीं जेणें गातील साधुजन यश तें २१
माझ्या सुयोधनादि भ्रात्यांच्या बायकांसि कळवावें, ।
कीं स्वहितार्थ तुह्मीं तरि एकांतीं कांत[4]चित्त वळवावें '।२२।
ऐसें अजातरिपु[5]मुख शशिमंडल अमृत तेंवि वाचिक[6] वी[7] ।
तें बहु असोचि, विस्तरवद्[8]ग्रंथ प्राकृतीं[9] न वाचि कवी[10] २३

---

## ३ कर्णभेदप्रयत्न--पूर्वार्ध.

श्रीकृष्ण ह्मणे, 'कर्णा तूं कुंतीचा कुमार कानीन[11], ।
त्वद्वदनो[12]त्थ न पडला अर्थिजनाच्या[13] कधींहि कानीं ' न '
ऐसा वदान्य[14] विद्वान् विश्रुत[15] तूं शुद्धविप्रजनदास ।
चाल, भजोत भ्राते तुज, चातक भजति जेंवि घनदास[16] २
देईल अजातारी[17] मद्वचनें आजि राज्य अभ्रात्या[18]; ।
भ्रात्या न वळेल कसा ? वळवीलचि धर्मवायु अभ्रा[19] त्या ३

---

१ शुद्ध. २ चांगली गति ( मुक्ति ). ३ एकशेंपांच ( १०० कौरव व ५ पांडव ). ४ नवरा. ५ धर्म. ६ निरोप. ७ विणें–उत्पन्न करणें. वाचिक वी–निरोप सांगितला. ८ मोठा. ९ प्राकृत भाषेंत–मराठींत. १० पंडित. ११ कन्यावस्थेंत झालेला. १२ तुझ्या मुखांतून बाहेर आलेला. १३ याचक. १४ दाता. १५ प्रसिद्ध. १६ जलदास–मेघास १७ धर्म. १८ अबंधुला–परक्याला. १९ मेघा.

सानुजसुत धर्म तुला नमिल, सयादव करीन मी नमन, ।
सच्चित्त गुर्वनादर तोय[1]ानादर करी न मीनें[2]मन ॥ ४ ॥

चाल कसा, हो राजा, मातेच्या मानसासि दे सुख, गा !
यांचा तुज काकांचा सहवास जसा सित[3]च्छदा सुखग[4]ा '५

कर्ण ह्मणे, 'बा ! देवा ! वदसि स्नेहोंचि बा ! दयाळो ! हें; ।
भट[5]करगें जोडावी स्पर्शमणीची कसी दया लोहें[6] ? ॥ ६ ॥

मातृ[7]त्यक्ता मजला राधाहस्तीं दिलें अधिरथानें, ।
मज पाजाया प्रेमें पय पळ धरिती तिची न धिर थानें ।७।

निष्फळ कसें करूं गा ! बा ! परिहृतसर्वनतनराधे ! तें ? ।
मेल्यावांचुनि द्यावें जोडुनि सुतशोकवतन राधेतें ? ॥ ८ ॥

दुर्योधन नांवाचा राजा मी, सर्व राज्यभोग मला, ।
मूर्त नरक नर[9]कविच्या हृदयाला, जो कृतघ्न तो गमला ९

संस्कार विवाह[10]विधि केले माझे यथोक्त[11] सूता[12]नें ।
निर्मळपणें निघावें रक्तप[13]टांतूनि केंवि सूतानें ? ॥ १० ॥

समरमख[14]ांचि होऊं द्या, क्षत्रिय सेवूत तल्प[15] न गद[16]ानीं ।
पुण्य रणमरणदानीं वीरां जें तें न कल्प[17]नगदानीं ॥ ११ ॥

---

१ पाणी. २ मासा. ३ शुभ्रपक्षा. ४ उत्तम पक्ष्यास–हंसास. ५ योद्ध्याचा हात, ६ लोखंडानें–शस्त्रानें. ७ आईनें टाकलेल्या. ८ नाहींसे केले आहेत सर्व नम्र झालेल्या लोकांचे ताप ज्यानें अशा हे कृष्णा. ९ नरपीडित. १० लग्नापर्यंत. ११ यथाशास्त्र. १२ अधिरथानें. १३ तांबड्या वस्त्रांतून. १४ यज्ञ. १५ शय्या, १६ रोगांनीं, १७ कल्पवृक्ष.

पतितां[1]सि सां[2]वरी मृदु शुचि हा उपदेश केशवा तूळ[3], ।
जैसा अंबा[4]र्पित अतिरु[5]ग्णासि पदार्थलेश वा[6]तूळ ॥१२॥

श्रीकृष्णजी ! करावा कैसा विश्वासघात अव[7]सानीं ? ।
युद्ध करें न करावें ? आह्मां हा युद्धलाभ नवसांनीं ॥१३॥

तरि मग उरलें काय ? प्रभुजी ! त्यजिल्या जरि प्रतिज्ञा त्या?
नच सोडवेल देउनि धीर भरंवसा अरिप्रति ज्ञात्या ॥१४॥

धारातीर्थींच मिळे सद्गति सत्कीर्ति शुद्धि अधमातें, ।
राज्यपदभोग न लगे, द्यावा देवा ! रणांत वध मातें १५

मज समजलें प्रभो ! हें त्वद्दृष्टिपुढें उरेल न क्षत्र[8]; ।
रवि काळरुद्रदृष्टिसि न पुरे, तेथें पुरेल नक्षत्र ? ॥ १६ ॥

तूं स्वाश्रितप्रतिज्ञा करिशिल, न धरूनि शस्त्र सत्या गा ! ।
उरतिल कैसे कारिते झाले जे, हरुनि वस्त्र, सत्यां[9]गा ? ' ॥

देव ह्मणे, 'राज्य नको? उपदेश अयोग्य काय हे महिम्या?
क्लीबाला कन्यासी तुज कां द्यावी बळेंचि, हे महि, म्यां ?॥

जेथें भीम धनंजय बहुदुःसह वासवा[10] रणा[11]जिर तें ।
हरिलें न असतांही बलि[12]गजसहवास वा[13]रणा जिरतें[14] ?१९

धनदानें[15] अधनाचा तुमचा तैसाचि काम रणदानें ।
म्यां पुरविजेल; द्यावीं स्वर्गें[16] इतरें न कां मरणदानें ? २०

---

१ पडलेल्यास=पातक्यास. २ रक्षण करी. ३ कापूस. ४ आईनें दिलेला. ५ फार आजारी असलेल्याला. ६ वावडा. ७ शेवटीं. ८ क्षत्रिय ९ सतीच्या ( द्रौपदीच्या ) अपराधा. १० इंद्रला. ११ रणांगण. १२ बलिष्ठ अशा हत्तींचा समागम. १३ हत्तीला १४ पचतें. १५ कुबेरानें. १६ कल्पवृक्षानें.

जा सर्व सिद्ध व्हा; जरि आहे उद्युक्त मानस मराया, ।
सम रायांस[1] तुह्मांसहि भीमार्जुन वरद[2], शीघ्र समरा या२१

देईल कुरुक्षेत्रीं धर्म प्रभुवर तुह्मां निधन[3]दानें ।
धनदानें जासि येणें न दिलीं उदकें तथाविध[4] नदानें' ।२२।

कर्ण म्हणे, ' बा ! वचना मान्य न झालों ह्मणों नको, पावें,
वध्यें[5] ' वधाचि ' ह्मणतां, प्रभुनें आग्रह ह्मणोन कोपावें ?

सत्य उपदेश आह्मीं वरिचेवरि भव्य[6]हेतु झेलावे, ।
जाणोनि सर्व देवा ! लाविसि कां बोल ? हे तुझे लांवे[7] '२४

श्रीकृष्ण म्हणे, ' बहुधा मरणारचि हे समस्त सुपदेश[8], ।
कीं तव हृदयें माझा हितहि स्वीकारला न उपदेश ' २५

कर्ण ह्मणे, ' भेटि असो परलोकीं मात्र बा ! दयाळो! कीं ।
कलहीं स्नेह न राहे, हे दुर्लभ ह्मणुनि पाद या लोकीं '२६

ऐसें ह्मणोनि कर्ण प्रभुला कडकडुनि भेटला सुचिरें[9], ।
मुग्धांसहि[10] जडितें[11] कनक[12]मरकत नगें[13] न गमला[14] तसा रुचिरें[15]॥

---

१ दुर्योधनाला. २ वर देणारे. ३ मरण. ४ त्यासारखीं. ५ वधाला योग्य अशानें. ६ कल्याण करणारे. ७ खेळ. ८ चांगल्या पदांचे स्वामी–राजे. ९ पुष्कळ वेळ. १० अज्ञान्यास. ११ जडावाचा. १२–१३ सोन्याचा, पाचेचा दागिना. १४ वाटला. १५ सुंदर.

## ४ कर्णभेदप्रयत्न—उत्तरार्ध.

विदुरानुमतें कुंती गंगातीरीं सुताकडे गेली, ।
न कळत तदुत्तरीयेच्छायेंत उगीच ती सती ठेली[3] ॥ १ ॥
कर्णाचा नियम असा ब्रह्मजप करीत निश्चळ रहावें, ।
तापेल पृष्ठ तोंवरि रविचें मंडळ निरंतर पहावें ॥२॥
नियमांतीं कुंतीतें पाहूनि ह्मणे धरूनि राग मनीं, ।
' राधेय आधिरथि मी तुज नमितों, काय कार्य आगमनीं?'
कुंती कर्णासि ह्मणे, ' वत्सा! कौंतेय तूं, न राधेय; ।
'राधे' यथेष्ट ह्मण, परि कर्णा! कर्णासि फार बाधे 'य'.
मुग्धत्वें त्यजुनि तुला चुकल्यें, आतां स्वबंधु रक्षावे, ।
साधो! धर्मज्ञें त्वां अनुज स्वतनुजसमान लक्षावे ॥ ५ ॥
ज्येष्ठ श्रेष्ठ प्रेष्ठ[13] प्रभु तूं, देतिल तुला पदें भ्राते, ।
' जी जी ' ह्मणतिल, चरणीं वाहतिल धना यशा अदभ्रां ते
सेवावें शेळीचें कीं रसिकें धेनुचें रसवराज्य ?
त्वां सर्व अनुभवावें भ्रात्यांसह हें यशःप्रसव राज्य ॥ ७ ॥
सोडुनि सूतसुयोधनपक्षातें झडझेंडोनि बा! निघ रे ! ।
विघरो[21] दायादांचें बळ मन, ढेंकुळ जसें जळीं विघरे ॥८॥

---

१ कर्णाकडे. २ अंगावरील वस्त्र. ३ उभी राहिली. ४ पाठ. ५ राधेचा मुलगा. ६ अधिरथाचा मुलगा. ७ येण्यांत. ८ कुंतीचा पुत्र. ९ कानाला. १० अज्ञानपणानें. ११ पुत्र. १२ पहावे. १३ अत्यंत प्रिय. १४ राज्यपद. १५ भाऊ. १६ पुष्कळ. १७ उत्तम तूप. १८ कीर्ति देणारें. १९ कर्ण. २० झपाट्यानें. २१ विरघळून जावो. २२ भाऊबंदांचे.

तूं आत्मासा, पंचप्राण तसे बंधु सत्य, बापा ! हें, ।
नांदा एकत्र, नको द्वेष करूं, मजकडेचि बा ! पाहें ॥९॥

बा! कर्णा ! तूं अर्जुन रामजनार्दनसमान[1] सोजाल,[2] ।
हंस तसें साधूंच्या सोडोनि तुह्मी न मानसा[3] जाल ' ।१०।

कुंतीवचोवसानीं[4] सूर्यापासुनि असी निघे वाणी, ।
'सत्य पृथोक्ति[5], गुरुवचननिरतां[6] सुखकीर्तिची नसे वाणी[7] '

कर्ण ह्मणे, 'सन्माता तोकीं सुख व्हावया असु[8] खरचिंती ।
किंवा नेत्रें झांकुनि, व्हाया सुख आपणा, असुख[9] रचिती ?

माझा घात पुरवला तुज, त्यांचा मात्र घात पुरवेना !
काय असें अघ[10] ? विटलें कां त्वन्मन मज ? जसें स्वपुरें[11] वेनी[12]

न ह्मणेल काय माता 'व्हावा लोकांत आत्मज[13] न नीच ?'
रक्षील, धर्म रक्षुनि, जी ती भलतीहि आत्मजननीच ॥१४॥

अरिहि न करिल असें त्वां केलें, कां नख न लाविलें जननीं?
जन नीच मज न ह्मणते, परि काय करील नियतिलीं[14] जननी?

कृष्णें जसी यशोदा त्यजिली, तसि न त्यजीन राधा मी, ।
ती यातना न नरकीं होय कृतघ्ना न जी नरा धामीं । १६।

वसु[15] जेंवि वासवाच्या[16], माझ्या सानुज सुयोधन मनातें ।
रंजवितो, मज करिती सर्व तदाश्रितसुयोध[17] नमनातें ॥१७॥

---

१ बलराम व कृष्ण यांसारखे. २ शोभाल. ३ मनाला—मानससरोवराला. ४ शेवटीं. ५ कुंतीचें बोलणें. ६ तत्पराला. ७ कमीपणा. ८ प्राण. ९ दुःख. १० पाप. ११ शहर. १२ राजाचें नांव. १३ पुत्र १४ देवाला. १५ लोकपाल. १६ इंद्राच्या. १७ त्याच्या आश्रयाला असणारे उत्तम वीर.

अर्जुनवधप्रतिज्ञा केली ती कसि दहांत सोडावी ? ।
तोडावी कुरुपतिची प्रीति कसी म्यां ? अकीर्ति जोडावी ? ॥

ह्मणतील प्रकट सकल लोक मज त्वन्मतानुगा[1] ' भ्याला ' ।
यावें कर्पूराच्या[2] काय मषीगर्भसाम्य[3] गाभ्याला[4] ? ॥ १९ ॥

मारीन अर्जुनासचि समरीं, धर्मादिकां न चवघां मी, ।
करिच्या मदीं अलिसें जी बहु, तीहि मिळेल काय चव ग्रामीं ?

ह्मणतो मीच, नतजन्ममरण[6] हरी, परम सुख करी नवधा[7] ।
यद्भक्ति,[8] तत्सख्याच्या प्रभु कवण ह्मणेल मी करीन वधा ?

जा, भागलीस,[9] कल्पद्रुमसंश्रितकाम[10] कां न पुरतील ? ।
स्वस्थ रहा, पांच तुझे सुत सार्जुनें[11] कीं सकर्ण उरतील '॥

कुंती ह्मणे, ' अभयवरें[12] आत्मा, आह्मीं जडें असों देहें, ।
बहु तुजपुढें न वदवें, यश जोडीं, स्मरण बा ! असों दे हें '

आलिंगुनि कर्णातें भिजवुनियां अश्रुनीं पृथा परते, ।
चित्तीं ह्मणे, सखे जे होती, फिरतांचि विधि, वृथा पर ते '

---

१ तुझ्या मताप्रमाणें करणाऱ्याला. २ कापराच्या. ३ काजळाच्या आंतल्या भागाचा सारखेपणा. ४ आंतल्या भागाला. ५ धनगास. ६ भक्तांचे जन्ममृत्यु. ७ नऊ प्रकारची. ८ ज्याची [ कृष्णाची ] भक्ति. ९ दमलीस. १० कल्पवृक्षाचा ज्यांनीं आश्रय केला आहे त्यांच्या इच्छा. ११ अर्जुनासहित. १२ अर्जुनाखेरीज इतरांना भीति नाहीं हा वर.

# ५ भीष्मप्रतिज्ञा.

भीष्म ह्मणे, 'म्यां कन्या हरिल्या भ्रातर्थ[1] काशिराजाच्या, ।
मुनिजनहि ज्यांसि भुलला वरि दिसती सकळिका[2] शिरा ज्याच्या

बहुसंख्य भूप जिंकुनि म्यां स्वपुरा आणिल्या तिघी कन्या,
ज्येष्ठा अंबा वदली, 'वरिला शाल्व, न वरीन मी अन्या ,

शाल्वाकडेचि ती म्यां पाठविली, अंबिका स्वभावातें, ।
अंबालिकाहि दिधली विचित्रवीर्या शुचिस्वभावातें[3] ॥ २ ॥

अंबेला शाल्व ह्मणे, ' जा, गंगासूनुचीच[4] नवरी हो ' ।
' परविजिता[5] परपूर्वा[6] ' ऐसा ठेवूनि दोष न वैरी हो ॥४॥

धरिलाचि[7] मनें, व्हावा, परि त्या ती बायको नको पतिला, ।
आला तद्वदनें बहु 'याहि' असें आयकोन कोप तिला ॥५॥

रडतचि तपोवनाला गेली पावोनि उग्र ताप सती, ।
मजवरि दोष स्थापुनि, वृत कथुनि, करि सखेद तापस ती

राजर्षि होत्रवाहन भृगुरामाचा सखा तिचा आजा, ।
तो पातला अकस्मात् तीर्थतपःपर[10] जसा भरत राजा ॥७॥

तो तें परिसोन, तिला अंकीं घेऊनियां, मुनिजनातें ।
सांगे दौहित्री[11] हें ऐसें, होऊनि साश्रु[12], निज नातें ॥ ८ ॥

---

१ भावाकारतां–विचित्रवीर्याकरितां. २ सगळ्या. ३ पवित्रांतःकरणाला. ४ भीष्माची, ५ दुसऱ्यानें जिंकलेली. ६ पूर्वी दुसऱ्याची झालेली. ७ स्वीकारी. ८ जा. ९ दुःखी. १० तीर्थयात्रा व तप करण्याविषयीं तत्पर. ११ मुलीची मुलगी. १२ सजलनयन.

अंबेसि ह्मणे, 'वत्से ! राम अधिष्ठुनि[1] असें महेंद्रागा,[2] ।
जा, सांग नाम माझें, त्या प्रभुसिच गा, न तूं महेंद्रा गा '

तोंचि अकस्मात् तेथें अकृतव्रण[3] पातला रहायास, ।
तो सांगे, 'राम सखा येणार उद्यां तुला पहायास ' ॥१०॥

रामहि दुसरे दिवशीं भेटे, निघवूनि घे स्वकाय[4] कवी, ।
नायक वीरांचा जो त्या तो राजर्षि सर्व आयकवी ॥११॥

'येती शरण तुला जे ते जन सर्वत्र सत्पदा[5] वरिती ' ।
ऐसें प्रार्थुनि, जोडी अंजलि[6], घालूनि तत्पदावरि[7] ती[8] ॥१२॥

राम म्हणे, 'वत्से ! तूं आजवळा पावलीस न वनातें, ।
जें राजर्षिकडे या ब्रह्मर्षिकडेहि तेंचि तव नातें ॥१३॥

अश्रु पुसों दे, वांछितें[9] सांग मज, अनाथसी नकोचि रडूं, ।
आह्मांसि आपणासह या दुःखमहाभरें[10] नको चिरडूं ' १४

अंबा ह्मणे, 'असें हें झालें, किति कथिल दुःख हें तूतें ।
मारावें भीष्मातें या माझ्या परमदुःखहेतूतें[11] ' ॥१५॥

राम ह्मणे, 'धरिं न धनु, जरि न विनवितिल मजप्रति ज्ञाते[12]
ब्राह्मणकार्यावांचुनि सोडावी कसि निजप्रतिज्ञा ते ? '॥१६॥

अंबा वदे, 'प्रतिज्ञा शरणागतरक्षणार्थ सोडावी, ।
तुज ईश्वरासि दुष्कर[13] काय प्रभुजी ? सुकीर्ति जोडावी '१७

---

१ आश्रय करून. २ अगा—पर्वता. ३ परशुरामाचा सेवक ४ देह. ५ उत्तम स्थानाला. ६ ओंजळ. ७ त्याच्या ( रामाच्या ) पायावर. ८ अंबा. ९ इच्छिलेलें. १० भारानें. ११ कारणाला. १२ पंडित. १३ करण्यास कठीण.

राम ह्मणे, 'वत्से ! तुज भीष्म[1] नेमिल, बहुमता मदाज्ञा[2] त्या;
लंघ्या[3] नव्हे प्रतिज्ञा, प्रतिपाल्या[4] होय हे सदा ज्ञात्या ' १८

काश्या[5] ह्मणे,' बधा कीं भीष्म ह्मणो, 'निर्जितोस्मि[6]' आजोबा !
माजो बाहुबळें न च्छात्रैं[7], बहु गुरुप्रताप साजो बा ! '१९

अकृतव्रणहि ह्मणे, ' जी ! वर्णुत भृगुकुळगुरुप्रति ज्ञाती[8]; ।
स्मरली मज, स्मरावी स्वामींनींही गुरु[9] प्रतिज्ञा ती ॥२०॥

वदलां[10] भ्यां शरणागत दंडुनि[11] विप्रादि सर्व तारावा, ।
जो सर्व क्षत्र रणीं जिंकील प्रबळ तोहि मारावा ' २१

भार्गव ह्मणे, 'विसरलों होतों कीं मीहि या प्रतिज्ञाता, ।
वत्सा ! तुज धन्य म्हणों आधीं, मग सर्व याप्रति ज्ञाता२२

सामेंचि कार्य होइल जरि, तरि युद्धासि काय कारण हो ! ।
न करील वचन जरि, तरि माराया भरतनायका[12] रण हो '

ऐसें योजुनि घेउनि त्या मुनिमित्रांसमेत[13] मुलगीतें, ।
प्रस्थान[14] शीघ्र[15] केलें त्या राजामर[16]महर्षिकुल[17]गीतें ॥ २४ ॥

येऊनि कुरुक्षेत्रीं राहे, सांगोनि पाठवी, राजा ! ।
धांवोनि भेटलों मी वेद धनुर्वेद पाठ वीरा ज्या ॥२५॥

---

१ फार मान्य. २ माझा हुकूम. ३ लंघन करण्यास ( मोडण्यास ) योग्य. ४ पालन करण्यास ( पाळण्यास ) योग्य. ५ काशीराजाची कन्या–अंबा. ६ मी जिंकला गेलों. ७ शिष्य. ८ बांधव. ९ मोठी. १० तुह्मीं वदलां. ११ शिक्षा करून ( दुष्टांना ) १२ भीष्मा. १३ बरोबर. १४ निघणें. १५ लवकर. १६ देव १७ समुदाय.

मत्कृतपूजन घेऊनि राम ह्मणे, 'रे ! सुरापगांगभवा[1] ! ।
भवदर्पित बहु, नाहीं तरि काय असे दुराप[2] गांग[3] भवा ? ।

गरुडें सुधा; तसी त्वां हे अंबा रण करूनि जरि हरिली, ।
तरि हरिलीनमतिजनें संसृतिरुचि[4] तेंवि केंवि परिहरिली[5] ?'

वदलों. 'सत्य आत्याकरितां हरिली बळें; 'पर[6] स्वामी ।
वरिला शाल्व ' ह्मणे हे, घेऊं जाणुनि कसें परस्वा[7] मी ?'

राम ह्मणे, 'शाल्व न घे, मानी हरि गज परें दिला न वरी,
त्वां जिंकिली यदर्थ[8] त्वद्भ्राता तो करू इला नवरी' ।२९।

मी वदलों, 'जें दुष्कर सुयशस्कर सांग काज[9] रामा ! तें, ।
होइल अकीर्ति. देतां कां हा उपदेश कांजरा[10] मीतें[11] ?' ३०

राम ह्मणे, 'त्वद्गुरु मी, माझें सुखपुण्यकीर्तिजनक[12] वच, ।
गुरुवचनासचि ह्मणती सर्व भले पुण्यकीर्ति जन न वच' ३१

मी बोलिलों, 'असें तों न घडेल कधीं; दयानदा ! पावें; ।
गुरुनें, ज्यासि अधर्माचरण न माने, तया न दापावें[13]' ३२

राम ह्मणे, 'होय सुखी निजगुरुचें वचन शिष्यजन करिता,
नातरि गुरुकुंभभव[14]क्षोभें छात्रामृतांशुजनक[15] रिता ॥३३॥

---

१ गंगेच्या पुत्रा (सुरापगा+अंगभवा). २ मिळण्यास कठिण. ३ गंगेचें पाणी. ४ संसाराविषयीं आवड. ५ टाकली. ६ परंतु. ७ दुसऱ्याच्या धनाला. ८ ज्याच्या करितां. ९ काम १० कडु फळ. ११ मला. १२ उत्पन्न करणारें. १३ दटावावें. १४ घट जन्मुनि अगस्त्य. १५ चंद्राचा पिता—समुद्र.

हे सर्वमता साक्षात् दुर्गासी सर्वकामदा ज्ञात्या ! ।
लंघील खल महिषसा[1] जो, न करिल भस्म कां मदाज्ञा त्या ?

मज गुरुपुढें 'असें तों न घडेल कधीं' असें कसें वदसी ? ।
असतां समर्थ अघटितघटनापटु[2] मत्कुठार हा सैदसी[3] ३५

खचेसील[4] कौरवा ! तूं कीं बहु चढला तुझा मद सिगेला[5], ।
लंघावया पहासी[6] गांवाला काय रे ! मदसि गेला ? ॥३६॥

वधिले क्षितितलवर्ती क्षत्रिय म्यां एकवीसदा सा[7], ।
माझा प्रताप गातां र्द्रभ्रम[8] दे कवीस दासा ! रे ! ' ।३७॥

ऐसें भलतेंचि वदे वर्णावा मुख्य जो गुरु गुरूंनीं, ।
पाहे राम मजकडे, जेंवि हरिकडे हरी गुरुगुरूनी ॥३८॥

वदलों, ' धर्मन्यायें हा देह तपोवनांत गावावा ,।
त्यजुनि दुरभिमान, धरुनि शांतिसि, तारुनि जनांतरा बावा !

ठाव्या आहेत मला सांगा गोष्टी यथेष्ट अन्या या. ।
तरि भय भलत्यापासुनि होइल जरि मी करीन अन्याया ४०

वधिले क्षत्रिय तेव्हां नव्हता[9] हा भीष्म शांतनव समज,
देवासि मागते ते[10] झाले, मरणीं, करूनि नवस, मज ४१

---

१ महिषासुरासारखा. २ अशक्य गोष्टी करण्यास समर्थ. ३ उत्तम तरवार. ४ खालीं जाशील—पराभूत होशील. ५ शिगेला. ६ माझी तरवार. ७ असणारे, ८ शंकर अशी चुकीची समजूत. ९ रहावा. १० क्षत्रिय.

गेलें गुरुत्व तुमचें, कां हो ! ह्मणतां वधीन अनर्घातें ? ।
येइल पदरांत कसें यश धर्म[2]न्यायनिष्ठजनघातें ? ॥ ४२ ॥

सच्छिष्याला विद्या गुरु झांकायासि काय हो ! शिकवी ? ।
पांडित्य पहा माझें, पाहोनि मला ह्मणाल ‘ होशि कवी ’ ॥

हांसुनि राम म्हणे, ‘ रे ! हितकर गुरुवचन कां न आइकसी ?
साहेल तुझी तुजिया दुःसहशोकानें[3]लासि आइ कसी ? ४४

भीष्मा ! मज सिंह गणी, वेड्या ! तूं आपणासि कलभें[4] गेणीं,
न रविपुढें मिरवेसे चंद्रींहि, कसें असेल बल [6]भगणीं ? ॥

देसिल सत्यवतीतें शोक बहुत, रडविशील गंगेतें, ।
समज बरें मददूषित जें जें तेज क्षणांत भंगे तें ॥ ४६ ॥

हो सिद्ध, ये; हरीनें [8]व्यसु आला तो करेणु केला, हो !
हो गंगेला शोकद, तोखंद हें तोक रेणुकेला हो ’ ॥ ४७ ॥

सिंधूंत [11]नग जसा [12]कपि तैसा पाहोनि गर्वनग रामीं, ।
वंदुनि ‘ येतों ’ ऐसें बोलुनि आलों फिरोनि नगरा मी ॥

सत्यवतीतें सांगुनि नमुनि, तदा[13]शीप्रसाद घेऊन, ।
हा गुरुचें दर्शन घे, हेमंतीं[14] जेंवि अर्थ[15]नें घेऊन ॥ ४९ ॥

---

१ अपापाला [ मला–भीष्माला ]. २ तत्पर. ३ विरते-ग्रास ४ हत्तीचा छावा. ५ मान. ६ नक्षत्रसमूहांत. ७ गर्वानें नासलेलें. ८ प्राणरहित. ९ हत्ती १० आनंद देणारें. ११ मैनाकपर्वत. १२ मारुति. १३ आशीर्वाद. १४ हिंवाळ्यांत. १५ गरीब मनुष्य.

आह्मां गुरुशिष्यांचा अत्यंताद्भुत पहावया समर, ।
आले बहु सुरराजब्रह्मर्षिसमेत सर्वही अमर ॥ ५० ॥

पुत्रस्नेहें मातें ये वाराया भिऊनि देवधुनी, ।
हनु धरुनि म्हणे, 'बा ! हा कालकरीं बहु भटांसि दे वधुनी'

सांगोनि कलहकारण वदलों, 'गंगे ! वृथा न कोपावें, ।
रामापरि मज तूंही निजधर्मच्युत करूं नको, पावें ।

अत्याज्य सुप्रतिज्ञाग्रहें निजकुलधर्म सन्नय नरा हे, ।
तैसें कसें करावें जेणें एकहि न सन्नयन राहे ' ? ॥ ५३ ॥

सिंधु ह्मणे, 'कोण असी माता जोडील हात पोराशी ? ।
शिष्य असा, मग आग्रह कैसा सोडील हा तपोराशी ' ?॥

जों माय ह्मणे, 'देइल हा हरि तुज मुग्धसिंधुरा मरणा ' ।
मजवरि येता झाला, तोंचि यशोदुग्धसिंधु राम रणा ॥५५॥

---

१ बरोबर. २ निवृत्त करण्याकरितां—हट्ट सोडून द्यावयास लावण्यास. ३ देवनदी—गंगा—भीष्माची माता. ४ भ्रष्ट ५ स्वीकार. ६ उत्तम डोळा. ७ नदी—गंगा. ८ तपोनिधि—राम. ९ मूर्ख हत्तीला. १० दुधाचा समुद्र.

## ६ उपसंहार.

जनमेजयासि ऐसी वैशंपायन कथी कथा, तीतें ।
गाय मयूर रसिककविकिंकर[1] चित्तें असत्पथातीतें[2] ॥ १ ॥

---

१ सहृदय पंडितांचा सेवक. २ वाईट मार्गापासून दूर गे-ल्यानें ( चित्तानें ).

# अधिक टीपा.

## आदिपर्व.

### १ भीष्मद्रोणसमागम.

आर्या. १५–स्वरभंग...गळें–द्रोणाचें हें विलक्षण कौशल्य पाहून क्षणमात्र अर्जुन आनंदानें व आश्चर्यानें स्तब्ध झाला.

आ.–१८–गगनदीपाला विदित काय नसे?–सूर्याला काय माहीत नाहीं?–सर्व माहीत आहे.

आ.–२९ ताराया [ जसि ] संतति पटु तसि गोदानदी न [ पटु ]
* असा अन्वय. आईबापांना तारण्याला पुत्र जसा समर्थ असतो तशी गोदावरी नदीही नसते. पुत्राची योग्यता पवित्र नदीहूनही अधिक आहे.

### २ बकासुरवध–पूर्वार्ध.

आ. २–जो हव्यासें साधुजनीं संपत्तिसदा चिंती न ताप [ चिंती ] असा अन्वय. चांगल्या लोकांचें कल्याण व्हावें, त्यांना त्रास होऊं नये असें ज्याला [ व्यासाला ] नेहमीं वाटे.

आ. ४–जळधीतें मिळतां कोणी चळी बळें नदीतें फिरवील [ परंतु ] खळधीतें ( कोणी ) न ( फिरवील )–असा अन्वय. समुद्राला जाऊन मिळणाऱ्या नदीचा वेग सुद्धां थांबवुन धरितां येईल परंतु दुष्ट मनुष्यानें एकादें वाईट काम करण्याचें मनांत आणलें तर त्याला त्याच्यापासून परावृत्त करतां येणार नाहीं.

आ. १७–मज स्मरोनि [ तूं ] जें चिर 'हा' म्हणसील तें [ मज ] स्वर्गींही दुःसहाचि–असा अन्वय. मी मेल्यावर माझी पुनः पुन्हा आठवण करून तूं रडत राहशील तें मला स्वर्गांत सुद्धां सोसवणार नाहीं.

आ. १८–दोर कापणें ह्मणजे वर येण्याचा मार्ग बंद करणें.

आ. १९–आपदर्थे धनं रक्षेद्दारान्रक्षेद्धनैरपि । आत्मानं सततं रक्षे द्दारैरपिधनैरपि ॥

आ. २०–आत्मानं सततं......पि–आपत्काळीं बायकोचा किंवा धनाचा नाश झाला तरी तो पत्करून आत्मसंरक्षण नेहमी करावें.

आ. २२–तुह्मीच मुलें रक्षाल, हे अबळा जीवा भार वाहील; जी फार भीरु आल्या नवपुरीं वाहे ती [ मुलें ] कशी रक्षील ?–असा अन्वय. मी जर मेल्यें तर माझ्यामार्गे तुह्मी मुलांचें रक्षण करालचा परंतु तुह्मी जर गेलां तर तुमच्यामार्गे मला माझें आयुष्य ह्मणजे ओझ्यासारखें वाटणार आहे. मग जी अगोदरच फार भित्री व जी पतिमृत्युरूप नवीन पाण्याच्या लोंढ्यांत वाहून जात आहे तिच्यानें मुलांचें रक्षण कसें करवेल ? अर्थात् नाहीं.

आ. २५–अयिते कथमे...ते–अगे ! तूं कसें हें निष्ठुर भाषण केलेंस ? हे प्रिये ! हा मी तें करण्यास समर्थ आहे काय ?

आ. २८ तिघांतुनि एका कन्या रक्ष्य असें तुज [ कोणी ] ह्मणेल कां हो ? [ नाहीं हें उत्तर–ह्मणून तिला ] टाकीं–असा अन्वय. बायको, मुलगा व मुलगी या तिघांमध्यें फक्त मुलीचें मात्र रक्षण करावें मग बाकीच्या दोघांचें कांहीं झालें तरी हरकत नाहीं असें कोणी ह्मणणार नाहीं; ह्मणून मला सोडून दे–असें मुलगी बापाला ह्मणते.

## ३ बकासुरवध–उत्तरार्ध.

आ. १–रोगें...तें–रोगानें त्रासून आत्महत्या करावयास तयार झालेल्या मनुष्याला.

आ. ११ आकारें...ळे–मनांतील हेतु कांहीं बाह्य चिन्हांवरून समजतो.

आ. २१–पांडव...ला–येथें ‘ असंगति ’ नांवाचा अलंकार झाल आहे. कार्य आणि कारण हीं अगदीं भिन्नस्थलीं घडून आलीं असें वर्णिलें असतां ‘ असंगति ’ अलंकार होतो. येथें जेवणार पांडव

ह्मणजे भीम व आंचवणार ह्मणजे हात धुणार राक्षस–बक असें चमत्कारिक वर्णन आहे. जीवितास आंचवणें–प्राणास मुकणें.

सन्मणि कोटिलक्षा न ये [ मग तो ] राक्षसा चवला येतो काय ! असा अन्वय. उत्तम रत्न लाखों रुपयांना सुद्धां मिळत नाहीं मग तें चवलीला कसें मिळेल ! त्याप्रमाणें भीम हा अनेक राक्षसांकडून सुद्धां मारला गेला नसता मग तेथें एकट्या बकाची काय कथा ?

आ. २९–भीमबाहुगुण यमाच्या पाशा गुरु साजति–असा अन्वय यमाच्या पाशाला [ फांसाला ] सुद्धां भीमाचे हस्तरूपी दोरे गुरु-प्रमाणें शोभतील. भीमाच्या हाताच्या शक्तीपुढें यमाच्या फांसाची शक्ति कांहींच नाहीं.

## ४ द्रौपदी-स्वयंवर.

आ.१–ज्या पदरा पसराया नंदनद्रु समुचित–ज्या धाम्यापुढें कल्प-वृक्षानें सुद्धां पदर पसरून वर मागावा. कल्पवृक्ष सर्वांच्या इच्छा पूर्ण करितो परंतु त्याची इच्छा पुरविणारे असे धौम्यऋषी.

.आ २–बा...देशाला–केवळ चांगल्या स्थानाच्या योगानें फसून जाऊं नका. वाईट ठिकाणीं सुद्धां उत्तम लोक असूं शकतील. स्थानावर कांहीं नाहीं. कालगतीवरच सर्व कांहीं अवलंबून आहे.

आ. १३–तद्रूपें सुरजनहि मोहे [ मग ] तो रंग धैर्य कसा धरिल ! असा अन्वय. द्रौपदीच्या रूपाला देव सुद्धां भुलून गेले मग इतर प्रेक्षक ( रंग ) भुलून गेले यांत नवल तें काय ! धैर्य न धरणें–मन बावरून जाणें.

आ. २१–स्वात्युत्साहें उष्णकर तात हृष्टमना करुनी–आपल्या मोठ्या उल्हासाच्या योगानें कर्णानें आपला बाप जो सूर्य त्याला आनंदित केलें व चाप चढविलें.

आ. २३ सूत...मि–सारथ्याला मी कधींही वरणार नाहीं. चुरुनि हातातें–हात चोळून–रागानें.

आ. २७ शकिला न प्रकटूनि जे तें कौतुक पाहत होते तेच

कवि लाजेनें न सांपडले—असा अन्वय. ज्या धूर्त लोकांनीं तें धनुष्य उचलण्याचा प्रयत्नच केला नाहीं त्यांची मात्र फजीति झाली नाहीं.

आ.—३३ विजयोऽस्तु—विजय असो.

आ. ३८—कृष्णा त्या श्रीमरुत्वदंशाच्या कंठीं माळा घाली [ व त्याबरोबरच ] प्रीति मुनिगणांच्याही ( कंठीं माळा घाली ) ( व ) कीर्ति सोमवंशांतील राजांच्या ( कंठी माळा घाली )—असा अन्वय. द्रौपदीनें अर्जुनाला माळ घातली तेव्हां ऋषींना आनंद झाला व सोमवंशीय राजांची कीर्ति राहिली—अर्जुनानें त्यांचें नांव राखलें.

## ५ उपसंहार.

वाहिलें—परमेश्वरानें बोलाविलें—ह्मणजे वाल्मीकिप्रभृति कवींमध्यें माझी गणना केली.

# सभापर्व.

## धर्माचा राजसूययज्ञ.

आ ४. आजि ! तें कौतुकी तत्प्रेम त्या सदा असा सजितें—असा अन्वय. कृष्ण पुष्कळ द्रव्य घेऊन युधिष्ठिरपुराला आला. ह्यावर कवि ह्मणतात:—अहो परमेश्वराचें आपल्या भक्तांवरचें प्रेम कौतुक उत्पन्न करणारें आहे व त्यामुळेंच तो नेहेमी अशा गोष्टी करीत असतो—अशा रीतीनें शोभत असतो.

आ. ५—कर दे. कृष्ण हा कर्ता.

आ. २१—डरडरां ढेंकर देउनि ( घन ) बहु वर्षो ( असें ) चातक ह्मणेल काय ?—असा अन्वय. चातक जसा थोड्या पावसानें संतुष्ट होतो त्याप्रमाणें राजसूययज्ञाच्या ह्या संक्षिप्त वर्णनानेंच रसिक वाचक तुष्ट होवोत.

## २ शिशुपालवध.

आ. ७– पूजित......देव ?

आ. ८– जी प्रभुची जीमूतश्यामा भा नारदभीष्मप्रमुखां साधूंच्या दृष्टिलाभा होय, ती चैद्य दृष्टिला भाजी–असा अन्वय. कृष्ण दृष्टीस पडला असतां आपल्या नेत्रांचें साफल्य झालें असें नारदप्रमुख साधूंना वाटे; परंतु शिशुपालाला कृष्णदर्शनानें अत्यंत संताप उत्पन्न झाला.

आ. १०– पाण्यापेक्षां पातळ करणें– खालीं पहावयास लावणें.– मेल्यापेक्षां मेलें करणें.

## ३ दुर्योधनाचा कपटद्यूत-निश्चय.

आ. ५– त्यां ( भीमार्जुननकुलसहदेवांस ) मही निजभरहर हरिचे सुसहाय ह्मणे दुःसहाय न ह्मणे )–असा अन्वय. पृथ्वी ह्मणालीः– माझा भार हरण करणारा जो कृष्ण त्याचे हे पांडव उत्तम मित्र आहेत.

आ. १३– अगा ! तूं धात्या प्रिय ( आहेस ) अप्रिय ( आहेस ) काय ? उत्तर नाहीं.

आ. १५– ज्याच्या शकलास ( उडुला ) न जिंकवे तो पूर्णेंदु उडु जिंकी काय ?– असा अन्वय. चंद्राच्या एका भागाला सुद्धां नक्षत्राला जिंकतां यावयाचें नाहीं, मग पूर्णचंद्राला जिंकण्याची गोष्ट कशाला हवी ?

आ. ३७– आहूतो न निवर्तेयम्– बोलावलें असतां परत फिरणार नाहीं.

# वनपर्व

## १ द्रौपदी विलाप.

आ. ३–पावे त्या...नवनीतीं–हें ' पर्यायोक्त ' अलंकाराचें उत्कृष्ट उदाहरण आहे. एखाद्या गोष्टीचें सरळरीतीनें वर्णन न करितां तें

वळसा घेऊन केलेलें असतें तेव्हां ' पर्यायोक्त अलंकार ' होतो. पांडवांना पाहून कृष्णाचें अंतःकरण द्रवलें असें सरळ न ह्मणतां उष्णतेच्या योगानें लोण्याची जी स्थिति होते ह्मणजे तें विरघळतें तशी कृष्णाच्या मनाची अवस्था झाली असें येथें वर्णन केलें आहे.

आ. १४– स्त्रीलंघन करित्यातें प्राकृतहि न साहती; पह्म ( प्राकृताच्या स्त्रीला कर ) लावा. हा ! ( ज्या माझा ) वातेंहि पदर ही न हालावा ( त्या ) मज ( दुःशासनें ) कर लावावा न ( ना )?– असा अन्वय. साधारण लोक सुद्धां आपल्या बायकोचा अपमान सहन करीत नाहीत. तुह्मीं एखाद्या यःकश्चित् मनुष्याच्या स्त्रीला हात लावून पहा मग तुमची काय दशा उडेल ती तुम्हांला समजेल. हाय ! हाय ! ज्या माझी एवढी योग्यता कीं वाऱ्यानें सुद्धां इकडचा पदर तिकडे होऊं नये त्या माझा दुःशासनानें असा अपमान करावाना !

आ. १७– मद्धैर्य तवाश्रुबिंदुसह गळतें–यांत ' सहोक्ति ' अलंकार आहे. दोन वस्तु एकाच वेळीं घडल्या असें चमत्कृतिजनक वर्णन जेथें असतें तेथें ' सहोक्ति ' समजावी. येथें धैर्य व अश्रु ह्यांचें एकाच वेळीं गळणें हें वर्णन चमत्कार उत्पन्न करणारें आहे.

आ. २०– यांत ' मिथ्याध्यवसिति ' अलंकार झाला आहे. एखादी दुर्घट गोष्ट सिद्ध करण्याकरितां अशक्य गोष्टी शक्य आहेत अशा रीतीचें जेथें वर्णन असतें तेथें हा अलंकार होतो. ' ग्रहगण गळेल ' वगैरे गोष्टी वस्तुतः अशक्य आहेत असें असून त्या घडतील असें येथें वर्णन आहे.

आ. २८– सरतील...जे– एका पळाप्रमाणें तुमचीं नेरा वर्षें तेव्हांच निघून जातील.

## २ किरातार्जुनयुद्ध.

आ. १–न भावें–सहजगत्या.

आ. ६–तापसजन ' हाय ! हाय ! ' न वदो ( ह्मणुनी ) शरप्रहारा घे–असा अन्वय. मुनिजनांला तुझ्यापासून ताप होऊं नये ह्मणून तुला मारतों.

आ. ९–पाथरवटें स्वटंकें वज्रपाणिसेंह गिरितें भेदावें (काय) असा अन्वय. टांकीनें पर्वत फोडण्याचा प्रयत्न करणारा पाथरवट व वज्रानें पर्वताचा भेद करणारा इंद्र यांची कधीं बरोबरी होईल काय ? अर्थात् नाहीं.

आ. १२–कोण...मी–इंद्र हा पर्वतांचा नाश करणारा आहे.

आ. १४–गरळ......कालिया सर्पाचें विष. पद्वी...रामासि–शंकर हा परशुरामाचा गुरू.

आ.१८-जें युद्धांत...विकिरा-अर्जुनाचें गांडीव धनुष्य युद्धांत ह्मणत असेः—' अहो, सूर्यमहाराज ! आपलीं किरणें आतां पसरूं नका ' ह्मणजे गांडीव धनुष्यापासून इतके बाण सुटत असत कीं त्यांच्या योगानें सूर्याच्या प्रकाशालाही कांहीं वेळ प्रतिबंध होत असे.

आ१९ज्याचा पाद...वाळः-ज्या (शंकरा) चा पाय भक्तांच्या संसाराला ह्मणतोः—हे संसारा, तूं वाळून नाहींसा हो; नाहीं तर तुझी वाईट दशा होईल. शंकराच्या चरणाचें स्मरण केलें असतां भवरोग नाहींसा होतो.

आ.–२१ ' मृत्युभयासि तराया जडसुधेचें चिबुक न धरा ' असें ज्याच्या लीला सुरांसही ह्मणती तो प्रभु वराचि बुकलीला–असा अन्वय. चिबुक–हनुवटी धरणें–प्रार्थना करणें. मृत्यूचे भय नाहींसें करण्याला शंकराच्या लीलांची योग्यता अमृताहूनही अधिक आहे.

आ. २९–अधरा...ळी–यांत ' धवळी ' हें क्रियापद दोन वाक्यांना साधारण असल्यामुळें–प्रकाशित करीत असल्यामुळें–येथें ' दीपक ' अलंकार झाला आहे.

आ. ३०–तो दीनबंधु ( अर्जुना ) अभय ( व ) पाशुपत ( अस्त्र ) देउनियां ( दीनबंधु हें ) नातें उजरी–असा अन्वय. शंकरानें अर्जुनाला अभय दिलें व पाशुपत नांवाचें अस्त्रही दिलें व अशा रीतीनें आपलें ' दीनबंधु ' हें नांव सार्थ केलें.

## ३ अर्जुनविलोभन.

विलोभन—मन वळविण्याचा प्रयत्न करणें.

आ. १–मग–'किरातार्जुनयुद्ध' ह्या प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें शंकर गेल्यावर.

आ. ५–जो बाप साधुळा न व्याला तो मूर्त अघ व्याला (व म्हणून) तो लाजो–असा अन्वय. वाईट मुलाच्या बापाला त्याच्या बद्दल आनंद न वाटतां उलटी लाजच वाटली पाहिजे.

आ. १२–स्वर्गीहि . नातें–स्वर्गांत येऊन सुद्धां जर अर्जुनाला सुख नाहीं तर मग माझ्या ह्या वैभवाचा उपयोग काय ? व मी त्याचा बाप असून तरी काय अर्थ ?

आ. १६–नो तीस म्हणे–चित्रसेन उर्वशीला म्हणतो. जो... नेतो–जो तुझ्याकडे सुख मागतो व मग तूं दिलेलें सुख भोगतो.

आ. २३–शृंगारमानसींच्या–मानस सरोवर हें हंसाचें राहण्याचें स्थान.

आ. २९–गुरुजन तों ( धर्म ) सेतूतें प्रयत्नें रक्षिती परि न भंगिती–असा अन्वय. धर्माचें रक्षण करणें हें वडिलांचें काम; धर्मविरुद्ध काम करण्यास दुसऱ्याला सांगणें हें त्यांचें कर्तव्य नव्हे. असें असून ( अर्जुन उर्वशीस म्हणतो ) तूं मला हें अधर्माचरण करण्याला कसें सांगतेस ?

आ. ३१–जाणत...नातें ?–" उर्वशी ही पौरवकुलमाता, कारण ती पुरुरव्याची पत्नी. तेव्हां तिच्याशीं गमन केल्यानें गुरुदारगमनाचें पातक अर्जुनास लागावें, पण पुरुवंशीय राजे स्वतपोबळानें स्वर्गी राहतात आणि अप्सरांसह रममाण होतात, यांत त्यांचा अपराध नाहीं, तो जुना संबंध आतां तुटला म्हणून पाप नाहीं."

आ. ३६– बोधनलस्पृष्टपर्वत–नलवानर नें समुद्रांत टाकलेले पर्वत बुडत नसत.

छाया ग्रहासि कपिसा–" सिंहिका म्हणून हिरण्यकशिपूची भगिनी होती. मारुति सीताशोधार्थ जात असतां त्याची छाया समुद्रजला-

वर पडली होती. त्या छायेचें आकर्षण करून हिनें मारुतीची गति कुंठित केली. नंतर मारुतीनें हिच्या मुखांत शिरून तिला मारून पुढें गमन केलें."

आ. ४०–मातेचा–कैकयीचा.

## ४ नलदमयंतीवियोग.

आ. १–मग–कलीनें नलाच्या शरीरांत प्रवेश केल्यानंतर.

आ. ५–भरीं भरणें–कोणाच्या तरी छंदाला लागणें.

आ. १७–त्याग समजोनि रडतां–नल जेव्हां दमयंतीला विदर्भ देशाचा मार्ग दाखवूं लागला तेव्हां तिला वाटलें कीं, हा आपल्याला सोडून जाणार व ह्मणून ती रडूं लागली.

आ. १९–पट आपण अक्षत असोनि संगहानि ( वियोग ) होऊं न देईल–असा अन्वय. नल ह्मणतो–हें वस्त्र जर फाडलें नाहीं तर आपल्याला हिला सोडून जातां येणार नाहीं. ( दोघांचेंही वस्त्र एकच होतें ).

आ. २०–हरि जरि मदर्थ असि होता तरि ) दुजी निज लीला असि न ( असें ) ह्मणता–असा अन्वय. परमेश्वरानें आपल्या भक्तांकरितां निरनिराळीं रूपें धारण केलीं आहेत त्याप्रमाणें आज तो माझ्याकरितां ( नलाकरितां ) खड्ग ( वस्त्र कापण्याकरितां ) झाला तर त्याची ही लीला सर्वांत अपूर्व होईल.

आ. २९–सत्याश्रित ( सतीचा आश्रित–पक्षीं सत्याचा आश्रित ) गुणमय ( सूत्रमय–पक्षीं सद्गुणप्रचुर ) शुचि ( स्वच्छ–पक्षीं निष्पाप ) पट ( स्वतःला ) कापुनि घे परि हांक न देचि. पुण्यश्लोकीं राहुनि हा ( पट ) त्याचेंचि कपट कोंवि उघडिल ?–असा अन्वय. तें वस्त्र जरि फाटलें तरी त्याचा आवाज झाला नाहीं. वस्त्र कापलें तरी दमयंती जागी झाली नाहीं. तो पट नलासारख्या पुण्यश्लोकाजवळ राहिलेला असल्यामुळें प्राण गेला तरी वेहेत्तर

पण आपल्या धन्याचें कपट बाहेर पडूं देणार नाहीं असा त्यानें निश्चय करणें साहाजिकच होतें. साधसमागमाचा महिमाच तसा आहे. यथें नलाचें कपट ह्मणजे दमयंतीला फसवून सोडून जाणें हें होय.

आ. ३१ राहो—राहा हो.

आ. ३३—चिंतूनि असाधुवाद—' तुला सोडून जाणार नाहीं ' असें एकदां वचन दिलें असतां त्याच्या उलट आज वर्तन केलेंत हें पाहून मला फार वाईट वाटतें.

## ५ यक्षप्रश्न.

आ. १—वांकुल्या दाखविणें—वेडावणें—तुच्छ मानणें.

आ. ५—व्यसन—तहानेची पीडा.

आ. ११—हा! रे! कितवा! धर्मा! स्वकृतें निजजीवितासि आंचव, घे. ( जरि तूं ) द्यूत न करितास ( तरि ) चवघे बंधु धिक् धिक् म्हणोनि ( तुज ) कां विटते?—असा अन्वय. धर्म स्वतःची निर्भत्सना करीत होतसाता म्हणतोः—हे जुगाऱ्या धर्मा! तूं आपल्या स्वतःच्याच कृत्यानें स्वतःच्या प्राणांवर पाणी सोड व आपली छीथू करून घे; तूं जर द्यूत न खेळतास तर तुझे चवघे बंधु तुला कां कंटाळले असते?

आ. १३—धर्म आपल्या भावांना म्हणतोः—तुह्मांला स्वर्गांत सुख होणार नाहीं; कारण तुम्हीं मला सोडून गेलांत हा आपल्या कुळाला तुम्ही मोठाच डाग लाविलात.

आ. १७—रविला पद्महानि कधींही न हो—असा अन्वय. कमलांची हानि सूर्याला कधींही होत नाहीं. सूर्याला कमळें नेहमीं मिळतात.

आ. १८—पळसा—पळसाप्रमाणें बाह्यतः मनोहर दिसणाऱ्या संसारसुखाला.

आ. १९—तेज असे, म्हणुनि होय न व्याधी—ह्यांचें तेज कमी झालेलें दिसत नाहीं; म्हणून कांहीं रोग होऊन हे मेले असावे असें म्हणतां येत नाहीं.

# विराटपर्व.

## १ कीचकवध.

आ. १– ज्याचा ( कृष्णाव्रताचा ) अभ्युदय धग वांछी तें तो कीचक भंगूं पाहे– असा अन्वय. द्रौपदीच्या पातिव्रत्याचा दिवसें-दिवस अधिक अधिक उत्कर्ष होत जावो अशी पृथ्वी इच्छा करीत होती. पतिव्रता स्त्रियांच्या पुण्याईनें जग चाललें आहे अशी समजूत आहे.

आ. ७– मत्पति गंधर्व–द्रौपदी जेव्हां सैरंध्री ह्मणून सुदेष्णेकडे चाकरीला राहिली तेव्हां तिनें तिला असें सांगितलें होतें कीं मी पांच प्रबल गंधर्वांची पत्नी आहे.

आ. ८– ती तीस ह्मणे– सुदेष्णा सैरंध्रीस ह्मणते.

आ. ९– साधुगृहा ( मला ) धाड; तत्पथशिळा ( जरी ) परम-तप्ता ( तरी त्या जशा ) विटा ( नशा मला ) गारा ( वाटतील )— असा अन्वय. द्रौपदी सुदेष्णेला ह्मणते:–कीचकाच्या घरीं मी जाणार नाहीं. चांगल्या मनुष्याकडे मला पाठविलीस तर मी जाईन; मग वाटेंतले धोंडे जरी फार तापलेले असले तरी कांहीं हरकत नाहीं. मला ते विटाप्रमाणें गार वाटतील.

आ. ११– दुर्गतिची माउली सुरा पित्याची माती कां न करिल? असा अन्वय. अधोगतीची केवळ जननीच अशी जी दारू ती पिणाऱ्याची दुर्दशा कशी करणार नाहीं! अर्थात् करील. माती करणें—नाश करणें.

आ. १९– द्रौपदी ह्मणते:—नीति ह्या विराटाला कंटाळली आहे असें दिसतें. कारण तसें नसतें तर कीचकानें माझ्यासारख्या सभ्य स्त्रीचा अपमान केला ह्या गोष्टीकडे त्यानें दुर्लक्ष्य केलें नसतें. नीति कंटाळली आहे ह्मणजे त्याला सोडून जाण्याची इच्छा करीत आहे.

आ. २१– द्वारका कृष्णाचें स्थान व महानस भीमाचें स्थान. ह्मणून द्रौपदीनें द्वारकेचें व विराटाच्या स्वयंपाकघराचें स्मरण केलें

म्हणजे कृष्णाची ( दीनांचा बंधु म्हणून ) व भीमाची ( कीचकाला मारण्यास समर्थ म्हणून ) तिनें आठवण केली.

आ. २४–ह्रीप्रद हा बाहु भृगुकुठारा हो–परशुरामापेक्षां सुद्धां अधिक पराक्रम करून दाखवा. तुमचा हात रामाच्या परशुला लाज देणारा असा होवो. रामानें परशूनें जें काम केले त्याहून अधिक तुम्हीं आपल्या हातानें करून दाखवा.

आ. २६–ज्या दर ( भीति ) भेटे त्यालाचि कांप ये–असा अन्वय. जो भ्यायलेला असतो तोच कांपत असतो. भीम म्हणतो:— हे द्रौपदि, तूं कांपत आहेस ह्यावरून तूं भ्यायली आहेस हें उघड आहे.

आ. २८–कीर्तीचा रंग पांढरा आहे अशी कल्पना आहे.

आ. २९–व्यापूनि मही नभा–कवी जिची कीर्ति इतकी गातात कीं तिच्या योगानें पृथ्वी व आकाश हीं दोनही भरून जातात.

आ. ३२–धर्मेचार्थेच–लग्नाच्या वेळीं नवऱ्याची प्रतिज्ञा:— धर्मेचार्थेच कामेच [ इमां भार्यां ] नातिचरामि–धर्मार्थकाम ह्या पुरुषार्थांचें संपादन इला सोडून मी करणार नाहीं.

आ. ४०–भीमानें शिकविलेलें कीचकाला सांगतांना द्रौपदीला कसेंसेंच झालें व म्हणून तिच्या शरीराला थोडा कंप सुटला.

आ. ४१–द्रौपदी कीचकाला म्हणते:—हा जो आपला गुप्त संकेत तो तिसऱ्या कोणाला कळवूं नका, मग तो तुमचा भाऊ असो कीं चाकर असो.

आ. ४२–कीचक मनिं म्हणे, 'नासत्य पित्याचा ( सूर्याचा ) हात पाहतसे काय ?'–असा अन्वय. अश्विनीकुमार आपल्या बापाची—सुर्याची नाडी–प्रकृति पाहात असले पाहिजेत म्हणूनच त्याला [ सूर्याला ] मावळण्याला इतका उशीर झाला. कीचकाला संध्याकाळ केव्हां होते असें झालें होतें.

आ. ४८–रामचंद्राच्या सेतूनें जसें सागर तरून जातां येईल तसें भोंपळ्याच्या योगानें येणार नाहीं.

आ. ४९-कां छी...मुके-ज्यांना बोलतां येत नाहीं असे लोक सुद्धां त्या नीच मनुष्याचा ( जो आपल्याहून बलिष्ट पुरुषाच्या स्त्रीचा अभिलाष धरितो त्याचा ) धिःकार करतील. त्या मनुष्याचा नीच-पणा एवढा मोठा आहे कीं, त्याचा धिःकार करण्याकरितां मुक्यांना सुद्धां वाचा फुटेल.

## २ विराटभ्रमनिरास.

भ्रमनिरास-चुकीची समजूत नाहींशी करणें.

आ. १-विजयी...ये-त्रिगर्तांस जिंकून विराट नगरांत आला.

आ. २-शेला पसरणें-पदर पसरणें, विनंति करणें. हे राजा तुझ्या कीर्तीनें आपलें रक्षण करण्याविषयीं उत्तराला विनंति केली.

आ. ४-वारे होतिल-वारा जसा ढगांना उडवून टाकतो तसे कौरव उत्तराला उडवितील-त्याचा नाश करितील.

आ. ७-न वय...नीं-तेजस्वी जे वृत्ति ऐशी तयांची । तेथें कांहीं चाड नाहीं वयाची ॥

आ. १४ मेल्या...हो-पांडवांचा नाश द्यूतानें झाला होता म्हणून द्रौपदीनें अक्षकरांना शिव्या देणें अगदीं साहजिक आहे.

आ. १६-भय देईल कुंकुमा-कुंकवाला भय देणें म्हणजे नव-ऱ्याच्या जीवावर संकट आणणें.

आ. १८ ब्रह्मांडा...तें-घटज सागरा सेवुनियां घटातें ब्रह्मांडाधिकहि करि-असा अन्वय. घटांत उत्पन्न घालेला जो अगस्त्यमुनि त्यानें सागराला प्राशन करून कोरडा करून टाकला व ह्या कृत्यानें आपलें उत्पत्तिस्थान जो घट त्याला ब्रह्मांडापेक्षांही मोठें केलें. मुलाच्या पराक्रमानें बापाची कीर्ति होते हें उघड आहे.

आ. २०- गार होणें-निर्जीव होणें.

आ. २१-दोघी-बृहन्नडा व पार्वती ( भवानी ).

आ. २२-ओंठ करपणें-भीतीनें काळेठिक्कर पडणें.

आ. २३-अक्षमा राया माळ घाली-असा अन्वय. राजानें क्रोधा-

चा ( असहनशीलतेचा ) स्वीकार केला. माळ घालणें–स्वीकार करणें.

आ. २७–बृहन्नडा राहो म्हणजे बाहेर राहो—आंत न येवो.

आ. २८–जरि...वाढील–इंद्रानें जरी त्याला अमृत दिलें तरी.

आ. ३०–कुलक्षणसा–क्लीबाप्रमाणें–अर्जुन जरी शुभलक्षणसंपन्न होता तरी त्याला आणखी कांहीं वेळ बृहन्नडेच्या वेषाला अनुरूप असें वर्तन करणें भाग होतें.

आ. ३२–मद्‌घा सहाय घेउनि–माझ्या पापाबद्दल.

आ. ३९–सोडूनि सुजळ–जल सोडणें–संकल्प करणें. तोंड ( वदन ) उजळ करणें—अपकीर्ति न होऊं देणें. देवसुतें—अर्जुनानें उत्तराला सांगितलें होतें कीं, माझें नांव राजाला सांगूं नको, तर कोणी एका देवपुत्रानें येऊन सहाय्य केलें असें सांग.

आ. ४३–वरतें ( वर ) न पाहूं दे–वर पाहूं दिलें नाहीं.–लाजविलें.

आ. ४६–नेत्रें...हीं–तुझ्या तोंडून त्या देवपुत्राची हकीकत ऐकिल्यामुळें माझे कान धन्य झाले परंतु त्याचें दर्शन न झाल्यामुळें डोळ्यांना मात्र तळमळ लागून राहिली आहे.

आ. ४८–पाय दाविल–भेट देईल–'हो कायपुष्ट, पायसखा' ( असें ) दुकळीं म्हणता याहुनि ( देवपुत्राहून ) उणाचि ( कमीच ). दुष्काळांतील पायसदानाची किंमत देवपुत्रदर्शनदानाहून कमी.

आ. ४९–जळकारुण्यहि विनतानुगतचि; तें वाटे कसें सोडील !–असा अन्वय. पाणी जसें नेहमी सखल जमिनीकडे जातें, तसेंच कारुण्य सुद्धां ( दयाही ) नम्राकडेच जातें म्हणजे सज्जन नम्र लोकांवरच दया करितात. तें ( जलकारुण्य ) वाटे ( नेहमींच्या मार्गाला ) कसें सोडिल ? अर्थात् सोडणार नाहीं. सारांश, तो

[illegible] करील

चा ( असहनशीलतेचा ) स्वीकार केला. माळ घालणें–स्वीकार करणें.

आ. २७–बृहन्नडा राहो म्हणजे बाहेर राहो—आंत न येवो.

आ. २८–जरि...वाढील–इंद्रानें जरी त्याला अमृत दिलें तरी.

आ. ३०–कुलक्षणसा–क्लीबाप्रमाणें–अर्जुन जरी शुभलक्षणसंपन्न होता तरी त्याला आणखी कांहीं वेळ बृहन्नडेच्या वेषाला अनुरूप असें वर्तन करणें भाग होतें.

आ. ३२–मदघा सहाय घेउनि–माझ्या पापाबद्दल.

आ. ३९–सोडूनि सुजळ–जल सोडणें–संकल्प करणें. तोंड ( वदन ) उजळ करणें—अपकीर्ति न होऊं देणें. देवसुतें—अर्जुनानें उत्तराला सांगितलें होतें कीं, माझें नांव राजाला सांगूं नको, तर कोणी एका देवपुत्रानें येऊन सहाय्य केलें असें सांग.

आ. ४३–वरतें ( वर ) न पाहूं दे–वर पाहूं दिलें नाहीं.–लाजविलें.

आ. ४६–नेत्रें...हीं–तुझ्या तोंडून त्या देवपुत्राची हकीकत ऐकिल्यामुळें माझे कान धन्य झाले परंतु त्याचें दर्शन न झाल्यामुळें डोळ्यांना मात्र तळमळ लागून राहिली आहे.

आ. ४८–पाय दाविल–भेट देईल–'हो कायपुष्ट, पायस खा' ( असें ) दुकळीं म्हणता याहुनि ( देवपुत्राहून ) उणाचि ( कमीच ). दुष्काळांतील पायसदानाची किंमत देवपुत्रदर्शनदानाहून कमी.

आ. ४९–जळकारुण्यहि विनतानुगतचि; तें वाटे कसें सोडील !–असा अन्वय. पाणी जसें नेहमी सखल जमिनीकडे जातें, तसेंच कारुण्य सुद्धां ( दयाही ) नम्राकडेच जातें म्हणजे सज्जन नम्र लोकांवरच दया करितात. तें ( जलकारुण्य ) वाटे ( नेहमींच्या मार्गाला ) कसें सोडिल ? अर्थात् सोडणार नाहीं. सारांश, तो देवपुत्र तुमच्यावर दया करीलच करील.

## ३ अभिमन्यु-विवाह.

आ. ४–तांडव करुनि याचींच ( धर्मांची ) यशें गा ( वर्णा )–असा अन्वय.

आ. ५–न विसंबणें दृष्टीआड न होऊं देणें.

आ. ७– ज्या चापपाणिसह ( धनुष्ययुक्तहस्तासह ) देव ( शंकर ) भिडला [ लढला ]. धनुष्य हातीं घेतलेल्या ज्या मजबरोबर शंकराचें युद्ध झालें.—किरातार्जुनयुद्धाचा हा उल्लेख आहे.

आ. ८– कीचक—कीचकें व त्याचे बंधु हे किति ? ( ह्या कीचकांची काय मोठीशी प्रतिष्ठा? ) इच्या ( द्रौपदीच्या ) क्षोभें (रागानें) हरमुरज [ शंकराचा मृदंग ] अनाद [ शब्दरहित ] व उदधि [समुद्र] रिते ( रिकामे ) व्हावे. द्रौपदीच्या क्षोभापुढें हरमुरज व उदधि ह्यांच्या क्षोभाची फारशी किंमत नाहीं.

आ. ११– त्वां पूजावा ...म्यां—अर्जुनानें उत्तराला मदत केली होती व भीमानें विराटाला शत्रूंच्या हातून सोडविलें होतें. काळ गर्व सोडुनि ( नम्र होऊन ) हरिजनाच्या ( हरिभक्तांच्या ) महिम्या [ मोठेपणाला ] भी ( भितो ).

आ. १४– घनहि...परिसाचे—परिसाचे घनहि सुभूषेंत पडति–असा अन्वय. परिसाला फोडणारे घण [ हातोडे ] सुद्धां उत्तम अलंकार बनतात, तसेंच साधूंचा अपराध करणाऱ्यांचें सुद्धां हितच होतें

आ. १६– जोडा नसणें–जोड नसणें–दुसरा सारखा पदार्थ न मिळणें. ह्या दिवसा जोडा नसे–असा दिवस पुनः यावयाचा नाहीं. सुकृत [ पुण्य ] जय दयादि संपादुनि ( मिळवून ) स्वपदीं ( सिंहासनावर ) ( व ) मच्चित्तींहि ( माझ्या–विराटाच्या मनांत ) वसा [ रहा ].

आ. २२– शुकादि संन्यासी हरिजनकथेंत शिरतां न विशंकावे–असा अन्वय. भगवद्भक्तांची कथा चालली असतां तेथें जाण्यास शुकादि साधूंना शंका वाटूं नये. मजसारख्या भगवद्भक्तानें एक वर्ष

मजबरोबर मुलीप्रमाणें आचरण करणाऱ्या उत्तरेशीं लग्न केलें तर सर्व हरिजनांच्या शीलाविषयीं साधूंना शंका येऊन ते त्यांच्या कथेंत जाण्याला कचरतील.

आ. २३– खलजनां ओखदसा–दुष्टांना औषधाप्रमाणें अप्रिय. भाचा– जलजनाभाचा असा संबंध.

आ. २६– सुवर्णमुद्रा– १५ रुपयांच्या किंमतीचें नाणें. होन ५ रुपये किं. नाणें.

## उद्योगपर्व.

### १ अर्जुनविजय.

आ. ६–‘ पूर्वागतसाह्यशिवपदीं सदा वस ’ [ असें ] संत मनातें ह्मणती–असा अन्वय. पूर्वीं आलेल्याला मदत करणें हाच शिष्टसंमत मार्ग आहे.

आ. ७–सर्वहि संत आगमनदर्शनीं न्यायें भेद न पाहे–असा अन्वय. येणें व पाहणें ह्यांत भेद नाहीं असा न्याय आहे.

### २ धर्मराजाची सामेच्छा.

साम—सख्य.

आ. ३–सत्पुत्रकरीं–चांगल्या पुत्राच्या हातांत—रघुराजाला.

आ. ८–जी मायसी मुखांत अमृत ओती ती सद्विद्या कर्मत्याग न करितांचि फलवती होती–असा अन्वय. आईप्रमाणें जी ब्रह्मविद्या उपासकांना मोक्ष देते ती कर्म न टाकलें तरच फलद्रूप होते. नुसत्या ब्रह्मज्ञानानें फलप्राप्ति व्हावयाची नाहीं, त्यास कर्माची अवश्यकता आहे.

आ. १९–समुद्राला आपल्या लाटा आवरून धरणें जसें कठिण नाहीं तसें धीरांना योग्य प्रसंगीं ( समयीं ) आपलें मन आवरून धरणें कठिण नाहीं.

आ. २०–नयांत नांव रायाचें–त्यांत ( तसें केलें असतां ) राजाची कीर्ति आहे

आ. २१ जेणें [ ज्या योगानें ] साधुजन यश गातील तें करीं ( तूं कर )–असा अन्वय.

## ३ कर्णभेदप्रयत्न—पूर्वार्ध.

कर्णभेदप्रयत्न—कौरवांना सोडून देण्याविषयीं कर्णाचें मन वळविण्याचा प्रयत्न.

आ. ६–भटकरगें ( योद्ध्याच्या हातांत असलेल्या ) लोहें ( लोखंडानें–शस्त्रानें ) स्पर्शनगीची ( परिसाची ) दया कशी जोडावी ?–असा अन्वय. योद्ध्याच्या हातांतल्या शस्त्रावर परिसानें दया केली तर त्याचें सोनें होऊन तें लढाईंत निरुपयोगी होईल. त्याप्रमाणें हे कृष्णा ! तुझें स्नेहाचें भाषण माझ्या उपयोगाचें नाहीं.

आ. १२–कर्ण ह्मणतोः–हे केशवा ! जसा मऊ व स्वच्छ कापूस [ त्याच्यावर ] पडणाऱ्याला कांहीं इजा होऊं देत नाहीं त्याप्रमाणें तुझा हा उपदेश आहे. ह्मणजे तो शुद्ध आहे, त्यांत कठोरपणा नाहीं व त्याप्रमाणें वागलें असतां कल्याण होईल. असें जरी आहे तरी त्याचा मला उपयोग नाहीं. कारण आईनें आपल्या फार आजारी असलेल्या मुलास वातुळ पदार्थ थोडा जरी दिला तरी तो त्याला अपायकारक होतो. तूं मोठ्या प्रेमानें उपदेश करितो आहेस हें खरें आहे; तथापि मी मात्र त्याला योग्य नाहीं.

आ. १५–धारातीर्थ— तरवारीच्या धारा हेंच तीर्थ.

आ. २०–स्वरगें इतरें ( दानें ) यावीं, मग मरणदानें कां न [ यावीं ] ?–असा अन्वय. कल्पवृक्षाला इतर दानें देणें जर कठीण नाहीं तर त्याला मरणदान देणें कठिण आहे काय ?–अर्थात् नाहीं.

आ. २३–वध्यें ' वधाचि ' ह्मणतां प्रभुनें ' आग्रह ' ह्मणोन कोपावें [ काय ] ?–असा अन्वय. जो मनुष्य निश्चयानें मरणार त्यानें ' मला मारा ' असें जर ह्मटलें तर ' तूं उगीच हट्ट करतोस ' असें

ह्मणून त्याच्यावर प्रभूनें [ धन्यानें-समर्थमनुष्यानें ] काय ह्मणून रागावावें ?

आ. २४- उपदेश वरचेवर झेलणें— उपदेशाचा आदरपूर्वक स्वीकार करणें.

आ. २६-हे पाद्—कृष्णचरण.

## ४ कर्णभेदप्रयत्न— उत्तरार्ध.

आ. ३-राधेय आधिरथि मी-मी तुझा मुलगा नाहीं, राधेचा व अधिरथाचा आहे ही गोष्ट कुंतीच्या स्पष्ट लक्षांत यावी ह्मणून कर्णानें ' राधेय आधिरथि मी ' असें ह्मटलें आहे.

आ. ४- य-राधेय या शब्दांतील ' य ' हें अक्षर.

आ. ६- जी जी ह्मणणें-मनधरणी करणें.

आ. १०-हंस [ जसे ] मानसा सोडुनि [ न जाती ] तसे तुह्मीं साधूंच्या मानसा सोडुनि न जाल-असा अन्वय. ज्याप्रमाणें हंस पक्षी मानससरोवर सोडून कधींही जात नाहींत म्हणजे त्यांना तें जसें अत्यंत प्रिय असतें तसें साधूंचें चित्त सोडून तुम्हीं कोठेंही जाणार नाहीं म्हणजे त्यांना तुम्हीं अत्यंत प्रिय व्हाल.

आ. १२- नेत्रें झांकुनि—डोळे मिटून—दुर्लक्ष करून. असुख रचिती-अनेक दुःखांची तयारी करून ठेवतात. यांत ' लोकोक्ति ' अलंकार आहे. एखाद्या शब्दाचा किंवा शब्दसमूहाचा लौकिक किंवा लोकांमध्यें रूढ जो अर्थ असतो ( वाच्यार्थाहून भिन्न ) त्यास अनुसरून जेव्हां वर्णन असतें तेव्हां हा अलंकार होतो. डोळे मिटणें म्हणजे खरोखरी डोळे झांकणें असा अर्थ नाहीं तर दुर्लक्ष करणें असा आहे, पहिला वाच्यार्थ आहे व दुसरा लौकिकार्थ आहे.

आ. १३-वेन-हा एक अत्यंत दुष्ट राजा होता.

आ. १४-ती [ जरि ] भलतीडि [ तरि ] ती आत्मजननीच— ती जरी कोणी असली तरी ती स्वमातेसमानच होय.

आ. १५–नख लावणें–प्राण घेणें.

आ. २१–नवधा भक्ति— श्रवणं कीर्तनं विष्णोः स्मरणं पादसेवनम् । अर्चनं वंदनं दास्यं सख्यमात्मनिवेदनम् ॥

आ. २३–अभयवर...देहें......आत्म्यावांचून जसा केवळ देह राहत नाहीं त्याप्रमाणें तुझ्या ह्या वरावांचून आम्हीं वांचलों नसतों.

आ. २४–जे सखे ते विधि फिरतांचि वृथा पर होती–असा अन्वय. जे मित्र असतात ते नशीब फिरलें असतां विनाकारण शत्रु होतात.

## ६ भीष्मप्रतिज्ञा.

आ. १–मुनि...ज्याच्या—ज्यांच्या सगळ्या शिरा वर दिसत आहेत असे म्हणजे अत्यंत वृद्ध ऋषी.

आ. ४–पराविजिता परपूर्वा— जिला दुसऱ्यानें जिंकली ती दुसऱ्याची झाली.

आ. २२–सर्व ज्ञाता आधीं तुज धन्य म्हणो [ व ] मग यामाति ( रामाला ) धन्य म्हणो–असा अन्वय.

आ. २७–गरुडें सुधा–गरुडानें आपल्या मातेला ( विनतेला ) कद्रूच्या दास्यांतून मुक्त करण्यासाठीं सुधाहरण केलें आणि अमृतघट कद्रूच्या अपत्यांस [ सर्पांस ] दिला अशी कथा आहे. हरिलीनमतिजनें [ जेंवि ], तेंवि (त्वां भ.[illegible]) सस्पृतिशचि कोंवि परिहरिलीं ?–असा अन्वय. हरिभक्त ज्याप्रमाणें संसाराविषयींचा आवड टाकून देतात त्याप्रमाणें तूं कां केलेंस !

आ. ३६–मदसि गांवाला गेला काय रे !–माझा परशु कांहीं गांवाला गेला नाहीं. तो अजून माझ्या जवळच आहे–तुला शिक्षा करण्याला मी समर्थ आहे. यांत ' लोकोक्ति ' अलंकार आहे.

आ. ३९–हा देह–तुमचें ( परशुरामाचें ) शरीर.

आ. ४१– ते मरणीं देवासि नवस करुनि मज ( भीष्मास ) मागते झाले–असा अन्वय. परशुरामानें मारलेले जे क्षत्रिय त्यांनीं मरतांना देवाला असा नवस केला कीं, परशुरामाला शिक्षा करणाऱ्या अशा मी [ भीष्मानें ] जन्माला यावें.

आ. ४७– हें तोक–परशुराम.

आ. ५३– जेणें एकहि सन्नयन न राहे तैसें कसें करावें ?– असा अन्वय. ज्या योगानें एकही डोळा राहणार नाहीं असें काम कसें करावें ? अर्थात् करूं नये.

REFBK-0000336